१०२२
…ग्रं. सं. ठाणें.
विषय इतिहास
वा. नं. २०१३

शालोपयोगी पुस्तकमाला.

# …ा सोपा इतिहास.

( मराठी चौथ्या इयत्तेकरितां. )

लेखक
विष्णु विनायक …रमरकर,
बी. ए. एलएल. बी. वकील, पुणे.

हें पुस्तक पुणें येथें
…आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन
यांनीं छापिलें व
नारो आप्पाजी गोडबोले यांचे
…दुकानचे मालक
महादेव भास्कर गोडबोले
…नंबर ६१४ बुधवार पेठ
पुणें येथें प्रसिद्ध केलें.

…ती पहिली.

(… प्रकाशकानीं राखिले आहेत. )

सन १९२२.

REFBK-0002130

किंमत चार आणे

डबोले यांची शाळोपयोगी पुस्तकमाला

# हाराष्ट्राचा सोपा इतिहास.

( मराठी चौथ्या इयत्तेकारितां )

लेखक


**विष्णु विनायक करमरकर,**

बी. ए. एलएल. बी., वकील, पुणे.



हें पुस्तक पुणें येथें

आर्यभूषण छापखान्यांत **अनंत विनायक पटवर्धन**

यांनीं छापिलें व

**नारो आप्पाजी गोडबोले यांचे**

दुकानचे मालक

**महादेव भास्कर गोडबोले**

यांनीं घर नंबर ६३४ बुधवार पेठ



REFBK-0002130



( या पुस्तकासंबंधी सर्व हक्क प्रकाशकांनीं राखिले आहेत. )



सन १९२२

किंमत चार आणे.

# प्रस्तावना.

कोणत्याही देशाच्या इतिहासाचें अध्ययन अतीशय फायद्याचें आहे. ‘ पुढल्यास ठेंच मागचा शहाणा ’ या म्हणीप्रमाणें, पूर्वीच्या लोकांना कोणत्या ठेंचा लागल्या हें इतिहास सांगतो. त्या ठेंचा कां व कशा लागल्या हें आपणांस इतिहास वाचल्यानें समजतें. आपण तशा न लागाव्या याबद्दल खबरदारी घेतों व यामुळें आपला फार फायदा होतो. ‘ इतिहासाची पुनरावृत्ति होत असते; ’ म्हणजे हल्लीं जे कांहीं कठीण प्रसंग किंवा विलक्षण गोष्टी घडतात तसलेच प्रसंग व तसल्याच गोष्टी पूर्वीं घडलेल्या असतात. इतिहास वाचल्यानें त्या पूर्वीच्या प्रसंगीं पूर्वीचे लोक कसे वागले; त्यामुळें त्यांचा काय फायदा झाला अथवा काय तोटा झाला हें आपणाला स्पष्टपणें समजतें व अशा रीतीनें हल्लीं आपण कसें वागावें हें इतिहासाच्या वाचनानें आपल्या चांगलें लक्ष्यांत येतें.

ही झाली कोणत्याही देशाच्या इतिहासाची गोष्ट. आपल्या स्वतःच्या देशाच्या इतिहासाचा अभ्यास त्यापेक्षांही जास्त उपयोगाचा आहे. आपल्या देशाचा ज्याला अभिमान नाहीं, आपल्या देशावर ज्याचें प्रेम नाहीं असा एक तरी मनुष्य असेल का ? खास नसेल. ज्याचा मला इतका अभिमान वाटतो, ज्यावर माझें अतीशय प्रेम आहे, तो हा माझा देश पूर्वीं कोणत्या स्थितींत होता, या देशांतील माझे पूर्वज कसे होते, त्यांनीं कोणतीं कोणतीं अलौकिक कृत्यें केलीं, या माझ्या देशाला त्यांनीं कसें वैभवास चढविलें, माझ्या या प्रिय देशाचें तें वैभव कशामुळें नष्ट झालें, माझ्या कांहीं पूर्वजांनीं कोणत्या चुका केल्या; त्यांचे काय भयंकर परिणाम झाले, हें सर्व समजावें असें प्रत्येकाला वाटणारच. यासाठीं स्वदेशाचा इतिहास वाचणें हें प्रत्येकाला आवडतें. स्वदेशाचा इतिहास वाचला म्हणजे माझ्या थोर पूर्वजांसारखे मीही थोर व्हावें अशी इच्छा झाली म्हणजे मनुष्य प्रयत्न करतो व मग ईश्वरकृपेनें

आपल्याला व आपल्या देशाला आपल्या थोर कृत्यांनीं चांगले दिवस दाखवितो.

हीच गोष्ट लक्ष्यांत ठेवून आपल्या शिक्षणखात्यानें स्वदेशाच्या इतिहासाचा अभ्यास हा विषय लहान मुलांच्या शिक्षणक्रमांत घात- लेला आहे असें जरी आहे, स्वदेशाचा इतिहास सहजच मुलांना आवडावा हें जरी खरें, तरी वस्तुस्थिति पाहिली तर याच्या उलट आहे. मुलांना इतिहासाचे अध्ययनाची जशी गोडी वाटावी तशी सध्यां वाटत नाहीं. त्यांना हा विषय अगदीं कंटाळवाणा होतो यांचें कारण काय तें आपण पाहूं.

परलोकवासी प्रो. जे. नेलसन फ्रेझर एम्. ए. माजी प्रिन्सिपॉल, सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज,मुंबई, यांनीं 'A first History of India' या नांवाचें एक सुंदर व सुबोध पुस्तक लिहिलें आहे. त्यांच्या प्रस्तावनेंत ते म्हणतात. ' We often overestimate the information which the young can absorb. A first school history should not contain anything which the readers cannot thoroughly master, and at least hope to retain all their lives. There should be nothing unimportant in it. ' लहान मुलांच्या लक्ष्यांत राहील त्यापेक्षां जास्त माहिती त्यांना देण्यांत येते. पूर्णपणें ध्यानांत राहील, सर्व आयुष्यभर आठवेल इतकीच माहिती लहान मुलांच्या इतिहासांत असावी. उगीच खोगीरभरती त्यांत बिलकूल नसावी. मुलांसाठीं लिहिलेल्या इतिहासांत हीच चूक दृष्टीस पडते. सपा टून खचून माहिती देण्यांत जणूं काय चढाओढच लागून गेल्या- प्रमाणें वाटतें. हें आहे **पहिलें खरें कारण** इतिहासाचा अभ्यास नावडता होण्याचें. **दुसरें कारण** असें आहे कीं इतिहास लिहितांना हें पुस्तक अतीशय लहान बालकांच्या हातीं द्यावयाचें आहे ही गोष्ट आतांपर्यंत- च्या बऱ्याच इतिहासलेखकांनीं ध्यानांत ठेवलेली दिसत नाहीं. यामुळें संस्कृत कठीण शब्द व बिकट व कंटाळवाणी वाक्यरचना त्यांच्या पुस्तकांत जागजागीं दृष्टीस पडते. यामुळें सहजच तसलीं पुस्तकें बालवाचकांना कंटाळवाणीं व कठीण वाटतात.

**तिसरें कारण** हें कीं बहुतेक इतिहास लेखकांनीं मोठ्या गंभीर-पणानें व जाड्या तत्त्ववेत्त्याच्या थाटानें आपलीं पुस्तकें लिहिलीं असल्यामुळें तीं चित्ताकर्षक व चटकदार झालेलीं नाहींत. पोप कवीनें म्हटलें आहे कीं ' Men should be taught as if you taught them not ' म्हणजे अशा तऱ्हेनें शिकवावें कीं आपल्याला दुसरा कोणी शिकवीत आहे ही गोष्ट शिकणाऱ्याच्या लक्ष्यांत देखील येऊं नये, तर आपणच नवीन माहिती स्वतःच मिळवीत आहों असें त्याला वाटावें. हें पोप कवीचें म्हणणें पूर्ण लक्ष्यांत ठेवून लिहिलेलें इतिहासाचें पुस्तक कधींही कंटाळवाणें होणार नाहीं व तें मुलें हौसेनें वाचतील व त्यांतील माहिती त्यांच्या सहज ध्यानांत राहील.

याच कारणासाठीं हल्लीं महाराष्ट्राच्या इतिहासावर पुष्कळ पुस्तकें असतांही हें नवीन पुस्तक मीं लिहिलें आहे. वरील सर्व दोष टाळून हें पुस्तक लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्राच्या इतिहासा-वरील रा. खरे, पारसनीस, रा. ब. साने, राजवाडे, पटवर्धन व विशेषतः बडोद्याचे प्रो० सरदेसाई यांच्या अनुपमेय व सुंदर ग्रंथांचा हें पुस्तक लिहिण्यांत मला अतीशय उपयोग झाला आहे, त्याच प्रमाणें ' भारत इतिहास संशोधन मंडळाच्या परिश्रमाचाही मीं यथेच्छ फायदा घेतला आहे. या सर्वांचा यासाठीं मी अत्यंत ऋणी आहें.

हें पुस्तक अतीशय सोप्या भाषेंत लिहिलें आहे. कंटाळवाणे पाल्हाळ, व अनवश्यक बारीकसारीक गोष्टी गाळल्या आहेत. घोकंपट्टीला मदत न व्हावी म्हणून मुद्दाम सनावळी दिली नाहीं. मुलांना गोष्टी आवडतात यासाठीं महाराष्ट्राचा इतिहास अट्ठेचाळीस गोष्टी सांगून मुलांच्या सहजा-सहजीं लक्ष्यांत राहावा अशी योजना केली आहे. जरी निरनिराळ्या गोष्टी दिल्या आहेत तरी, सर्व इतिहाससूत्र अथपासून इतिपर्यंत न तुटतां त्यांतून गोवलेलें आहे यामुळें सर्व इतिहासाच्या अध्ययनाचेंही श्रेय या पुस्तकाच्या वाचनापासून मिळेल.

पुस्तक जास्त मोहक व सुबोध व्हावें म्हणून कांहीं थोर पुरुषांचीं चित्रें व नकाशे पुस्तकांत घातले आहेत. पुस्तकाचा टैपही डॉ. तांबे माजि स्टेट सर्जन इंदोर यांनीं आपल्या नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या ' बालदृष्टि ' या पुस्तकांत सांगितल्याप्रमाणें बालवाचकांस सुखकर होईल असाच घातला आहे.

हा माझा अल्पज्ञ कळकळीचा प्रयत्न शिक्षणकलाभिज्ञ थोर विद्वानास पसंत पडल्यास व द्वितीयावृत्ति काढण्याचा प्रसंग आल्यास सरकारच्या अर्केऑलॉजिकल डिपार्टमेंटनें व शेट पुरुषोत्तम मावजी वगैरे दुसऱ्या इतिहासप्रेमी थोर विद्वानांनीं नवीनच मिळविलेलीं आणखी थोर पुरुषांचीं व प्रसिद्ध स्थलांचीं चित्रें घालून पुस्तक जास्त उपयुक्त, सुबोध व मोहक करण्याचा विचार आहे, तो जगच्चालक प्रभु पूर्ण करो अशी नम्रपणें त्याची प्रार्थना करून हा लांबलेला प्रस्तावनालेख पुरा करितों.

पुणें पेठ शनवार नं. ५३०

नम्र लेखक
वि. वि. करमरकर.


# गोष्टींची अनुक्रमणिका.


| गोष्टीचें नांव | पृष्ठांक |
|---|---|
| १ हितगुज ... ... ... ... | १ |
| २ आपण मराठे व आपला देश महाराष्ट्र ... | २ |
| ३ देवांची देवगिरी... ... ... ... | ४ |
| ४ भरती मागून ओहोटी ... ... ... | ७ |
| ५ आपली मराठी भाषा ... ... ... | ११ |
| ६ अलौकिक प्रामाणिकपणा व स्वामिभक्ति ... | १४ |
| ७ दारूचा भयंकर परिणाम ... ... | १७ |
| ८ शूर चांदबिबी ... ... ... ... | २१ |
| ९ वजीर मलिकंबर ... ... ... | २४ |
| १० ओहोटी मागून भरती ... ... ... | २८ |
| ११ हे भोंसले कोण व कोठले ? ... ... | ३० |
| १२ जिजास्वयंवर ... ... ... ... | ३२ |
| १३ देवीचे दोन प्रसाद ... ... ... | ३४ |
| १४ आई थोर तुझे उपकार ... ... ... | ३७ |
| १५ स्वामिभक्त दादाजी कोंडदेव ... ... | ४२ |
| १६ दादाजीचा अलौकिक प्रामाणिकपणा ... ... | ४५ |
| १७ स्वराज्याची जननी जिजाबाई ... ... | ४६ |
| १८ स्वराज्याचा संकल्प ... ... ... | ४८ |
| १९ स्वराज्याची शपथ ... ... ... | ५० |
| २० शहाजीस अटक ... ... ... | ५३ |
| २१ केलें परा ते आलें घरा ... ... ... | ५५ |
| २२ स्वामिभक्त बाजी देशपांडे ... ... ... | ५९ |
| २३ त्रिवेणी संगम . ... ... ... | ६२ |

| गोष्टीचें नांव | पृष्ठांक |
|---|---|
| २४ मामांची तिरपीट ... ... ... | ६५ |
| २५ प्रभुवीर मुरारबाजी .... ... ... | ६८ |
| २६ शक्तीवर युक्तीचा विजय ... ... ... | ७० |
| २७ गड आला पण सिंह गेला ... ... ... | ७४ |
| २८ साल्हेरचें नवीन युग ... ... ... | ७७ |
| २९ शिवराज्याभिषेक ... ... ... | ७९ |
| ३० शिवाजीचें आरमार ... ... ... | ८३ |
| ३१ शिवाजीची राज्यव्यवस्था व अंत ... ... | ८४ |
| ३२ कुसंगतीनें केलेला कहर ... ... ... | ८७ |
| ३३ स्वराज्याचा अस्तोदय .. ... ... | ९० |
| ३४ भाऊबंदकी ... ... ... ... | ९३ |
| ३५ देशमुखाचा पेशवा ... ... ... | ९५ |
| ३६ मित्रप्रेमाचा कळस ... ... ... | ९८ |
| ३७ बाजीरावाच्या भराऱ्या ... ... ... | १०० |
| ३८ स्वराज्याचें साम्राज्य ... ... ... | १०४ |
| ३९ बेकीची एकी ... ... ... ... | १०७ |
| ४० चिमाजी आप्पाची चिकाटी... ... ... | १०८ |
| ४१ भरभराटीचा कळस ... ... ... | ११० |
| ४२ कळसावरून कडेलोट, दोन मोत्यें गळून पडलीं ... | ११२ |
| ४३ स्वराज्याची स्थीरस्थावर ... ... ... | ११४ |
| ४४ ‘ ध ’ चा ‘ मा ’ करणारी आनंदीबाई ... | ११६ |
| ४५ मराठी राज्याचा शेवटचा विजय ... ... | ११८ |
| ४६ दुर्दैवाचा कहर ... ... ... ... | ११९ |
| ४७ मराठी राज्य कां बरें बुडालें ? ... ... | १२० |
| ४८ इंग्रजी राजसत्ता ... ... ... | १२३ |

## चित्रें.


| | | |
|---|---|---|
| १ | शिवाजी ... ... ... ... | ३६ |
| २ | रामदास ... ... ... ... | ६४ |
| ३ | औरंगजेब ... ... ... ... | ८९ |
| ४ | बाजीराव ... ... ... ... | १०१ |
| ५ | नानासाहेब ... ... ... ... | १११ |
| ६ | नाना फडणीस ... ... ... ... | ११६ |
| ७ | महादजी शिंदे ... ... ... ... | ११७ |
| ८ | एलफिन्स्टन ... ... ... ... | ११८ |
| ९ | पंचमजॉर्ज बादशहा ... ... ... | १२३ |
| १० | महाराणी मेरी ... ... ... ... | १२५ |

# महाराष्ट्राचा सोपा इतिहास.

## हितगुज.

बालमित्रांनो, सांगा पाहूं असा एक तरी मनुष्य सापडेल का कीं ज्याला आपला देश व आपले वाडवडील यांची हकीगत वाचावीशी वाटणार नाहीं ? काय म्हणतां, असा स्वाभिमान-शून्य मनुष्य कोठेंच आढळणार नाहीं ? अगदीं बरोबर आहे. जगांत कोठेंही गेलें तरी मन व डोळे लागलेले असतात जन्म-भूमीकडे. तेव्हां हा आपला महाराष्ट्रदेश अगदीं आरंभीं कोणत्या स्थितींत होता, त्याला चांगले दिवस कोणीं दाखवून दिले, त्याला चांगले दिवस दाखवावयाला आपल्या थोर पूर्वजांना काय काय कष्ट करावे लागले, देशासाठीं देह कसा झिजवावा लागला व शेवटीं त्यांची देशभक्ति व चिकाटी पाहून देवराया कसा खूष झाला व त्यांची परीक्षा पास झाल्यामुळें यशरूपीं बक्षीस देवरायानें त्यांना पाठ थोपटून कसें दिलें हें सर्व मी तुम्हांला सांगणार आहें. हो पण जरा थांबा. ज्या-प्रमाणें आपल्या पूर्वजांच्या थोर पराक्रमामुळें हा आपला देश कसा भरभराटीस चढला हें सांगणार आहें, त्याचप्रमाणें आपल्या कांहीं पूर्वजांनीं कोणत्या चुका केल्या व त्यामुळें आपल्या प्रिय देशाचें कसें नुकसान झालें हेंही सांगणार आहें. तुम्ही म्हणाल थोर पुरुषांच्या पराक्रमाविषयीं सांगा म्हणजे झालें. चुकांविषयीं कशाला सांगतां ? हो प्रश्न अगदीं बरोबर आहे.

त्याचें कारण असें: ज्याप्रमाण हें शुद्ध की व हें अशुद्ध की ह्या दोनही गोष्टी जेव्हां व्याकरण आपल्याला शिकवितें तेव्हांच आपल्याला शुद्ध भाषा बोलावयास येते. त्याचप्रमाणें आपण सद्गुणी व पराक्रमी व्हावें म्हणून पूर्वजांच्या पराक्रमाच्या गोष्टी सांगितल्या पाहिजेत, त्याचप्रमाणें आपण तसल्या चुका करूं नये म्हणून पूर्वी कोणत्या चुका झाल्या व त्यांचा काय भयंकर परिणाम झाला हेंही सांगितलें पाहिजे. कारण आपल्या देशाचा इतिहास कशासाठीं वाचायचा ? अशासाठीं कीं, पुढच्यास ठेंच मागचा शहाणा या न्यायानें आपण पूर्वी झाल्या तशा चुका करूं नये व पूर्वीच्या थोर पुरुषांनीं जसें सद्वर्तन केलें तसें करावें.

तेव्हां आतां शेवटीं तुम्हांला सांगायचें हेंच कीं, आतां मी तुम्हांला ज्या मनोरंजक गोष्टी सांगणार आहे त्या मन लावून ऐका, व ध्यानांत ठेवा. त्या सर्व तुम्हीं लक्ष्यांत ठेवल्या म्हणजे तुमच्या देशाचा इतिहास तुम्हांला माहित नाहीं असें कोणालाही म्हणतां येणार नाहीं. त्या सर्व लक्ष्यांत ठेविल्या म्हणजे आपला देश व आपले थोर पूर्वज यांच्याबद्दल प्रेम, आदर व भक्ति तुमच्या मनांत नेहमीं राहील. ज्यांच्या मनांत स्वदेशाबद्दल व पूर्वजांबद्दल प्रेम, आदर व भक्ति नेहमीं भरलेली असते ते थोर होतात, सद्गुणी होतात व त्यांचेवर देव प्रेम करतो.

---

### गोष्ट २ री.

## आपण मराठे व आपला देश महाराष्ट्र.

कितीही वर्णन केलें, कितीही मर्यादा सांगितल्या तरी चटकन बरोबर कल्पना जशी नकाशा पाहतांच येते तशी कांहीं एरवीं येणार नाहीं, म्हणून हा पहा आपल्या महाराष्ट्राचा नकाशा. महाराष्ट्र म्हणजे मोठें राष्ट्र. कसें आहे आपल्या देशाचें नांव !

आपला देश खरोखरच नांवाप्रमाणें मोठा होता व आजही मोठा आहे. देश मोठा कसा होतो सांगा पाहूं ? काय म्हणतां, त्या देशांतल्या लोकांच्या पराक्रमानें ? होय बरोबर आहे. मराठे असेच थोर पराक्रमी होते, म्हणून हा महाराष्ट्र खरोखरीचें महाराष्ट्र झाला. हो, पण आपण मराठे कसे ? आपणांपैकीं कांहीं ब्राह्मण, प्रभू, सोनार, तर कांहीं यहुदी, पारशी, मुसलमान व ख्रिस्ती आहेत.—बाळांनों, सांगतों कसें तें.—असा नियम आहे, कीं जो कोणी इंग्लंडांत जन्मेल तो इंग्लिश व त्याला इंग्लिशांचे सर्व हक्क प्राप्त व्हावयाचे. आपल्या हिंदुस्तानांतले कांहीं लोक इंग्लंडांत जन्म पावल्यामुळें त्यांना इंग्लिशांचे हक्क मिळाले आहेत. तात्पर्य हें कीं, आपल्या निरनिराळया जाती असल्या तरी आपण सर्व महाराष्ट्राचीं लेंकरें आहों. आपण जरी निरनिराळया धर्मांचे असलों तरी महाराष्ट्र ही आपली जन्मभूमि आहे. व ज्यांची ज्यांची म्हणून महाराष्ट्र ही जन्मभूमि आहे ते सर्व आपण मराठे. आपले हल्लींचे व्हाइसरॉय लॉर्ड रेडिंग धर्मानें यहुदी आहेत तरी ते आपल्याला इंग्रजच म्हणवितात व आपण सर्व त्यांना इंग्रज म्हणतों. तर मग हें लक्षांत ठेवायचें, कीं महाराष्ट्रांतील आपण सर्व मराठे.

आतां जरी आपला हा महाराष्ट्रदेश मोठा झाला आहे, आतां जरी त्यांत मोठालीं शहरें आहेत, तरी हा पूर्वीं अगदीं भयाण होता. यांत मोठें थोरलें एक अरण्य होतें. याला तेव्हां दण्डकारण्य म्हणत असत. तेव्हां या ठिकाणीं फार दुष्ट व धिप्पाड असे रानटी लोक रहात असत. त्यांच्या राजाचें नांव रावण. तो लंकेंत रहात असे. प्रभु रामचंद्र अयोध्येहून इकडे आले होते व पुष्कळ वर्षें गोदावरी नदीचे कांठीं नाशीक नांवाचें सुंदर व उत्तम हवा पाण्याचें शहर आहे तेथें आश्रम बांधून राहिले होते. त्यांचे बरोबर त्यांची बायको सीतादेवी व प्रेमळ पाठचा भाऊ

लक्ष्मण त्यां आश्रमांत रहात असत. या ठिकाणच्या त्या राक्षसांचा, प्रभु रामचंद्रानें नायनाट केला व सज्जनांना रहाण्यास हें ठिकाण निर्भय व योग्य असें केलें. नंतर येथील लोकांनीं सतत उद्योग करून अरण्यांतील झाडी तोडून मोठालीं गांवें व शहरें बांधलीं, यामुळें या ठिकाणाचें दंडकारण्य हें नांव जाऊन त्याला महाराष्ट्र हें बहुमानाचें नांव मिळालें.

या आपल्या महाराष्ट्रांत पहिल्या प्रथम शालीवाहन वंशाचे लोक आले. त्या वंशांतील राजांनीं पुष्कळ वर्षं महाराष्ट्रांत राज्य केलें, व देशाची स्थिति सुधारली. यानंतर चालुक्य, राष्ट्रकूट, भोज, मौर्य, कदंब, शिलाहार, व यादव या वंशाचे लोक उत्तरेकडून इकडे आले. त्यांनीं येथें निरनिराळया प्रदेशांत राज्यें स्थापिलीं. नंतर बऱ्याच वर्षांनीं तीं राज्यें नाहींशीं झालीं. या वंशांपासून व अशाच दुसऱ्या उत्तरेकडील वंशांपासून हल्लींची बरींच घराणीं उत्पन्न झालीं.

---

गोष्ट ३ री.

## देवांची देवगिरी.

बाळांनो,आपल्या या देशाला महाराष्ट्र हें नांव शोभतें,कारण हा देश पहिल्यापासून मोठमोठ्या पराक्रमी व सदाचरणी राजांनीं व सज्जनांनीं नटलेला होता. फार तर काय पण प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण हे देखील मथुरानगरी टाकून या महाराष्ट्राचे जवळ द्वारकेस राज्य करावयास व सर्व लोकांना सुखी करावयास आले होते. आपला कृष्ण द्वारकेस जातो हें यादवांना समजलें. यादव कृष्णाचे नात्यागोत्याचे. यादव कृष्णाचे जीव कीं प्राण. यामळें कृष्णामागून तेही द्वारकेस आले. त्यांनीं

या आपल्या महाराष्ट्रांत मोठमोठालीं राज्यें स्थापिलीं. महाराष्ट्र त्यांवेळीं फार भरभराटीस आलेलें होतें. देवगिरीचे यादव राजे हे मथुरेच्या या यादवांचेच वंशज. भगवान् परमात्मा श्रीकृष्ण याचे आपण वंशज आहों ही गोष्ट देवगिरीचे यादव राजे नेहमीं लक्ष्यांत ठेवीत. देवाचे वंशज म्हणून आपल्या राजधानीचें नांव त्यांनीं देवगिरी असें ठेविलें व आपल्या नांवापुढें देव असें पद ते जोडूं लागले, म्हणूनच कृष्णदेव, रामदेव, शंकरदेव याप्रमाणें त्यांचीं नांवें इतिहासांत प्रसिद्ध आहेत.

समजलेंना बाळांनों, या गोष्टीला देवांची देवगिरी असें मीं नांव दिलें त्याचें कारण ? ठीक आहे. या देवगिरीच्या देव• राजांची नीट आठवण ठेवा बरें. याच देवांचें आडनांव यादव. या यादव शब्दांत थोडा फरक झाला व हा यादवांचा वंश पुढें जाधव या नांवानें प्रसिद्धीस आला. हें जाधव नांव आपल्या मराठ्यांच्या इतिहासांत फार प्रसिद्ध आहे. आपले शिवाजीमहाराज यांची सुशील माता जिजाबाई ही जाधवांचीच मुलगी. तेव्हां आपले शिवाजी महाराज आईच्या बाजूनें प्रत्यक्ष भगवान श्री कृष्णाचे वंशज होते हें उघड आहे. असो.

यादवराजांचे वेळीं सर्व प्रजा धर्मानें वागत असे. त्यावेळीं लोक सुखी व समाधानी असत. यादवांनीं विद्येचा प्रसार करण्याकरितां पुष्कळ पैसा खर्च केला. कवी व ग्रंथकार यांना यादवराजांचा चांगला आश्रय असे. यामुळें या यादवांचे वेळीं पुष्कळ ग्रंथकार व प्रसिद्ध कवी या आपल्या महाराष्ट्रांत होऊन गेले. प्रसिद्ध कवी मुकुंदराय हे याच वेळीं झाले. मुकुंदरायांनीं विवेकसिंधु नांवाचा एक सुंदर ग्रंथ लिहिला आहे.

वैभवशाली यादवांची राजधानी देवगिरी ही त्यांचा मूळ पुरुष राजा भिल्लम यानें ११८७ सनांत स्थापन केली. या यादव वंशांत सिंघण, कृष्णदेव, महादेव, रामदेव हे राजे मोठे परा-

क्रमी व वैभवशाली होऊन गेले. सर्वांत अत्यंत पराक्रमी वैभवशाली राजा रामदेव हा होय. याच्या कारकीर्दीत देवगिरी म्हणजे संपत्तीचें माहेरघर होऊन बसली. गुलाबाचें फूल फुललें म्हणजे त्याचा सुगंध दाही दिशांना पसरतो, त्याप्रमाणें देवगिरीच्या संपत्तीची बातमी सर्व दिशांना पसरली.देवगिरी येथील संपत्तीच्या गोष्टी ऐकून प्रत्यक्ष दिल्लीच्या लोकांच्याही तोंडास पाणी सुटलें.

देवगिरीच्या लोकांची भरभराट झाल्यामुळें त्यांची मराठी भाषाही भरभराटीस आली. यादवांच्या अमदानींत मराठी भाषा नवीन जोमानें व नवीन रूपानें पुढें आली. तिला शोभा देण्यासाठीं व तिला श्रीमंत करण्यासाठीं कवींमध्यें व देवभक्तांमध्यें हिऱ्यासारखे चमकणारे ज्ञानदेव त्याचे दोन भाऊ व एक बहीण यांनीं मराठींत सुंदर ग्रंथ लिहिले. ज्ञानेश्वरीसारखा सन्मार्गदर्शक उत्तम धर्मग्रंथ राजा रामदेव यादव याचे कारकीर्दींत श्री ज्ञानदेव यांनीं लिहिला. याच रामदेवाच्या कारकीर्दींत बोपदेव, चांगदेव व मुकुंदराज यांनीं उत्तम व उपदेशपर धर्मग्रंथ लिहिले. सुप्रसिद्ध वैद्यक ग्रंथ शारंगधरसंहिता याच काळांत शारंगधरानें लिहिला. त्याचप्रमाणें सुप्रसिद्ध हेमाद्रि उर्फ हेमाडपंत हा शूर व विद्वान् ग्रंथकार याच रामदेवाच पदरीं होता. या हेमाडपंताची ओळख तुमची पुस्ती व मोडी पुस्तक तुम्हांला करून देईलच. यानेंच मोडी लिपी प्रथम सुरू केली. यानें ठिकठिकाणीं लोकांच्या उपयोगाकरितां मोठमोठ्या रस्त्यांवर धर्मशाळा, विहिरी, तलाव व देवळें बांधलीं. त्यांपैकीं बरींच अजूनही पहावयास सांपडतात. सर्व बाजूंनीं आपल्या सुखासाठीं ज्यानें कष्ट केले अशा या हेमाडपंताची आठवण बाळांनों, आपण नेहमीं ठेविली पाहिजे.

सांगा पाहूं बाळांनों, इतके थोर हिऱ्यासारखे तेजस्वी, चंदनाप्रमाणें देशासाठीं देह झिजविणारे व मायभाषेसाठीं उत्तम

ग्रंथ लिहिणारे सत्पुरुष ज्यांच्या कारकीर्दींत झाले त्यांचें देव हें नांव व यादव हा वंश अत्यंत पूज्य मानला पाहिजे कीं नाहीं ? देवच ते ! तेव्हां त्यांच्या देवराज्यांत व देवगिरींत देवासारखे उदार, पराक्रमी, परोपकारी व विद्वान् पुरुष व स्त्रिया झाल्या हें योग्यच झालें.

---

## गोष्ट ४ थी.

# भरतीमागून ओहटी.

किती तरी तो रामदेवांच्या कारकीर्दीचा सुखाचा काळ ! पण सर्वच दिवस सारखे नसतात. सुखाचे दिवस नेहमींच रहात नाहींत. सुखामागून दुःख, श्रीमंतीमागून गरीबी, भरतीमागून ओहटी असें चालावयाचेंच. रामदेव यादव यांचे कारकीर्दींत लोकांच्या वैभवाला व सुखाला अतिशय भरती आली होती. समुद्राला पूर्ण भरती आली, लाटा जोरजोरानें किनाऱ्यावर आदळूं लागल्या कीं, समजावें आतां थोड्या वेळानें ओहटी लागणार. तसेंच महाराष्ट्रांत झालें. बाळांनों, मागें तुम्हांला सांगितलेंच आहे कीं, देवगिरींच्या संपत्तीच्या गोष्टी ऐकून प्रत्यक्ष दिल्लीवाल्याच्या तोंडास पाणी सुटलें ! याचा परिणाम असा झाला कीं, मोठें सैन्य घेऊन दक्षिणेकडे जावें, महाराष्ट्रांत शिरावें व देवगिरीवर हल्ला करून तेथील राजांची संपत्ति लुटून आणावी अशी इच्छा अल्लाउद्दीन यास झाली. हा अल्लाउद्दीन दिल्लीचा बादशाहा जलालउद्दीन याचा पुतण्या. हा उत्तर हिंदुस्थानांत कुरा येथें सुभेदार होता. त्याला देवगिरींच्या संपत्तीची बातमी लागतांच आठ हजार सैन्य बरोबर घेऊन देवगिरीवर चालून जाण्याचा व तेथील अलोट संपत्ती लुटून

आणण्याचा बेत त्यानें केला. पुष्कळांनीं त्याला सांगितलें कीं, कुरा येथून देवगिरी ७०० मैल दूर आहे. वाटेंत भयंकर जंगलें आहेत. विंध्याद्रीसारखे उंच पर्वत व नर्मदेसारख्या मोठ्या नद्या आहेत. पण या सर्व संकटांना त्यानें जुमानलें नाहीं. वाटेंत भयंकर लोक आहेत असें त्याला समजलें तरीही कचरला नाहीं. हिंदुलोक स्वभावानें सरळ व भोळे असतात, हें त्याला ठाऊक होतें. यामुळें त्यांना थाप देऊन आपण दाक्षिणेंत जाऊं, ते आपल्या वाटेस जाणार नाहींत असें त्याला वाटलें, व झालेंही तसेंच. कुरा येथून तो सन १२९३ त ८००० सैन्या-सह निघाला. वाटेंत 'मी माझा चुलता दिल्लीचा बादशहा याचेशीं भांडून तैलंगणचे राजाकडे नोकरी धरण्यास जात आहें' अशी त्यानें थाप दिली. यामुळें कोणी त्याचे वाटेस गेला नाहीं. हा सांगतो हें खरें कीं खोटें याची नुसती चवकशी देखील कोणीं केली नाहीं, इतके आपले लोक भोळसट ! शौर्य, धैर्य, वगैरे उत्तम गुण जरी अंगीं असले तरी या भोळसटपणानें त्या सर्वांचें मातेरें होतें ही गोष्ट यावेळीं चांगलीच कळून आली. अल्लाउद्दीन प्रत्यक्ष देवगिरीच्या किल्ल्याच्या पायथ्याशीं आलातरी आपले सर्व थंडच. यादव राजा रामदेव हा सहज देवदर्शनास चालला होता, तेव्हां त्याला अल्लाउद्दीन आपल्या राजधानी-जवळ आल्याची बातमी समजली, तें ऐकून तो घाबरला, कारण त्याचें सैन्य राज्यांत दूर अंतरावर कामगिरीसाठीं गेलें होतें. त्याचा शूर मुलगा शंकरदेव हाही तेथें नव्हता. तोही सैन्याबरोबर गेला होता. शेवटीं नाइलाज म्हणून रामदेव यानें धांवपळ करून शहरांतले कांहीं लोक व आपले चाकरनोकर यांचें एक सैन्य तयार केलें, व तो अल्लाउद्दीनाशीं लढण्यास उभा राहिला. पण असल्या आयत्या वेळीं जमविलेल्या सैन्याचा अल्लाउद्दीनानें लगेच पराभव केला. तेव्हां रामदेव आपल्या

लोकांसह देवगिरीच्या किल्ल्यांत गेला. अल्लाउद्दीनानें लगेच त्या किल्ल्याला वेढा दिला व शहर लुटण्यास सुरवात केली. त्यानें लोकांवर अतिशय जुलूम करून त्यांची संपत्ती लुटली. तरी तो किल्ला त्याला घेतां येईना. तेव्हां त्यानें अशी बातमी उठविली कीं, ' मी फक्त एक लहानशी टोळी घेऊन पुढें आलों आहें, माझें मोठें बादशाही सैन्य मागून येत आहे ' भोळा बिचारा रामदेवराव ! त्याला ही अल्लाउद्दीनाची गप्प खरी वाटली. व तो घाबरून गेला. इकडे किल्ल्यांतील धान्य संपलें, तेव्हां पुष्कळ संपत्ती देऊन त्यानें अल्लाउद्दीनाशीं तह केला ! अशा तऱ्हेनें दुसऱ्यांदा त्याच्या थापेचा त्याला फायदा मिळाला, व भोळसटपणाचें फळ रामदेवाला मिळालें. या भोळसटपणानें आणखी एकदां असेंच नुकसान झालें. तें असें:—तह होऊन अल्लाउद्दीन आनंदानें परत जाण्यास निघणार, इतक्यांत रामदेवाचा मुलगा शंकरदेव मरुय जय्यत सैन्य घेऊन आला तरी रामदेवानें त्याला 'लढाई करूं नको, तह झाला आहे' असा निरोप पाठविला,पण तो निरोप शंकरदेवानें मानला नाहीं, व तो आपल्या सैन्यासह अल्लाउद्दीनावर तुटून पडला. शंकरदेवाच्या सैन्यानें शौर्याची शिकस्त केली. अल्लाउद्दीन व त्याचें सैन्य अगदीं पराभव होण्याच्या बेतांत आलें. त्याच्या सैन्याचा समूळ नाश होण्याची वेळ आली, इतक्यांत किल्ल्याचे रक्षणास दुसरीकडे ठेवलेला रामदेवाचाच एक सरदार आपले थोडे लोक घेऊन जरूर नसतां शंकरदेवास मदत करण्याकरितां आला. त्याच्या सैन्याच्या पायांनीं उडालेली धळ शंकरदेवाच्या सैन्यानें पाहिली. भोळसटच ते, त्यांना वाटलें अल्लाउद्दीनाचें मोठें बादशाही सैन्य दिल्लीहून त्याचे मदतीस येत आहे. आतां आपला चक्काचूर होणार ! या खोट्या भीतीनें घाबरल्यामुळें शंकदेरवाचें सैन्य सैरावैरा पळूं लागलें. या लें

अल्लाउद्दीनास जय मिळाला. क्षां कशी आहे आपली गम्मत ! बाळांनो, पाहिलात हा भोळसट भेकडपणाचा परिणाम. हाच दुर्गुण जिथें तिथें नडतो. यासाठीं याला जवळ येऊं देऊं नका.

झालें आरंभीं सांगितल्याप्रमाणें भरती संपून अशा तऱ्हेनें देवगिरीच्या वैभवास ओहटी लागली. त्याला कारण भोळसट-पणा. असो, पुनः पराभव झाला यामुळें आतां अल्लाउद्दीनाला अधिकच जोर आला. तेव्हां त्याला आणखी पुष्कळ संपत्ती व कांहीं प्रांत देऊन रामदेवानें त्याचे बरोबर कसाबसा तह करून त्याची दिल्लीस रवानगी केली.

अशा तऱ्हेनें मुसलमानांचा दक्षिणेंत प्रवेश झाला. नंतर कांहीं वर्षांनीं रामदेव दिल्लीस खंडणी पाठवीनासा झाला म्हणून सन १३०६ त अल्लाउद्दीनानें मलीक काफूर या सरदारास सैन्य बरोबर देऊन देवगिरीवर पाठविलें. त्यानें रामदेवाच्या राज्यांत लुटालूट चालविली. तेव्हां भिऊन जाऊन रामदेवानें अल्ला-उद्दीनाशीं दिल्लीस जाऊन तह केला. यापुढें मरेपर्यंत रामदेवानें अल्लाउद्दीनास खंडणी दिली. त्याचे मागून शंकरदेव देवगिरीचा राजा झाला. तो अल्लाउद्दीनाला खंडणी देईना तेव्हां पुन मलीक काफूर यानें देवगिरीवर १३१२ त हल्ला केला, देव-गिरी घेतली, राजा शंकरदेव याला ठार मारलें व सर्व महाराष्ट्रदेश मुसलमानी सत्तेखालीं आणला व अपार संपत्ती घेऊन काफूर दिल्लीस गेला. अशा तऱ्हेनें या महाराष्ट्राचे वैभवाचा सूर्य रामदेवाचे वेळीं आकाशाचे मध्यावर आला व शंकरदेवाच्या वेळीं तो मावळला व जिकडे तिकडे अंधार पडला, भरती गेली व ओहटीची सीमा झाली.

गोष्ट ५ वी.

## आपली मराठी भाषा.

जन्मभूमि जशी आपली माता तशीच आपली भाषा ही देखील आपली माताच समजली पाहिजे. मायभाषा प्रत्येक सत्पुत्राला प्रिय असलीच पाहिजे.आपल्याला बा, बा, दा, दा, करतां येऊं लागल्यापासून तों मरेपर्यंत जी आपल्या जिभेवर नेहमीं आनंदानें रहाते त्या मायभाषेबद्दल आपल्याला अतिशय प्रेम वाटतें हें योग्यच आहे. आपले पूर्वज कसे होते त्यांनीं काय काय पराक्रम केले हें आपणाला समजून घ्यावेंसें वाटतें, आणि म्हणूनच आपल्या पूर्वजांचा इतिहास आपण आवडीनें वाचतों. त्याचप्रमाणें आपली मायभाषा कधीं जन्माला आली, तिची आई कोण, तिची आजी कोण, तिचें बाळपणीं लालन-पालन कोणीं केलें, कोणत्या थोर विद्वान् कवींनीं व ग्रंथकारांनीं तिला श्रीमंत केलें, कोणत्या ग्रंथकारांनीं तिला आजचें जोमदार रूप आणून दिलें हें समजावें, असें बाळांनों,तुम्हाला सहजच वाटणार, म्हणून आपल्या भाषेच्या भरभराटीची हकीगत आतां मी तुम्हांला सांगतों. आतांच महाराष्ट्राची भरभराट होऊन नंतर त्याच्या वैभवाला कशी ओहटी लागली हें तुम्हांला सांगितलें. यामुळें तुमच्या कोवळ्या मनाला फार वाईट वाटलें, यामुळें आतां मनाला आनंद देणारी मराठी भाषेच्या भरभराटीची हकीगत तुम्हाला सांगतों. महाराष्ट्रांतील राज्यांच्या वैभवाला भरती आली व नंतर ओहटी आली. तसें कांहीं आपल्या भाषेचें झालें नाहीं. मराठी भाषेची पुण्याई मोठी. सुखाच्या काळांत, त्याच राज्यांत मराठी भाषा जोमानें वाढतच राहिली. पूर्वीच्या भरभराटीची आठवण मराठीनें आपल्या सत्पुत्रांना दिली. हल्लींचे वाईट

दिवस जातील व पुनः चांगले दिवस तुम्हांला खात्रीनें येतील, असें पाठ थोपटून मराठीनें आपल्या पूर्वजांना सांगितलें, त्यांना धैर्य दिलें यामुळें मराठ्यांचा वैभवसूर्य मावळला होता तो शिवरायाच्या रूपानें पुनः उगवला. तेव्हा आपल्या भाषेचे आपल्यावर किती उपकार आहेत बरें.

अशी ही आपली मायभाषा मराठी, महाराष्ट्री नांवाच्या प्राकृत भाषेपासून जन्माला आली व महाराष्ट्री ही संस्कृत भाषेपासून निघाली, म्हणजे आपली मराठी भाषा ही संस्कृत भाषेची नात व महाराष्ट्रीची मुलगी. ही आपली मराठी भाषा इसवी सनाच्या सहाव्या शतकांत जन्मास आली.

महाराष्ट्रांतील लोक पहिल्यापासून हुशार, शूर व विद्वान् असल्यामुळें त्यांची भाषा त्यांच्याप्रमाणेंच जोरदार व सर्वांगांनीं परिपूर्ण अशी झाली, कारण जसे लोक तशी त्यांची भाषा. फार प्राचीन काळापासून या आपल्या मराठी भाषेंत विद्वानांनीं वैद्यक, तत्वज्ञान, गणित, ज्योतिष, धर्मशास्त्र इतिहास वगैरे विषयांवर उत्तम ग्रंथ लिहून तिला श्रीमंत करून ठेविलें आहे. इसवी सन६००मध्यें जन्माला आलेली आपली मराठी भाषा सुमारें तीनशें वर्षें वाढत होती. इ. स.९००च्या सुमारास तिला तारुण्यदशा प्राप्त झाली. लहानपणापासून या आपल्या मराठी भाषेचें लालनपालन तिची आजी संस्कृत भाषा हिनें फार प्रेमानें केलें. अजूनही या मराठी भाषेवर तिची आजी संस्कृत भाषा फार प्रेम करिते व तिला जेव्हां जेव्हां नड पडेल तेव्हां वाटेल तितके व वाटेल त्या विषयावरचे संस्कृत शब्द देते. यामुळें आपली मराठी आपल्या आजीच्या वळणावर गेली आहे. संस्कृतप्रमाणेंच मराठी मोहक झोंकदार व गोंडस बनली आहे. भाषेला नांवालौकिकाला कवी आणीत असतात. कवी हे भाषेचे सुंदर अलंकार आहेत. आपल्या मराठीचा सर्वांत

मोलवान् व तेजस्वी अलंकार कोणता सांगा पाहूं ? अं, इतका उशीर ? बाळांनों ज्ञानेश्वर महाराज हेच आपल्या मराठीचे पहिले व अत्यंत तेजस्वी अलंकार आहेत. ज्ञानेश्वरांनीं सर्व जगाला वंदन करण्यास योग्य असा परमेश्वराचें ज्ञान देणारा ज्ञानेश्वरी नांवाचा मोलवान् ग्रंथ इसवीसनाच्या तेराव्या शतकांत लिहिला. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मराठी भाषा जिवंत आहे तोंपर्यंत कधींहि नाहींसा होणार नाहीं. ज्ञानेश्वरी म्हणजे ज्ञानदेवांची अमरवाणी आहे; ज्ञानेश्वरी म्हणजे या लोकांतलें अमृत आहे. ज्ञानेश्वरी मराठी भाषेला मरूं देणार नाहीं. मराठी भाषा आपल्या जोमदार स्वरूपानें ज्ञानेश्वरी ग्रंथांत क्रीडा करितांना दिसते. ज्ञानेश्वरीनंतर ३०० वर्षांनीं म्हणजे सोळाव्या शतकांत मराठी राज्य नाश पावलें पण मराठी भाषा नाश पावली नाहीं. तिचा राजाश्रय नष्ट झाला तरी तिची वाढ सारखी चालूच राहिली. तिचा राजाश्रय गेला पण राजाश्रयापेक्षांही अधिक किंमतीचा असा संताश्रय तिला मिळाला. निरनिराळ्या संतांनीं आपलीं भक्तिरसानें भरलेलीं सुंदर काव्यें मराठींत लिहून तिला बाळसेदार, गोंडस व बांधेसूद बनविलें. त्यांनीं तिला प्रेमळ व मोहक सौंदर्य आणून दिलें. महालिंगदास, एकनाथ, सरस्वति गंगाधर, विष्णुदास नामा, तुकाराम यांनीं मुसलमानी राज्यांत तिचें मोठ्या प्रेमानें संगोपन व संवर्धन केलें. पुढें तर शिवाजी महाराजांनीं १७ शतकांत मराठी राज्य स्थापन केलें, तेव्हां मराठीचा मोठाच उत्कर्ष झाला. आणि मुक्तेश्वर, वामनपंडित, श्रीधर व मोरोपंत वगैरे कवींनीं आपल्या मराठीस उत्कृष्ट भाग्यास चढविलें. कवी व ग्रंथकार यांनीं मराठीला श्रीमंत केलें, तर मराठी राजांनीं तिला ग्वाल्हेरपासून थेट तंजावरपर्यंत क्रीडा करण्यास मुलूख मिळवून दिला. मराठ्यांच्या

सत्तेचा उत्कर्ष शिखराला पोहोंचला तेव्हां मराठी भाषा उत्तरेस ग्वाल्हेरपासून दक्षिणेस तंजावरपर्यंत बोलण्यांत येत होती. मधल्या मुसलमानी अमलांत मराठीची फारशी भाषेशीं मैत्री जुळली व गुणग्राहक मराठी भाषेनें व्यवहार व राज्य-कारभार यांत उपयोगी पडणारे डौलदार फारशी शब्द आपलेसे करून आपली तिजोरी भरली. ज्याप्रमाणें मुसलमानी अमलांत फारशी शब्द पटकावण्यास मराठीनें कमी केलें नाहीं, त्याच-प्रमाणें इंग्रजी अंमल चालू झाल्यापासून अलीकडच्या नवीन शास्त्रांतील व शोधांसंबंधीं इंग्रजी शब्द आपल्या तिजोरींत घेऊन आपला शब्दसंग्रह मराठीनें अतोनात वाढविला आहे. ती आतां फारच श्रीमंत झाली आहे. ती आपल्याला वाटेल त्या विषयावर लेख लिहिण्यास उपयोगी पडूं लागली आहे. पूर्वीच्या विद्वानाप्रमाणें हल्लींचे विद्वानही तिची वाढ निरनिराळे ग्रंथ लिहून व निरनिराळे शब्द तयार करून करीतच आहेत हें योग्यच आहे. सत्पुत्र असेंच आईचें वैभव वाढवीत असतात. बाळांनों, तुम्ही देखील विद्वान व्हा, सुंदर ग्रंथ लिहा व आपल्या या मराठी भाषेच्या खजिन्यांत आणखी भर घाला.

---

गोष्ट ६ वी.

## अलौकिक प्रामाणिकपणा व स्वामिभक्ति.

मराठी सत्ता महाराष्ट्रांतून कशी नाहींशी झाली हें बाळांनों तुम्हांला सांगितलेंच आहे. देवगिरीचें मराठी राज्य बुडालें व दिल्लीच्या बादशहाचा अम्मल आपल्या महाराष्ट्रावर चालू झाला. दिल्लीच्या बादशहानें महाराष्ट्राचा कारभार चालविण्या-

साठीं एक स्वतंत्र अधिकारी नेमला व त्याला दक्षिणचा सुभेदार असा किताब दिला.

इस्मइलखान नांवाचा सुभेदार महाराष्ट्राचा कारभार दिल्लीच्या बादशहाच्या वतीनें पहात असतां इ० स० १३४७ त गुजराथेंत बंड झालें. तेव्हां दिल्लीचा बादशहा महंमद तघलख यानें हसन नांवाच्या सरदारास तें बंड मोडण्यास पाठविलें. सुभेदार इस्मइलखान व हसन यांनीं तें बंड मोडलें. हें सर्व ठीक झालें. पण इस्मइलखान याची एक चूक झाली. ती ही कीं, त्यानें कांहीं बंडखोरांस आश्रय दिला. ही गोष्ट बादशहास कळली. तेव्हां आतां बादशहा आपणांस जबर शिक्षा करील अशी इस्मइलखान व हसन यांस भीति पडली. म्हणून त्यांनीं स्वतःच बादशहाच्या विरुद्ध बंड केलें. इस्मइलखानानें नासिरुद्दीन हा किताब धारण केला व हसनानें जाफरखान हा किताब धारण केला. नंतर त्यांनीं देवगिरी ऊर्फ दौलताबाद शहर घेऊन स्वतंत्र राज्य स्थापन केलें. बादशहा महंमद तघलख याचें सैन्य या बंडाचा मोड करण्याकरितां आलें होतें, त्याचा हसन उर्फ जाफरखान यानें पराभव केला. व बेदर व कंधारी हे किल्ले घेतले. नंतर इस्मइलखानानें सर्व सत्ता जाफरखानाचे स्वाधीन केली. तेव्हां जाफरखान यानें अल्लाउद्दीन हसन असा किताब धारण केला व कलबुर्गा या शहरास हसनाबाद असें नांव देऊन तें आपलें राजधानीचें शहर बनविलें. अशा तऱ्हेनें हसन, सुलतान ऊर्फ राजा झाला. हा हसन मूळचा एक क्षुल्लक गुलाम होता. मग हा गुलाम असून राजा कसा झाला असें बाळांनो, सहजच तुम्ही विचाराल. बाळांनो, हा सर्व त्याच्या विलक्षण प्रामाणिकपणाचा प्रभाव बरें ! तो कसा तो ऐकाः—

दिल्लीस महंमद तघलख नांवाचा बादशहा राज्य करीत होता. त्याच्या पदरीं गंगू नांवाचा एक ब्राह्मण होता. त्या गंग ब्राह्मणाजवळ हसन हा गुलाम होता. हसनानें त्या ब्राह्मणाची मोठ्या प्रामाणिकपणानें नोकरी केली. यामुळें गंगू ब्राह्मण खूष झाला व त्यानें हसनाला गुलामगिरींतून मुक्त केलें व त्याला कांहीं जमीन व एक बैलांची जोडी बक्षीस दिली. हसन ती जमीन नांगरीत असतां, तींत त्याला एक मोहरांनीं भरलेला हंडा सांपडला. तो त्यानें लगेच आपला धनी गंग ब्राह्मण यास नेऊन दिला. हा त्याचा विलक्षण प्रामाणिकपणा पाहून गंगू ब्राह्मणाचें त्याच्यावर फार प्रेम जडलें. त्यानें ही सर्व हकीगत बादशहास सांगितली. तेव्हां बादशहा फार खुष झाला व त्यानें हसनाला दहा हजार स्वारांची सरदारी दिली. नंतर हसनास त्याच्या हाताखालच्या सैन्यासह बादशहानें महाराष्ट्रांत पाठविलें. तेथें त्यानें गुजराथचें बंड मोडलें व एक स्वतंत्र राज्य स्थापून तो सुलतान झाला. तो इतक्या योग्यतेस चढला तरी आपला मूळचा धनी जो गंगू ब्राह्मण याला तो विसरला नाहीं. त्यानें गंगू ब्राह्मण याला मोठ्या सन्मानानें दिल्लीहून आणिलें व त्याला आपला मुख्य खजिनदार केलें. शिवाय आपल्या ब्राह्मण धन्याचें कायमचें स्मारक करण्यासाठीं त्यानें आपल्या राज्याचें नांव ब्राह्मणी राज्य असें ठेविलें, व आपणा स्वतःला तो हसन गंगू ब्राह्मणी असें म्हणवूं लागला. हसन गंगू ब्राह्मणी याचेच पुढें हसन कांगो बहामनी झाले. बाळांनों पाहिलेंतना हें विलक्षण प्रामाणिकपणाचें व स्वामिभक्तीचें उदाहरण. धन्य असले नोकर व धन्य असले धनी ! बाळांनों असेच प्रामाणिक व्हा म्हणजे देव तुम्हांला चांगले दिवस दाखवील. पण भग-

मराठीची स्थिती प्राप्त झाल्यावर आपल्या उपकारकर्त्यास विसरून जाऊं नका बरें. उपकारकर्त्याची आठवण ठेऊन हसनाप्रमाणें स्वामिभक्तीपर्वक उपकारकर्त्याच्या उपकारांची फेड करा.

ह्या थोर हसनानें इ. स. १३४७ पासून १३५८ पर्यंत सर्व महाराष्ट्रावर राज्य केलें. त्याचे मागून त्याच्या वंशांतल्या पंधरा राजांनीं राज्य केलें. त्या सर्वांस ब्राह्मणी ऊर्फ बहामनी राजे म्हणत. हें बहामनी राज्य १४९२ मधें मोडून त्याचीं पांच राज्यें झालीं, त्यांचीं नांवें:-( १ ) विजापूरचें आदिलशाही, ( २ ) गोवळकोंड्याचें कुतुबशाही ( ३ ) वऱ्हाडचें इमाद्-शाही ( ४ ) अहमदनगरचें निजामशाही व ( ५ ) बेदरचें बरीद्शाही. या पांच राज्यांपैकीं विजापूर व अहमदनगर येथील राज्येंच विशेष प्रसिद्धीस आलीं. ह्यांच्याशीं शिवाजी महाराज व मराठे यांचा वारवार संबंध आला. त्या राज्यांतील मुलूख घेऊनच शिवाजी महाराजानीं मराठी राज्याची पुनः स्थापना केली. हीं दोनही राज्यें औरंगजेबानें बुडविलीं. बाकीचीं तीन दुबळीं राज्यें आधींच लयास गेलीं होतीं.

बहामनी राजे सर्व धर्मांच्या लोकांस आपआपल्या धर्माप्रमाणें वागण्यास मोकळीक देत असत. ते हिंदूंना त्रास देत नसत. हिंदूही त्यांचे राज्यांत शांततेनें व सुखानें शेतीभाती करून रहात असत.

---

## गोष्ट ७ वी.

# दारूचा भयंकर परिणाम.

ब्राह्मणी राज्याची सर्व बाजूनीं इतकी भरभराट झाली कीं प्रत्यक्ष दिल्लीच्या बादशहाला देखील त्या विषयीं दरारा वाटत असे. इतकें

मोठें, इतकें श्रीमंत, इतकें उत्तम राज्यपद्धतीचें राज्य त्यावेळीं दुसरें नव्हतेंच म्हटलें तरी चालेल. या राज्यांत संपत्ती व विद्या या दोहोंचा कमालीचा उत्कर्ष झाला होता. या ब्राम्हणी ऊर्फ बहामनी राज्याची इतकी भरभराट होण्यास बहामनी राजाच्या वजिरांची हुशारी व कळकळ हींच मुख्यतः कारणीभूत झालीं. बहामनी राज्याचें वैभव ज्या थोर, शूर व उदार पुरुषानें अतीशय वाढविलें त्याचें नांव वजीर महमद् गवान. हा महमद् गवान बहामनी वंशांतला राजा महमदशहा ( दुसरा ) याचा मुख्य वजीर होता. तो बहामनी राज्याचा जुना अत्यंत इमानी व हुशार नोकर होता. त्यानें राज्यकारभारांत उत्तम तऱ्हेची सुधारणा केली. त्यानें लोकांस उत्तम न्याय मिळावा ह्मणून चांगले व निःपक्षपाती न्यायाधीश नेमल. लष्करांत उत्तम लोकांचा भरणा व्हावा म्हणून शिपाई लोकांचे व लष्करी अधिकाऱ्यांचे पगार वाढविले व सैन्याची उत्तम तयारी ठेविली. शिक्षणखातेंही त्यानें सुव्यवस्थित केलें. जमीनीची नवीन पहाणी करून उत्पन्नाप्रमाणें योग्य सरकार-देणें ठरविलें. ह्या पद्धतीचे दाखले अजूनही या आपल्या महाराष्ट्रांत सांपडतात. राज्यकारभारांतील खात्यांचा एकमेकांवर अशा तऱ्हेनें दाब ठेवला होता कीं कोणासच अन्याय करतां येऊं नये. अशा या थोर पुरुषाची बरोबरी करणारा कारभारी या हिंदुस्तानांत तर नव्हताच, पण सर्व जगांत देखील त्याच्या योग्यतेचीं माणसें फारच थोडीं सांपडतील. तो उत्तम कारभारी होता इतकेंच नव्हे तर तो अत्यंत शूर सेनापती होता. त्यानें आपल्या शौर्यानें बहामनी राज्याचा सर्वत्र दरारा बसविला. बहामनी राज्यावर चालून आलेल्या शेजारच्या राजांचा पूर्ण पराभव केला व त्यांचा बराच मुलूख बहामनी राज्याला जोडला. शूर व हुशार तर तो होताच पण त्या शिवाय तो अत्यंत धार्मिक साधुपुरुष होता.

अशा या अद्वितीय पुरुषाचें चरित्र तुम्हांला सांगावें असें माझ्या मनांत येतें; कारण त्याचें तें नमुनेदार चरित्र वाचून तुम्हांला आपलें वर्तन उत्तम बनवितां येईल. महमद् गवान हा इराणच्या राजाचा नातेवाईक होता त्याचा जन्म इराणांत सन १४०३ मध्यें झाला. तो भाऊबंदकीस त्रासून व्यापार करण्याच्या हेतूनें निरानिराळे देश हिंडला. जेथें जेथें जाई तेथें तेथें थोर व विद्वान् अशा लोकांच्या भेटी घेऊन त्यांची तो मैत्री जोडीत असे. फिरतां फिरतां इ०स०१४४६ सालीं तो समुद्राच्या मार्गानें कोंकणांतील दाभोळ नांवाच्या बंदरास आला. दाभोळहून तो बेदर येथें गेला. तेथें त्याच्या अलौकिक गुणांमुळें बहामनी सुलतान दुसरा अल्लाउद्दिन यानें त्याला सरदार केलें व आपल्या नोकरीस ठेविलें. तेव्हां-पासून आपल्या अंगच्या हुशारीनें तो वाढत गेला. सुलतान महमदशहावर त्याची फार भक्ति होती. एखादा विद्वान् त्याच्याकडे गेला व त्यानें त्याला योग्य बक्षीस दिलें नाहीं असें कधींही होत नसे. देशांतील सर्व विद्वानांस त्याचा मोठा आधार असे. त्याचा स्वभाव मनमिळाऊ होता. न्याय करण्याचे कामांत त्याच्या हातून पक्षपात कधींच झाला नाहीं. या आपल्या महाराष्ट्रांत त्याच्या उदारपणाची साक्ष देणाऱ्या इमारती व कामें पुष्कळ ठिकाणीं आहेत. बेदर शहरीं त्यानें एक पाठशाळा स्थापन केली यावरून प्रजेला विद्यादान देण्याची त्याला किती आवड होती हें दिसून येतें. तो उत्तम कवी होता व उत्तम गणितीही होता.

अशा या थोर, परोपकारी, विद्वान्, शूर व कर्तबगार अलौकिक पुरुषावर भलताच खोटा आरोप करून बहामनी दारू-बाज राजा महमदशहा यानें दारूनें धुंद होऊन त्यास ठार मारविलें. हें बाळांनो, तुम्हांला खरें देखील वाटणार नाहीं. असें कसें

झालें तें सांगतों. महंमद गवान याच्या न्यायाच्या कारभारामुळें राज्यांतील पैसे खाणाऱ्या अन्यायी सरदारांना तो दुष्टासारखा वाटे. याचा नाश केल्याशिवाय आपली बडेजाव होणार नाहीं व आपली पोळी पिकणार नाहीं असें त्यांना वाटलें म्हणून त्यांनीं एक गुप्त बेत केला. महमद गवान हा शत्रूस सामील आहे असें सुलतान महमद यास वाटावें म्हणून या दुष्टांनीं एक खोटेंच पत्र तयार केलें. त्यांत ओढ्याच्या राजास तूं महमदशहावर स्वारी कर, मी तुला मदत करीन असा मजकूर लिहिला. नंतर त्यांनीं त्या पत्रावर महंमदाची बनावट सही केली व तें पत्र शहा दारू पिऊन धुंद झाला होता अशा वेळीं त्याच्या हातांत नेऊन दिलें. ही दारू काय अनर्थ करील याचा नेम नाहीं. शहानें महंमद गवानची थोर योग्यता, सद्गुण व स्वामिभक्ति मुळींच लक्षांत आणली नाहीं. दारूच्या धुंदींत त्यानें एकदम महंमद गवान याला बोलावून आणलें व करा या दगलबाजाला ठार असा आपल्या नोकरांस हुकूम केला. महमद गवान यानें आपण निर्दोषी आहों अशी शहाची खात्री करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं मरण चुकत नाहीं हें लक्ष्यांत येतांच तो स्वामिभक्त त्या अधम महमदशहास म्हणाला, ' महाराज, मी मरणाला भीत नाहीं, पण अशा दुष्ट कृत्यानें तुमच्या कीर्तीला डाग लागेल व तुमचें राज्य लयाला जाईल याचें मला फार वाईट वाटतें. ' बाळांनों, या त्याच्या बोलण्याचा त्या अविचारी दारूबाज शहावर कांहींच परिणाम झाला नाहीं. शहानें नोकरांकडून तेथल्या तेथें त्याला ठार मारविलें. बाळांनों, हें चित्र पहा आणि हें दुसरेंही चित्र पहा. पहिलें चित्र अत्यंत सुशील, शूर, विद्वान व स्वामिभक्त

महंमद् गवानचें, व दुसरें अत्यंत अविचारी, दारूबाजव कृतघ्न महमद्शहाचें. असा कृतघ्न राजाही क्वचितच पहावयास सांपडेल व असा स्वामिभक्त वजीरही क्वचितच आढळेल. अजूनही महमद् गवानचे अलौकिक गुण आठवून व त्याचा झालेला दुःखकारक शेवट आठवून हजारों लोक हळहळतात. आपल्या आंगच्या अलौकिक गुणांनीं महमद् गवान यानें इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. महमद्-शहाला मागाहून आपली चूक समजली. असल्या अलौकिक स्वामिभक्ताला आपण ठार केला हें फार भयंकर कृत्य केलें असें शहाला वाटलें, पण उपयोग काय ! झालें तें थोडेंच परत येत असतें ! शेवटीं या गोष्टीची वारंवार आठवण करून महमद्शहा लवकरच मरण पावला. सुशील स्वामिभक्तीचा नाश केल्याचें फळ लवकरच बहामनी राज्याला मिळालें. महमद् गवान मरतांना म्हणाला होता त्याप्रमाणें तें राज्य लवकरच नाश पावलें. महमद् गवानला इ. स. १४८१ सालीं ठार मारलें. तेव्हां त्याचें वय ७८ वर्षांचें होतें. बाळांनो हा दारूचा परिणाम !

---

## गोष्ट ८ वी.

## शूर चांदबिबी.

बाळांनो, स्वामिभक्त महमद् गवान यास महमद्शहानें अन्यायानें ठार मारलें यामुळें बहामनी राज्य बुडालें व त्यापासून पांच राज्यें झालीं हें मागें तुम्हांला सांगितलेंच आहे. या पांच राज्यांपैकीं विजापूरचें राज्य व अहमदनगरचें राज्य हीं मुख्य होतीं. या दोनही राज्यांच्या इतिहासांत आपल्या पवित्र वर्तनानें, विलक्षण स्वार्थत्यागानें, व अलौकिक शौर्यानें जिनें

आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे अशा चांदबिबीची गोष्ट मी आतां तुम्हांला सांगतों.

चांदबिबी हीं अहमदनगरचा पराक्रमी सुलतान हुसेन निजामशहा याची मुलगी. इसवी सन १५६४ मध्यें महाराष्ट्रांतील पांच सुलतानांचें सैन्य सुलतान हुसेन यानें एकत्र केलें. या पांच सुलतानांनीं तालिकोट येथें विजयानगरच्या रामराजाचा पराभव केला व त्याचें राज्य आपसांत वांटून घेतलें. या गोष्टीच्या थोडे दिवस आधीं विजापूरचा सुलतान आदिलशहा यास अहमदनगरचा सुलतान हुसेन यानें आपली मुलगी चांदबिबी दिली होती. चांदबिबीच्या दुर्दैवानें लहानपणींच तिचा नवरा मरण पावला; तेव्हां तिला मूल झालें नव्हतें. यामुळें तिचा पुतण्या विजापूरच्या गादीवर बसला. तेव्हां तो लहान होता. विजापूरचें राज्य बुडूं नये यासाठीं चांदबिबीनें आपलें दुःख गिळलें व तो बालराजा व त्याचें राज्य यांचें संरक्षण करण्यासाठीं तिनें कंबर बांधली, व राज्य कारभार पाहूं लागली; परंतु विजापूरच्या वजीराचें तिच्याशीं वांकडे आलें, व त्यानें तिला सातान्यास कैद करून ठेविलें. पुढें तिची थोर योग्यता जाणणाऱ्या कांहीं लोकांनीं तिला सातान्याहून सोडवून परत विजापुरास अधिकारावर आणिले. परंतु तिच्या हातांत कारभार फार दिवस राहिला नाहीं. नंतर ती आपल्या माहेरीं अहमदनगरास १५८४ सनांत गेली. ती अहमदनगरला आल्यावर अहमदनगरचें राज्य जिंकावें म्हणून दिल्लीचा बादशहा अकबर याचा मुलगा मुराद यानें त्यावर स्वारी केली. तेव्हां अहमदनगरचें रक्षण करण्यासाठीं चांदबिबी पुढें आली. मुरादानें अहमदनगरचा तट उडवून देण्यासाठीं तीन ठिकाणीं भुयारें खोदून तीं दारूनें भरलीं. परंतु दारूला तो बत्ती लाव-

णार त्याच्या आर्धीच चपळाई करून शूर चांदाबिबीनें मजूर लावून तीं भुयारें रिकामीं करण्याचा निश्चय केला. मजुरांबरोबर ती स्वतः दारू उपसून टाकण्याचें काम झपाट्यानें करीत होती. तिनें दोन भुयारें तर उपसून टाकलीं. पण तिसरें भुयार उपसण्यापूर्वीच मुरादकडील लोकांनीं त्याला बत्ती लावली. यामुळें किल्ल्याच्या तटास मोठें थोरलें भगदाड पडलें. तरी देखील चांदबिबी डगमगली नाहीं. चांदबिबीच्या सेनापतीनें तिला आपण पळून जाऊं या असें पुष्कळ सांगितलें, पण तिनें तसें केलें नाहीं. तिनें अंगांत चिलखत घातलें व आपली तरवार हातांत घेऊन त्या भगदाडाशीं उभी राहिली व मोंगल सैन्य किल्ल्यांत शिरावयास आलें कीं, त्यांना सपासप कापून काढूं लागली. या तिच्या शौर्याच्या वर्तनानें तिच्या घाबरलेल्या सैन्याला धीर आला व तेही तिच्याबरोबर मोगलाशीं लढूं लागले. त्या दिवशीं चांदबिबीनें शौर्याची शिकस्त केली. मुरादचे लोक पुनः पुनः तिच्यावर चालून येत व पुनः पुनः आपल्या तरवारीनें चांदबिबी त्यांना छाटून टाकी. असें एकसारखें चाललें होतें. इकडे मुरादच्या सैन्याला हटवीत असतांच तिकडे तें भगदाड बुजविण्याचें तिनें जारीनें चालविलें व लवकरच तें भगदाड पुरतेपणीं बुजवून टाकलें. आपलें सैन्य थोडें, मुरादचें मोगल सैन्य अफाट. त्यापुढें आपला टिकाव फार वेळ लागणार नाहीं हें तिला माहीत होतें. ह्मणून तिनें विजापुरास मदत मागण्याकरितां आपले हेर पाठविले. नंतर विजापूरचें सैन्य आलें. मग विजापूरच्या सैन्याच्या मदतीनें तिनें मुरादच्या सैन्यास इतकें जेरीस आणिलें कीं इ. स. १५९४ त तिच्याशीं कसाबसा तह करून मुराद दिल्लीकडे चालता झाला. बायका म्हणजे भित्र्या, अशक्त, त्यांचे शहाणपण चुलीपुरतें असें

नेहमीं म्हणतात. पण बाळांनों, मोठमोठाल्या शूर पुरुषापेक्षां देखील अधिक शौर्य प्रसंग पडला असतां बायका दाखवूं शकतात व मोठें सैन्य घेऊन आलेल्या मुरादासारख्या शूर पुरुषाचा पराभव करून स्वदेशाचें रक्षण करूं शकतात हें, विलक्षण शौर्य गाजवून चांदबिबीनें सर्व जगास दाखवून दिलें आहे. या चांदबिबीच्या शौर्यानें व कर्तबगारीनें तिनें आपल्या महाराष्ट्राच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. या आमच्या महाराष्ट्राच्या इतिहासांत चांदबिबिप्रमाणें दुसऱ्याही शूर स्त्रियांनीं तरवार गाजविली आहे. नंतर तिनें बहादरशहास अहमदनगरच्या गादीवर बसविलें व राज्यकारभार फार हुशारीनें चालविला. नंतर पुनः एकदां अकबर बादशहानें अहमदनगरावर हल्ला केला. त्या वेळीं तिच्या एका हमीरखान नांवाच्या अधिकाऱ्यानें तिच्या महालांत जाऊन तिचा खून केला. अशा तऱ्हेनें तिचा खून झाल्यावर अकबराच्या सैन्यानें अहमदनगरावर हल्ला करून तें आपल्या ताब्यांत घेतलें. शूर चांदबिबीनें जिवांत जीव होता तोंपर्यंत आपल्या राज्याचें रक्षण केलें. चांदबिबीचें शौर्य, चांदबिबीची धडाडी, चांदबिबीचा देशाभिमान व स्वार्थत्याग यांचें वर्णन करावें तेवढें थोडेंच. असलीं स्त्रीरत्नें या आपल्या महाराष्ट्रांत झालीं ही मोठी भूषणाची गोष्ट आहे.

---

## गोष्ट ९ वी.

## वजीर मलिकंबर.

बाळांनों, अहमदनगरच्या संरक्षणाच्या खटपटींत महापराक्रमी चांदबिबीनें आपलें सर्व आयुष्य खर्च केलें व महाराष्ट्राचे इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें हें तुम्हांला

मागचे गोष्टींत सांगितलेंच आहे. त्या स्त्रीरत्नाचें दर्शन झाल्यानंतर सहजच तुम्हांला वाटेल कीं, याच्या सारखें एखादें नररत्न त्या वेळीं आपल्या महाराष्ट्रांत झळकलें नाहीं काय? कदाचित् शूर चांदबिबीची गोष्ट वाचून तुमच्या बहिणी फुगून गेल्या असतील. 'आमच्या शूर देशभक्त चांदबिबीसारखा तुमच्या पुरुषांत त्या वेळीं एक तरी हिरा निपजला होता कां,' असा प्रश्न विचारून तुमची ताई तुम्हांला कदाचित हिणवूं देखील लागली असेल. पण तिला म्हणावें जरा पुढें नजर फेंक,' म्हणजे आमचा हिरा दिसावयाला लागेल. तो हिरा कोणता म्हणाल तर कर्मवीर मलिकंबर. चांदबिबी मेली, मोगलांनीं अहमदनगर घेतलें. राजा बहादुरशहाला कैद करून दिल्लीस नेलें, सर्वच नाश झाला असें रडगाणें गात तो बसला नाहीं. 'अहमदनगरचें राज्य बुडालें ? हरकत नाहीं. हा मलिकंबर त्याला पुनः स्थापील, त्याला पुनः जोमदार करील, त्याचा पराक्रम सर्वत्र गाजवील,' असें धैर्यानें जाहीर करून मलिकंबरानें कंबर बांधली. यासाठींच मी त्याला कर्मवीर म्हणतों. सर्वस्वाचा नाश झाला, भयंकर निराशा भेवडावूं लागली, आशेचा एकही किरण दिसेनासा झाला, तरी जो पुरुष तिळभरही डगमगत नाहीं, गेलेलें सर्व पुनः मिळविण्यास निश्चयानें कंबर बांधतो त्या जवानमर्दालाच कर्मवीर म्हणतात. परीक्षा नापास झाली म्हणून कपाळावर हात देऊन भागुबाईप्रमाणें मिळमिळ रडणाराला कर्मवीर म्हणत नाहींत हें बाळांनों पक्कें लक्ष्यांत ठेवा. असो, असा हा नमुनेदार कर्मवीर मलिकंबर इ०स० १५४६त जन्मला. हा जातीचा हबशी होता. अहमदनगरच्या राज्यकारभारांत अगदीं हलक्या नोकरीपासून वाढत जाऊन त्यानें पूर्ण अनुभव मिळविला होता. मागल्या गोष्टींत सांगितल्या-

प्रमाणें अहमदनगर मोगलांच्या ताब्यांत गेल्यावर त्यानें खडकी नांवाचें दुसरें सुंदर शहर बांधलें व तेथें अहमदनगरच्या निजामशाही राज्याची राजधानी नेली. निजामशाहीचा पुनर्जन्म झाला. तेथें राहून निजामशाहीला नांवारूपास आणण्याचा जोरदार प्रयत्न त्यानें रात्रंदिवस चालू ठेवला. हें खडकी शहर देवगिरी ऊर्फ दौलताबाद या शहरापासून सहा मैलांवर होतें. या खडकीलाच पुढें औरंगजेब बादशहानें औरंगाबाद असें नांव दिलें. मलिकंबरानें एक मोठी गोष्ट केली ती ही कीं, देशकार्यांत धर्मभेद पुढें आणला नाहीं. हा मुसलमान व हा हिंदु हा भेदभाव त्याचे जवळ नव्हता. अहमदनगरचें राज्य जोमदार करावयाचें ही एकच गोष्ट त्यानें सतत आपल्या डोळ्यांपुढें ठेवली. यामुळें मुसलमान व हिंदु यांची एकी झाली. शूर मुसलमान सरदारांच्या खांद्यास खांदा लावून शूर मराठे गडी तरवार उपसून अहमदनगरासाठीं जीव देण्यास तयार झाले. मराठे मुसलमानांच्या या अजंब्र एकीचा प्रभाव लवकरच दृष्टीस पडला. मलिकंबरानें या देशाभिमानी मराठे व मुसलमान यांच्या सैन्याचे मदतीनें गेलेला निजामशाहीचा मुलूख परत घेतला. हां हां म्हणतां अहमदनगर हस्तगत केलें व मोगलांचा रणशूर सेनापती खानखानान याचा पराभव करून त्याला बऱ्हाणपूर पर्यंत हांकलून दिलें. अशा रीतीनें अहमदनगरचा सौभाग्य सूर्य पुनः चमकूं लागला.

राज्यकारभाराची सुधारणा:—स्वदेशाला सुखी करण्यास नुसत्या लढाया जिंकून काम भागत नाहीं. त्याला उत्तम तरवारीप्रमाणें उत्तम लेखणीचीही जरूर लागते ही गोष्ट मलिकंबर विसरला नाहीं. मोगलांना हाकून देऊन निजामशाहीची पुनः

स्थापना केल्यावर त्यानें आपलें सर्व लक्ष्य लोकांची स्थिति सुधारण्याकडे लाविलें. कोणत्याही एका गोष्टींत हुशार माणसानें सर्व लक्ष्य घातल्यावर काम झालेंच म्हणून समजा. त्याप्रमाणेंच झालें. मलिकंबरानें राज्याचा कारभार इतका चोख करून सोडला, लोकहिताच्या इतक्या सुधारणा केल्या कीं महाराष्ट्रांतील लोक प्रेमानें व कृतज्ञतेनें अजूनही मलिकंबराची आठवण काढतात. त्यानें निजामशाहींतिल जमिनींची मोजणी व पहाणी केली. सरकार देण्याचे दर अगदीं न्यायानें नक्की ठरविले. उत्तरहिंदुस्थानांत उत्तम ठरलेली तोडरमल्लाची जमाबंदीची पद्धत त्यानें महाराष्ट्रांत चालू केली. या कामीं मराठे सरदारांची व ब्राह्मण कारकुनांची त्यानें मदत घेतली. सर्व शेतांची मोजणी व पहाणी करून व मागील कित्येक वर्षांच्या उत्पन्नाची सरासरी काढून प्रत्येक शेतावरचें सरकारचें नक्की देणें त्यानें ठरविलें आणि तें पिकाच्या मानानें कमी जास्त देण्याची सवड ठेविली. कांहीं वर्षें लोकांस साऱ्याची माफी देऊन त्यानें नवीन जमिनी लागवडीस आणल्या. अशा तऱ्हेनें अमलदारांचा रयतेवर चालत असलेला जुलूम त्यानें बंद केला. यामुळें रयत सुखी झाली व सरकारचें उत्पन्नही वाढलें. लोक सुखी झाल्यामुळें देशांत स्वस्थता झाली व राज्याला बळकटी आली. गुजराथच्या सुभेदारानें जेव्हां अहमदनगरावर स्वारी केली तेव्हां मलिकंबरनें त्याला चांगलाच हात दाखविला. सन १६१७ त शहाजहानानें त्याचा पराभव केला. मोगलांच्या प्रबळ सैन्यापुढें त्याला हार खावी लागली हें खरें. तरी त्यांतल्या त्यांत आपल्या शक्तीप्रमाणें प्रजाहिताचीं कामें त्यानें पुष्कळ केलीं. हा थोर देशभक्त शूर पुरुष सन १६२६ त मरण पावला. तेव्हां त्याचें वय ८० वर्षांचें होतें.

त्याला दौलताबाद येथें पुरलें. त्याची जमाबंदीची पद्धत अद्याप लोकप्रिय आहे. त्याची राज्यकारभार करण्याची हुशारी, न्यायी वर्तन, ईश्वरभक्ति, औदार्य व शौर्य या गुणांबद्दल महाराष्ट्र देशांत फार ख्याती आहे.

---

## गोष्ट १० वी.

## ओहोटी मागून भरती.

बाळांनों, देवगिरीच्या अत्यंत भरभराटीची गोष्ट मागें तुम्हांला सांगितलीच आहे. देवगिरीचे मराठे राजे यादव ऊर्फ जाधव यांचें वैभव रामदेवराव राजाच्या कारकीर्दींत शिखरास पोंचलें. वैभवाच्या भरतीची शिकस्त झाली म्हणजे लवकरच ओहोटीस सुरुवात होते असें मीं त्या वेळीं तुम्हांला सांगितलें त्याची तुम्हांला आठवण आहेच. वैभवशाली रामदेवरावाच्याच कारकीर्दीच्या शेवटीं मराठी राज्याच्या दुर्दशेस सुरुवात झाली. रामदेवानंतर शंकरदेवाचे वेळीं दुर्दैवाची शिकस्त होऊन देवगिरीचें मराठी राज्य बुडालें व जिकडे तिकडे मुसलमानी अम्मल चालू झाला. आतां दक्षिणेंत फक्त विजयानगरचें वडें मराठी राज्य जिवंत होतें, तेंही दक्षिणेंतल्या पांच मुसलमानी राजांनीं १५६५ त तालिकोटच्या लढाईत त्या राज्यावर एकदम हल्ला करून व त्याचा पराभव करून आपसांत वांटून घेतलें. झालें, आतां मात्र जिकडे तिकडे मुसलमानी अम्मल सुरू झाला. तरी देखील महाराष्ट्रांतील लोकांना वाईट वाटलें नाहीं. मुसलमानी राजांची नोकरी आपल्या मराठे सरदारांनीं इमानानें केली, व मुसलमानी राजांनींही मराठ्यांना चांगलें वागविलें व कारभारांत त्यांना मानाच्या व

मोठ्या अधिकाराच्या जागा दिल्या. यामुळे पहिल्याने मुसलमान व हिंदु यांची एकी झाली. हिंदूंच्या पूर्ण मदतीने कारभार व वसूल उत्तम होऊं लागला. यामुळे त्याही स्थितीत महाराष्ट्राचे दिवस सुखांत गेले. परंतु बहामनी राज्य बुडून जी पांच राज्यें झाली म्हणून मागें तुम्हांला सांगितलें तीं आपआपसांत लढाया करूं लागलीं, एकमेकांच्या राज्यांत लुटालूट करूं लागलीं. यामुळें हा आपला महाराष्ट्र भिकेस लागला. त्यांत आणखी मोगलांनीं स्वाऱ्या केल्या यामुळें सर्वत्र गोंधळ व दुर्दशा झाली. मराठी राज्य गेलें तर गेलें, दाक्षिणेंतील मुसलमानी राज्यासच आपण मदत करूं व सर्वत्र शांतता ठेवूं अशा हेतूनें मराठे सरदारांनीं मुसमानी राज्याच्या सरंक्षणासाठीं जिवावर उदार होऊन प्रयत्न केले. ज्याप्रमाणें मुसलमान चांदबिबी व मलिकंबर यांनीं आपलें सर्व बळ, चातुर्य व आयुष्य अहमदनगराच्या राज्याचें रक्षण करण्याकरितां खर्च केलें त्याचप्रमाणें मालोजी भोंसले व त्याचा मुलगा शहाजी भोंसले यांनींही मुसलमानांना परके न मानतां अहमदनरच्या मुसलमानी राज्याचा बचाव अतिशय शौर्यानें व हुशारीनें केला व कांहीं दिवस त्यांना यश आलें. पण एखादें झाड मुळांतच कुजलें व किडलें असलें म्हणजे त्याला वर कितीही टेका दिला तरी तें उलथून पडतें तसें झालें. अहमदनगरचें राज्य बुडालें. तीच दशा मुसलमानी राज्याची झाली. आतां मात्र ओहोटीची अगदीं शिकस्त झाली. त्यांतच दुष्काळ पडला. यामुळें आपला महाराष्ट्र हीनदीन झाला. देवा किती अंत पहातोस. प्राणाचा अन्त व्हावयाची वेळ आली. देवा, येऊं दे रे या दीनाची तुला दया. असें सर्व लोक अगदीं नम्र होऊन देवरायाला विनवूं लागले. झाली, ओहोटीची शिकस्त झाली. देवरायाला

द्‌या आली व या महाराष्ट्राच्या ओहोटीनंतरच्या भरतीची सुरुवात करणारे कुलदीपक शिवाजी महाराज जन्माला आले. त्यांनीं ओहोटीला हटविले व भरतीला म्हणजे भरभराटीला सुरुवात केली. अशा तऱ्हेनें ओहोटी मागून भरतीही यावयाचीच हा नियम खरा झाला. हा नियम बाळांनों चांगला लक्षांत ठेवा. अत्यंत वाईट स्थिति आली म्हणजे मनुष्यानें खचून जाऊं नये. तर आतां लवकरच चांगले दिवस येणार हें लक्षांत ठेवावें, वरचा नियम आपणाला हें सांगत आहे, हा नियम दीनजनांचा मोठा आधार आहे.

---

## गोष्ट ११ वी.

## हे भोंसले कोण व कोठले ?

मालोजी भोंसले, त्यांचा मुलगा शहाजी भोंसले व त्यांचा कुळदीपक मुलगा शिवाजी महाराज यांचीं नांवें व कामगिरी थोडीशी गेल्या गोष्टींत मीं सांगितली. यावरूनच ' अहो पण हे भोंसले कोण व कोठले ? असा प्रश्न तुम्हीं विचारला. प्रश्न अगदीं योग्य आहे, म्हणून त्याबद्दलची गोष्ट तुम्हांला सांगतों. बाळांनों, म्हण आहे कीं, खाण तशी माती. सोन्याच्या खाणींत कांहीं लोखंड निघत नाहीं. सोन्याची उत्पत्ति सोन्याच्याच खाणींत व्हावयाची. थोर अवतारी शिवाजी महाराजांची उत्पत्ति थोर कुळांतच व्हावयाची आणि तसेंच झालें. भोंसले हे फार शूर बाणेदार व फार उच्च अशा क्षत्रिय कुळांतले होते. उत्तर हिंदुस्तानांत रजपूत लोक होते व आहेत हें आपल्याला ठाऊक आहेच. हे रजपूत क्षत्रिय आहेत. यांचीं पूर्वी अनेक राज्यें होतीं. त्यांत अत्यंत शूर व पराक्रमी असें चितोडचें राज्य

होतें. सर्व रजपूत कुळांत चितोडचें कुल पहिल्या प्रतीचें होतें. सर्व रजपूत त्याला श्रेष्ठ समजतात. त्या चितोड कुळांतील एक पराक्रमी देवराजजी नांवाचा पुरुष नर्मदानदी उतरून महाराष्ट्रांत १४१५ त आला. त्याच्याच वंशांत पुढें भोसाजी नांवाचा शूर पुरुष झाला. या भोसाजीवरून त्याच्या वंशजांना भोंसले असें नांव पडलें. शिवाजी महाराजांचे आजे मालोजी यांच्या आजापासूनची हकीगत समजली आहे. शिवाजीचा आजा मालोजी. मालोजीच्या आजाचें नांव संभाजी असें होतें. संभाजीचा मुलगा बाबजी भोंसले. बाबजीला दोन मुलगे होते, मालोजी व विठोजी. मालोजी हा सन १५५० त जन्मला. हे मुलगे पुढें मोठे झाल्यावर हे दोघे खानदेशांतील सिंदखेड गांवचे सरदार लुकजी जाधव यांचे नोकरीस राहिले. या नोकरीशिवाय यांना दौलताबादेजवळ असलेल्या वेरूळची पाटीलकी होती. यामुळें ही नोकरी संभाळून मालोजी वेरुळास राहून तेथील पाटीलकीचेंही काम पहात असे. असल्या क्षुल्लक नोकरींत मालोजीसारखा महत्वाकांक्षी पुरुष थोडाच राहाणार ! तो नंतर फलटणास संस्थानिक निंबाळकर यांचेकडे गेला. तेथें त्यानें फार पराक्रम करून कीर्ति मिळविली. यामुळें खूष होऊन जगपाळराव निंबाळकरांनीं प्रत्यक्ष आपली बहीण दीपाबाई मालोजीस दिली. दीपाबाई हीच शिवरायांची आजी. नंतर मालोजीची कीर्ति ऐकून जाधवांनीं त्याची अहमदनगरच्या राजाजवळ शिफारस केली. तेव्हां त्यानें १५७७ त मालोजीस शिलेदार केलें. नंतर मालोजीनें आपल्या हाताखालीं पुष्कळ घोडेस्वार ठेवून चांगली कामगिरी बजावली. मालोजीला शहाशरीफ या पिराच्या कृपेनें दोन मुलगे झाले, म्हणून त्यानें त्यांचीं नांवें शहाजी व शरी-

फजी अशीं ठेविलीं. शहाजीचा जन्म १५९४ त झाला व शरीफजीचा १५९७ त झाला. या शहाजींचें पुढें जाधवाची जिजाबाई हिच्याशीं लग्न झालें. शहाजी व जिजाबाई यांच्यावर देवाची फार मेहेरबानी असल्यामुळें त्यांना शिवाजी महाराजांसारखा पराक्रमी मुलगा झाला.

---

## गोष्ट १२ वी.

## जिजास्वयंवर.

बाळांनों, काय म्हणतां सीतास्वयंवर, रुक्मिणीस्वयंवर व दमयंतीस्वयंवर यांबद्दल पुराणांत तुम्हीं वाचलें आहे. पण जिजास्वयंवराविषयीं आम्हीं मुळींच ऐकिलें नाहीं. शिवाय अलीकडच्या इतिहासकाळांत स्वयंवराची मुळींच चाल नाहीं. नसेल बापडी. पण बाळांनों, म्हण आहेना, कीं थोरांचें सगळेंच विलक्षण, तसेंच येथें आहे. आपल्या इतिहासांत लग्नाची हकीगत काय तर एका मुलीचा बाप मुलाच्या बापाकडे जातो, तुमचा मुलगा व तुमचें घराणें चांगलें आहे, तुमचेकडे माझी मुलगी पडावी अशी माझी इच्छा आहे, तेव्हां तिला आपण पदरांत घ्यावी अशी विनंति करतो. मुलाचा बाप मुलाला न विचारतांच स्वतःला पसंत असल्यास ठीक आहे असें म्हणतो व मग वाजंत्र्याच्या कडकडाटांत, भिक्षुकांच्या मंत्रघोषांत व मेजवान्यांच्या धडाक्यांत लग्न निर्विघ्नपणें श्रीगणेशाच्या कृपेनें पार पडतें. पण शिवाजी महाराज पडले विलक्षण पराक्रमी. तेव्हां त्यांच्या आईबापांचें लग्न देखील विलक्षण तऱ्हेनेंच व्हावयाचें. तसेंच तें झालें. तें लग्न नव्हे तो स्वयंवर होता. नवरी मुलगी जेव्हां स्वयं म्हणजे स्वतः वर निवडते म्हणजे नवरा पसंत करते, तेव्हां त्या प्रका-

राला स्वयंवर म्हणतात. पुराणकालीं क्षत्रियांत स्वयंवर फार होत असत. असो. आतां या गमतीच्या अर्वाचीन स्वयंवराची हकीगत सांगतों.

शहाजीचा बाप मालोजी याची निजामशाहींत भराभर बडेजाव होत असतां १५९९ सालीं शिमग्याच्या सणांत रंगपंचमीचे दिवशीं तो आपला चिमुकला मुलगा शहाजी याला बरोबर घेऊन जाधवरावांचे घरीं पानसुपारीस गेला. शहाजी दिसण्यांत फार सुंदर व चलाख होता. त्याला पहातांच प्रेमानें जाधवरावानें त्याला आपलेजवळ बसाविलें. जाधवरावांना जिजाबाई म्हणून एक तीन वर्षांची सुंदर मुलगी होती. तीही जाधवरावांचे जवळ बसली होती. शहाजी तेव्हां ५ वर्षांचा होता व जिजाबाई ३ वर्षांची. होती एकमेकांचे जवळ एकमेक बसतांच दोघांची गट्टी जुळली. झालें बाळेंच तीं, लागलीं खेळायला व एकमेकांच्या अंगावर गुलाल उधळायला हें त्यांचें एकमेकांच्या अंगावर हंसत हंसत गुलाल उधळणें पाहून तेथल्या जमलेल्या सर्व मंडळींत एकच हंशा पिकला. वा, लागले नवरा नवरीप्रमाणें एकमेकांवर रंग गुलाल उधळायला, असें कांहीं म्हणाले. जोडा कसा अगदीं नामी शोभतो, असें दुसरे म्हणाले. जाधवरावांनाही फार गम्मत वाटली. हें पाहून जाधवराव थट्टेनें म्हणाले ‘ बाळे, तुला हा नवरा आवडतो का ? हा जोडा फार सुंदर दिसतो. ’ हें ऐकून मालोजी सर्वांस म्हणाले, ‘ ऐका हो जाधवराव काय बोलले तें. आजपासून जाधवराव आमचे व्याही झाले. ’ हा सर्व प्रकार जाधवरावांची बायको म्हाळसाबाई हिला पसंत पडला नाहीं. ती म्हणाली ‘ आम्ही किती श्रीमंत व मालोजी किती गरीब. तो का आमच्या बरोबरीचा आहे ? झालें बायकोपुढें जाधवरावांचें कांहीं चाललें नाहीं. शेवटीं ही गोष्ट अहमदनगरच्या राजापर्यंत

गेली. त्यालाही शहाजी व जिजाबाई यांचा जोडा चांगला शोभतो असेंच वाटलें. येऊन जाऊन काय तर मालोजी गरीब ऐवढेंचना, असें बादशहा म्हणाला व लगेच त्यानें मालोजीला राजा हा किताब व पांच हजारांची सरदारी दिली. अशा तऱ्हेनें हें स्वयंवर बादशहानें खरोखर घडवून आणलें. बाळांनों, ही आपल्या स्वयंवराची विलक्षण हकीकत आठवून शहाजी व जिजाबाई किती वेळां तरी गालांतल्या गालांत हंसली असतील बरें ! आपणही हंसतच ही गोष्ट येथें पुरी करूं.

---

## गोष्ट १३ वी.

## देवीचे दोन प्रसाद.

हातून मोठें काम व्हावयाचें म्हणजे त्याला स्वतांची कर्तबगारी व हुशारी लागतेच पण त्याच्याबरोबर देवाचीही कृपा लागत असते. आणि चांगल्या हेतूनें सतत उद्योग करणारावर देव-ही नेहमीं संतुष्ट असतो व त्याला त्याचे कामांत मदत करतो. मालोजी हा मूळचा केवळ पाटील, पण आपण राजा व्हावें अशी त्याला महत्वाकांक्षा. नुसती महत्वाकांक्षाच होती असें नाहीं तर ती सिद्ध करण्याकरतां त्याची रात्रंदिवस धडपडही चालू होती. ती मालोजीची खटपट कुलस्वामीनी देवी भवानीला आवडली व आपली कृपा स्पष्ट करण्याकरितां तिनें त्याला प्रसा-दही दिला. देवीला ठाऊक होतें कीं मालोजीला पैशाची फार जरूर आहे. तेव्हां त्याला पैशाचा लाभ करून देण्याचें देवीनें ठरविलें. मालोजी जसा राजकारणी तसा धार्मिकही होता. तुळजापुरची देवी भवानी हिचा तो प्रेमळ भक्त होता. एके दिवशीं तो वेरूळ येथील आपल्या शेतांत हिंडत होता. त्या वे-ळीं देवीनें त्याला दर्शन दिलें व वर दिला कीं ' तुझी इच्छा

पूर्ण होईल, व तुझ्या वंशांत श्रीशंकराचा अवतार होईल. यास प्रमाण जवळच्या वारुळांत द्रव्य आहे तें घे व आपलें काम कर'. देवीच्या सांगण्याप्रमाणें त्याला वारुळांत एक मोहोरांनीं भरलेला हंडा सांपडला. याच द्रव्याच्या व स्वतःच्या कर्तबगारीच्या जोरावर मालोजी वाढत वाढत राजा झाला. हा देवीचा पहिला प्रसाद. या प्रसादापेक्षांही मोठा प्रसाद शिवनेरीच्या शिवाई देवीनें दिला. मागल्या गोष्टींत सांगितल्या प्रमाणें शहाजी व जिजाबाईचें लग्न बादशहाच्या मध्यस्तीनें झालें. पण या लग्नामुळें जाधवराव व मालोजी यांचीं मनें मात्र एकमेकांविरुद्ध झालीं. पुढें सासरे व जांवई यांचेंही सूत नव्हतें. शिवाय शहाजीचा सासरा जाधवराव पुढें मोगलास मिळाला यामुळें त्यांचें उघड उघडच भांडण जुंपलें. मोगलांच्या वतीनें जाधवराव यानें शहाजीवर हल्ला केला. शहाजीचें सैन्य थोडें होतें यामुळें त्याचा बादशाही सैन्यापुढें टिकाव लागेना. म्हणून तो चाकणहून फलटणकडे म्हणजे आपल्या आजोळीं जाण्यास निघाला. जिजाबाई त्या वेळीं गरोदर होती. अगदीं नऊ महिने भरले होते. यामुळें शहाजीबरोबर तिला भरधांव घोड्यावरून जातां येईना, म्हणून शहाजीनें तिच्या रक्षणास थोडे लोक ठेवून तो पुढें गेला. मोगलांचा सेनापती जाधवराव हा आपली बायको जिजाबाई हिचा बाप आहे यामुळें त्याच्यापासून तिला त्रास होणार नाहीं हें त्याला ठाऊक होतें. असो. शहाजीच्या अंदाजाप्रमाणें जिजाबाई आपला बाप जाधवराव याचे हातीं सांपडली. तिला तो आपले गांवीं नेणार होता पण ही गोष्ट त्या मानी स्त्रीस कबूल झाली नाहीं. मला माझ्या नवऱ्याच्या जहागिरींतील शिवनेरी किल्ल्यांत पोंचवा असें तिनें बापास निक्षून सांगितलें. त्याप्रमाणें जाधव-

रावानें तिला शिवनेरीस पोंचविलें. मनुष्य अत्यंत संकटांत सांपडलें म्हणजे त्याला देवाची आठवण होते. परीक्षा जवळ आली ह्मणजे 'देवा मला पास कर' अशी बाळांनों तुमची प्रार्थना चालूं होते. वास्तविक देवाची प्रार्थना रोजच्या रोज करावी.

शिवाजी.



संकटांत सांपडलेली व निराधार जिजाबाई किल्ल्यावर असतां तेथें शिवाई देवीचें देऊळ आहे असें तिला समजलें. तेव्हां ती देवीच्या दर्शनास गेली. तिनें देवीच्या पायांवर मस्तक ठेविलें व प्रार्थना केली कीं 'शिवाई माते मला तुझ्या शिवाय कोणाचा आधार नाहीं. बाप तर उघड उघड शत्रु, पतिही दूर गेलेले आहेत. माते, तूंच या संकटांत माझी पाठीराखी. माते, मला कुलदीपक पुत्र दे,' अशी भक्तीनें तिनें देवीची प्रार्थना केली. नंतर ती घरीं आली मग थोडेच

दिवसांनीं सन १६२७ मध्यें वैशाख महिन्यांत तिला मुलगा झाला. शिवाई देवीचा हा प्रसाद म्हणून देवीचे उपकार स्मरून जिजाबाईनें देवीच्या नांवावरून त्याचें नांव शिवाजी असें ठेविलें. हा बाळ म्हणजे आपले थोरले शिवाजी महाराज. शिवाजीचा जन्म म्हणजे महाराष्ट्राच्या भाग्यरवीचा उदय अशा तऱ्हेनें शिवनेरी येथें झाला. शिवाजीला एक वडील भाऊ होता, त्याचें नांव संभाजी असें होतें. स्वराज्यस्थापनेची मोठी कामगिरी शिवाजी महाराजांचे हातून झाली. मग कसें म्हणूं नये त्यांना देवीचा प्रसाद. समजलेना बाळांनों, देवीचे दोन प्रसाद. पहिल्या प्रसादानें नुसता पाया घातला; व या दुसऱ्या प्रसादानें त्या पायावर स्वराज्याची सुंदर इमारत उभी केली. शिवरायाची जन्मभूमि शिवनेरी पहावी अशी तुम्हांला सहजच इच्छा होणार. म्हणून सांगून टाकतों कीं हा शिवनेरी किल्ला, पुणें जिल्ह्यांत जुन्नर गांवाच्या लगत आहे. जुन्नरास पुण्याहून मोटारीनें किंवा बैलगाडीनें जावें.

## गोष्ट १४ वी.

## आई थोर तुझे उपकार.

बाळांनों, वर मी आई थोर तुझे उपकार असे शब्द लिहिले हें वाचून तुह्मांला कदाचित् आश्चर्य वाटेल. पण या गोष्टीला तसें नांव देणेंच योग्य आहे. गेल्या गोष्टींत माता जिजाबाई हिच्या नवसाला देवी पावली व शिवाई देवीचा प्रसाद म्हणून आपल्या बाळाचें नांव जिजाबाईनें शिवाजी असें ठेविलें ही हकीगत तुह्मीं वाचली. या गोष्टींत शिवाजीच्या बाळपणाविषयीं मी तुम्हांला माहिती देणार आहें. बाळांनों, तुम्हांला स्वतःच्या

अनुभवावरून ठाऊक आहेच कीं बाळपणांतला बहुतेक काळ आपल्या आईचे शिक्षणांत व संगतींत जातो. त्या वेळीं आईनें आपणाला जें शिकविलें तें आपण मोठ्या आनंदानें शिकलों. लहानपणीं जसें वळण लागतें तसेंच पुढें मोठेपणीं वर्तन घडतें. आई जर चांगली शिकलेली, सद्गुणी, महत्वाकांक्षी व स्वदेशभक्त असली तर मुलेंही तशींच होतात. याचें कारण त्यांचें लहानपणचें शिक्षण त्यांचे आईकडूनच त्यांना मिळते. ही झाली साधारण सर्व लोकांची गोष्ट. पण आपल्या शिवाजी महाराजांच्या संबंधांत ही गोष्ट विशेष तऱ्हेनें खरी आहे. शिवाजी महाराज जे एवढे मोठे झाले त्याचें बहुतेक श्रेय त्यांची आई जिजाबाई हीस दिलें पाहिजे. जन्मापासून शिवाजी आपला बाप शहाजी याचे जवळ फारच थोडे दिवस होता. त्याचा बहुतेक काळ त्याच्या आईजवळच गेला. यामुळें लहानपणापासून शिवाजीस आईचा लळा विशेष होता. शिवाजीच्या लहानपणचें शिक्षण त्याची आई जिजाबाई व कारभारी दादाजी कोंडदेव या दोघांच्या देखरेखीखालीं झालें. त्यांतल्या त्यांत आईकडे बरेंच श्रेय येतें. दादाजी कोंडदेव बोलून चालून कारकुनी वळणाचा, तेव्हां त्यानें शिवाजीला लिहावयास व वाचावयास शिकविलें असावें. बाकी त्यानेंच शिवाजीला वाचावयास व लिहावयास शिकविलें असेल जिजाबाईनें शिकविलें नसेल असेंही म्हणतां येत नाहीं. कारण जिजाबाईला देखील लिहितां वाचतां येत होतें. मुख्यतः स्वदेशाभिमान, बाणेदारपणा, शौर्य, धाडस, महत्त्वाकांक्षा व स्वधर्मनिष्ठा या मोलवान् गुणांचें बीज शिवाजीच्या कोमल मनांत कोणीं लाविलें? असा प्रश्न केल्यास जिजाबाईनें, असेंच उत्तर द्यावें लागेल. हे सद्गुण शिवाजीस शिकवावयाला तीच विशेषतः योग्य

होती. बाप व नवरा यांच्यापासून ताटातूट झाल्यामुळें तिच्या मूळच्या मानी स्वभावांत निश्चय, धैर्य व साहस या गुणांची भर पडली होती. तिचा सर्व आधार व प्राणविसावा बाळशिवाजी हाच होता. शिवबालाही आई शिवाय प्रेमाचें माणूस कोणीच नव्हतें. त्याचे सर्व लाड पुरविणारी त्याचें सर्वस्व काय ती त्याची आई. तिनें अनेक कष्ट सोसून अत्यंत काळजीनें व प्रेमानें आपल्या शिवबाळाला उत्तम शिक्षण दिलें. तिनें मागील पूर्वजांच्या शौर्याच्या, वैभवाच्या, कारस्थानांच्या व धडाडीच्या गोष्टी शिवबाळाला सांगून त्याच्या कोमल मनांत अचाट कृत्यें करण्याची हिंमत आणली. शत्रूचें पारिपत्य करून कुळाचा उद्धार करणारा शककर्ता आपले कुळांत निपजणार आहे म्हणून देवीचे दृष्टांत झाले आहेत, पण ते केव्हां खरे होतील कोण जाणें ! असें डोळयांत पाणी आणून तिनें बालशिवाजीपाशीं वारंवार म्हणावें. महाभारत व रामायण या ग्रंथांतल्या धैर्य व शौर्य यांच्या कथा ती नेहमीं त्याला सांगत असे व त्यामुळें सहजच त्या कथांतल्या सारखीं मोठमोठीं कामें आपण करावी अशी त्याला इच्छा झाली. त्याला कथाकीर्तनें ऐकण्याचा चांगला नाद जो इतका लागला होता, त्याला कारण त्याची आईच होती. बाळांनों, ज्याला आपल्या पूर्वजांचा अभिमान नाहीं त्याच्या हातून मोठीं कामें कधींच होणार नाहींत. जिजाबाईनें पूर्वजांविषयीं शिवाजीच्या बालहृदयांत तेजस्वी अभिमान उत्पन्न केला. म्हणूनच तरुणपणीं त्याचे हातून महाराष्ट्राचा उद्धार झाला. सांगावयाचें तात्पर्य हें कीं, शिवाजीस आईपासून उत्तम शिक्षण प्राप्त झालें. नुसतें पुस्तकी शिक्षण केव्हांही उपयोगाचें नसतें. नुसत्या पुस्तकी शिक्षणाचा परिणाम हल्लीं आपण पहातच आहों. त्या धडामोडीच्या काळांत तर

पुस्तकी शिक्षणापेक्षां, शरीर धट्टेंकट्टें व काटक करणाऱ्या मर्दानी शिक्षणाचीच फार जरूर होती. त्याप्रमाणें आपल्या आजूबाजूस काय चाललें आहे, आपला देश कोणत्या स्थितींत आहे, त्याला अशी वाईट स्थिति कां आली, व ती दूर कशी करतां येईल ह्याविषयींच्या शिक्षणाची त्याकाळीं फार जरूर होती. जिजाबाईची विशेष स्तुति करावीशी वाटते ती याचकरितां. तिनें शिवाजीला पुराणांतल्या नुसत्या गोष्टी सांगून गोष्टीवेल्हाळ बनाविलें नाहीं. तिनें पुराणांतल्या गोष्टी सांगून, त्या वेळच्या स्थितींत त्या गोष्टींपासून काय शिकावें हेंही बालशिवाजीला समजावून सांगावें.स्वत: जिजाबाई अतिशय महत्त्वाकांक्षी होती. तिचें शहाणपण चुलीपुरतें नव्हतें. पुरुषांस व स्त्रियांस अतिशय उपयोगी असें शौर्य तिच्या अंगीं होतें. घोड्यावर बसण्यांत ती पटाईत होती. लहानपणापासून दुसऱ्याचा आधार नाहींसा झाल्यामुळें स्वावलंबनाचा धडा ती लहानपणींच शिकली होती, यामुळें तोच धडा तिनें आपल्या प्रिय बालकास शिकविला. जिजाबाईला लिहितां वाचतां येत होतें, हें वर सांगितलेंच आहे. शिवनेरीस असतांना व नंतर तीन वर्षांच्या बालशिवाजीस घेऊन पुण्यास आल्यावर अनेक कारभार स्वत:च्या जबाबदारीवर ती करीत असे. दादाजी कोंडदेव व जिजाबाई यांचें सर्व गोष्टींत एकमत असे. शिवाजी लहान असतां सर्व राज्यकारभाराची जबाबदारी तिच्यावरच होती. शिवाजी मोठा झाला, मोठमोठालीं शौर्याचीं कामें करूं लागला, तरी राज्याच्या मसलतींत व मोठमोठ्या घडामोडींत तिचें अंग असे. मोठमोठ्या कठीण प्रसंगीं व संकटांचे वेळीं शिवाजीला योग्य सल्लामसलत देऊन जिजाबाईच त्याला संकटांतून पार पडण्यास समर्थ करीत असे. जिजाबाई शिवाजीचा व त्याच्या नूतन राज्याचा

एक महत्त्वाचा आधार होता. आश्चर्याची गोष्ट ही कीं, मोठमोठ्या न्यायाधीशांनाही निकाल करतां येणार नाहीं असल्या कठीण व भानगडीच्या तंट्यांचें दोन्ही बाजूंचें म्हणणें ऐकून दोनही पक्षांना पसंत पडतील असे निकाल तिनें दिलेले होते, असें नवीन मिळालेल्या कागदपत्रांवरून सिद्ध झालें आहे. भवानीमातेवर भरंवसा ठेवून शिवबाला धाडसाचीं कामें करण्यास ती उत्तेजन देत असे व कामावर जातांना तूं खास यशस्वी होऊन येशील असा त्याला आशीर्वाद देत असे. यश संपादन करून परत आल्यावर ती त्याची पाठ थोपटून शाबासकी देत असे. त्या शाबासकीनें शिवाजीला जो आनंद होत असे तसा दुसऱ्या कशानेंही होत नसे. पास झाल्यावर घरीं येतांच आईची शाबासकी मिळविण्यास तुम्ही किती उतावळे होतां हें बाळांनों, तुमचें तुम्हांलाच ठाऊक आहे. यावरून आईच्या शाबासकींत काय जादू भरली आहे हें मी तुम्हांला सांगावयास नको. शहाजी मरण पावला तेव्हां तिला अतिशय दुःख झालें व त्या दुःखाचे भरांत ती सती जावयास निघाली. तेव्हां एवढा शूर व शत्रूंचा कर्दनकाळ शिवाजी पण अगदीं लहान लेंकराप्रमाणें आईचे पाय धरून अतिशय शोक करूं लागला. आई तूंच माझा आधार, आई तूंच माझा देव, आई तूंच माझें सर्वस्व. तूंच गेल्यावर मी कोणाच्या आधारावर जगूं ? नकोग आई मला टाकून जाऊं अशी शिवाजीनें दीनपणानें विनवणी केली. जिजाबाईचें मन कळवळलें व सर्व दुःख गिळून केवळ आपल्या शिवबासाठीं सती जाण्याचा निश्चय तिनें सोडून दिला. धन्य माता जिजाबाई आणि धन्य तो सत्पुत्र शिवाजी.

## गोष्ट १५ वी.

## स्वामिभक्त दादाजी कोंडदेव.

शिवाजी महाराजांना लहानाचे थोर करण्याची कामगिरी मुख्यतः त्यांची आई जिजाबाई हिच्यावर पडली होती हें मागील गोष्टींत सांगितलेंच आहे. ही कामगिरी उत्तम तऱ्हेनें बजावण्यास तिला दादाजी कोंडदेव याची फार मदत झाली. शिवाजी महाराजांचें मन सर्वगुणसंपन्न करण्यास जिजाबाईला दुसऱ्याची मदत लागली नाहीं. तें काम तिनें एकटीनेंच उत्तम बजावलें. पण पुणें व सुपें येथील जहागिरीची व्यवस्था कशी पहावी हें प्रत्यक्ष हिंडून व लोकांच्या भेटी करवून दादाजी कोंडदेव यानें शिवाजी महाराजांना शिकविलें. दादाजीनें शिवबाला मराठी, उर्दू, संस्कृत, फारशी या भाषा शिकविल्या. जिजाबाईप्रमाणें दादाजीनेंही शिवरायांना धर्माचें शिक्षण देऊन धर्मशील बनविलें. याशिवाय शेतसाऱ्याची वसुली नीट करून प्रजेला सुखी कसें करावें, शेतकऱ्यांस उत्तेजन देऊन उत्पन्न कसें वाढवावें, घोडे वगैरे जनावरांची जोपासना कशी करावी, नोकरचाकरांची निवड कशी करावी, त्यांना संतुष्ट व आज्ञाधारक व कर्तबगार कसें बनवावें, सैन्याला हुकमतींत कसें ठेवावें इत्यादि गोष्टींचें ज्ञान शिवाजी महाराजांना दादाजी कोंडदेवाकडून प्राप्त झालें. शिवाजी हा क्षत्रियाचा मुलगा आहे हें लक्षांत ठेऊन दादाजीनें शिवाजी महाराजांना युद्धकला शिकविण्याची उत्तम व्यवस्था केली. त्यांचें शरीर बळकट व चपळ व्हावें म्हणून त्यांना कसरत व व्यायामाचे निरनिराळे प्रकार त्यानें शिकविले. हें सर्व वाचून बाळांनो तुम्ही म्हणाल कीं, तर मग दादाजीला राजगुरु म्हणा स्वामिभक्त कां म्हणतां ? बाळांनो, दादाजीला राजगुरु म्हणण्यास कांहीं हरकत

नाहीं, पण मनुष्याच्या हातुन बरींच कामें झालीं असतील तर त्याच्या मुख्य व महत्त्वाच्या कामावरूनच त्याला ओळखतात. आतां शिवाजी महाराजांना त्यानें उत्तम शिक्षण दिलें हें खरें, पण त्या कामीं मुख्य कामागिरी व योजना शिवाजी महाराजांची आई जिजाबाई हिची होती. शहाजी व जिजाबाई यांचा दादाजी हा विश्वासू कारभारी होता. जिजाबाईचा त्याचे हुशारीवर व स्वामिभक्तीवर पूर्ण विश्वास होता. सर्व कामांत दादाजी आपला उजवा हात आहे असें जिजाबाई मानीत असे. आणि दादाजीही त्याच्यावर टाकलेल्या विश्वासाप्रमाणें अत्यंत कळकळीनें जिजाबाईच्या इच्छेप्रमाणें सर्व कामें बजावीत असे. खरोखरच तो जिजाबाईचा उजवा हात होता आणि शिवाजीला जें त्यानें शिक्षण दिलें तें जिजाबाईचा उजवा हात म्हणूनच तिच्या इच्छेप्रमाणें व योजने-प्रमाणें दिलें.

यामुळें दादाजीची ज्या गुणावरून विशेष स्तुति करावयाची तो गुण म्हटला म्हणजे त्याची अलौकिक स्वामिभक्ति. दादाजी फार हुशार, प्रामाणिक व विश्वासू आहे अशी शहाजीची खात्री होती. यामुळें त्यानें पुणें, सुपें, बारामति, इंद्रापूर, मावळ वगैरे महाराष्ट्रांतील आपल्या जहागिरीचा कारभार पाहाण्यास त्यास नेमिलें. ही धन्यानें नेमून दिलेली कामगिरी स्वामिभक्त दादाजीनें उत्तम प्रकारें बजावली. दादाजीवर शहाजीनें एवढी जबाबदारीची कामगिरी सोंपविली याचें कारण दादाजी हा भोंसल्यांचा विश्वासू व जुना नोकर होता. मालोजी जेव्हां हिंगणी वेरूळ वगैरे गांवचा पाटील होता तेव्हां दादाजी तेथें कुलकर्णी होता. त्या वेळेपासून दादाजीची कर्तबगारी व स्वामिभक्ति शहाजीला माहित होती.

दादाजीनें पुण्याकडील शहाजीच्या जहागिरीचा कारभार फार मन लावून केला. दादाजी कारभारी झाला तेव्हां मुसलमानी लुटालुटीमळें व दुष्काळामुळें तो प्रांत ओसाड झाला होता. त्यांत दादाजीनें पुनः वसति करविली व तो चांगला सुपीक बनविला. आसपासचे शेतकरी आपल्या प्रांतांत यावे म्हणून दादाजीनें त्यांना कांहीं वर्षे फुकट जमिनी दिल्या. त्यानें जमिनीची पीकपहाणी केली व नेमस्त सारा ठरविला. पीक कमी आलें तर साराही कमी घ्यावयाचा असें त्यानें ठरविलें. यामुळें आसपासचे पुष्कळ मेहनती शेतकरी त्या प्रांतांत येऊन त्यांनीं शेतें सुपीक केलीं. यामुळें जहागिरीचें उत्पन्न वाढलें. त्या प्रांतांत वाघ, लांडगे वगैरे भयंकर जनावरें फार होतीं. त्यांचा नायनाट करावा म्हणून जंगलांतील मावळे वगैरे लोकांस त्यानें असें कळविलें कीं, जो कोणी वाघ, लांडगा वगैरे क्रूर जनावर मारून आणील त्याला बक्षीस मिळेल. बक्षिसांच्या आशेनें मावळे लोकांनीं वाघ व लांडगे यांचा चांगलाच फडशा उडविला, यामुळें तो गांव निर्भय झाला. चोरांचा बंदोबस्त व्हावा म्हणून त्यानें जागजागीं चौक्या ठेविल्या. जहागिरींत पुष्कळ सुंदर बागा तयार व्हाव्या म्हणून त्यानें लोकांना फळझाडें लावण्यास मदत केली. यामुळें जिकडे तिकडे सुंदर बागा तयार झाल्या. जहागिरींत जे किल्ले होते, त्यांची त्यानें नीट दुरुस्ती केली. व त्यांवर रक्षणासाठीं लोक ठेविले. त्यानें मावळे लोकांचें एक लहानसें सैन्य तयार केलें. जहागिरींत स्वतंत्रतेनें वागावयास संवकलेल्या देशमूख, देशपांडे वगैरेंना त्यानें ताळ्यावर आणलें. अशा तऱ्हेनें जहागिरीची उत्तम व्यवस्था मोठ्या कळकळीनें ठेऊन खर्च वजा जातां जें उत्पन्न उरे तें हा प्रामाणिक स्वामिभक्त वेळचे वेळीं शहाजीकडे पाठवीत

असे. आपल्या धन्याची बायको हिचें सर्व प्रकारें त्यानें सहाय्य केलें, धन्याचा मुलगा शिवाजी याचें लालनपालन व शिक्षण केलें, व धन्याची जवळजवळ ओसाड झालेली जहागिरी उत्तम भरभराटीस आणली, यावरून त्याच्या स्वामिभक्तीची कोणासही उत्तम कल्पना होईल.

---

## गोष्ट १६ वी.

## दादाजीचा अलौकिक प्रामाणिकपणा.

बाळांनों, दादाजी कोंडदेव मोठा स्वामिभक्त होता व तो धन्याची बायको व धन्याचा मुलगा यांचें संरक्षण व हित अत्यंत कळकळीनें व हुशारीनें व देह झिजवून करीत असे हें तुह्मांला मागल्या गोष्टींत सांगितलेंच आहे. दादाजी हा जसा स्वामिभक्त होता तसाच तो फार प्रामाणिकही होता. त्याच्या प्रामाणिकपणाविषयीं एक सुंदर गोष्ट प्रसिद्ध आहे ती अशीः—

आपल्या धन्याचा मुलगा याला जहागिरीची प्रत्यक्ष माहिती व्हावी म्हणून दादाजी शिवाजीला बरोबर घेऊन जहागिरींतील निरनिराळया भागांत हिंडत असे व त्याला प्रजेची ओळख करून देत असे. त्याचप्रमाणें त्यानें जहागिरींत ठिकाठिकाणीं बागा तयार करविल्या होत्या त्याही तो शिवाजीला दाखवीत असे. एके दिवशीं नेहमींच्या क्रमाप्रमाणें शिवाजीला बरोबर घेऊन शहाजीच्या एका आंब्याच्या बागेंतून तो चालला होता. इतक्यांत सहज हातास लागण्यासारखा एक पक्का व पाड लागल्यामुळें सुंदर दिसणारा असा आंबा त्याला दिसला. लगेच त्यानें आपल्या हातानें तो सुंदर आंबा तोडून घेतला. पण लगेच त्याच्या लक्ष्यांत आलें कीं, हें आपण फार वाईट

काम केलें. हा आंबा आपल्या धन्याचा आहे. आपला नाहीं. हा आपण तोडावयास नको होता. आपण अपराध केला तेव्हां आपल्याला शिक्षा भोगलीच पाहिजे असें त्याला वाटलें. म्हणून तो लगेच जवळच्या नोकरास म्हणाला 'ह्या माझ्या हातानें आंबा तोडण्याचा अपराध केला आहे, यासाठीं तुम्ही हा माझा हात तोडा.' त्यानें चाकरांना पुष्कळ सांगून पाहिलें. पण त्याच्या सांगण्याप्रमाणें कोणीच करीना. हें पाहून बरोबर असलेले शिवाजी महाराज म्हणाले 'हें तुमचें करणें बरोबर नाहीं. या बागेची लावणी तुम्हीं केली आहे. तुम्ही मालकच आहां,' असें शिवाजी महाराजांचेंही म्हणणें पडल्यामुळें त्याचें कोणीच ऐकेना. तेव्हां त्यानें आपल्या अंगरख्याचा एक हात तोकडा केला व असा एक हात तोकडा असलेला अंगरखा तो मरेपर्यंत घालीत असे. कांहींचें म्हणणें असें आहे कीं ही गोष्ट पुढें शहाजीला समजली तेव्हां त्याच्या ह्या विलक्षण प्रामाणिकपणानें त्यांना फार संतोष झाला व त्यांनीं त्याला सातशें होन व एक सुंदर दोनही हात सारखे असलेला अंगरखा पाठवून दिला, व माझे जहागिरींतून तुला वाटेल तो खर्च तूं कर, असें त्यांनीं त्याला सांगून पाठविलें. बाळांनों पाहिलेंतना हें विलक्षण प्रामाणिकपणाचें उदाहरण. असेच तुम्ही प्रामाणिक व्हा.

---

## गोष्ट १७ वी.

## स्वराज्याची जननी जिजाबाई.

बाळांनों जननी म्हणजे आई. स्वराज्य म्हणजे आपलें राज्य. मागें एका गोष्टींत तुम्हांला सांगितलेंच आहे, कीं महाराष्ट्रांतील

मराठी राज्य तालिकोटच्या लढाईंत बुडालें. तेव्हांपासून महाराष्ट्रावर मुसलमानी अंमल सुरू झाला. मराठी राज्याचा उत्कर्ष देवगिरीचे राजे रामदेव यादव यांच्या वेळीं झाला. ही गोष्टही तुम्हांला मागें सांगितलीच आहे. यादवांचें राज्य गेलें व पुढें त्यांचें नांवही बदललें. यादवांनाच पुढें जाधव असें म्हणूं लागले. यावरून जाधव वंशांतील मराठे हे प्रत्यक्ष श्रीकृष्ण यांच्या यादवांचे वंशज,अस्सल क्षत्रिय होत. शेंकडों वर्षें स्वराज्याचा उपभोग घेतल्यामुळें यादववंशांत स्वराज्याचें पाणी एकसारखें चमकत होतें. अशा जाधवांचीच मुलगी जिजाबाई ही गोष्ट तुम्ही विसरलां नसालच. आपले पूर्वज किती थोर होते, त्यांनीं किती पराक्रम केले, स्वराज्य कसें उपभोगिलें, हें जिजाबाई महाभारतांतल्या गोष्टी सांगून शिवाजीच्या मनावर ठसवीत असे. यादव ऊर्फ जाधव या तेजस्वी वंशास शोभेल असाच तिचा स्वभाव होता. तिच्या बापाला व भावाला अहमदनगरच्या निजामशहानें ठार मारिलें. प्रत्यक्ष तिला विजापुराहून मोगलांनीं कैद करून नेलें. मुसलमानी राज्यांत अब्रूनें उद्योग करून नांव मिळविण्याचें साधन बिलकूल राहिलें नाहीं. ही गोष्ट तिच्या पक्की लक्ष्यांत आली होती. ही गोष्ट शहाजीच्याही लक्ष्यांत आली असेल नाहीं असें नाहीं. पण शहाजीचें सर्व आयुष्य मुसलमानी राज्यांची नोकरी करण्यांत गेलें होतें. त्यामुळें मुसलमानी राज्याविषयीं त्याला बराच आपलेपणा वाटत होता. निदान स्वराज्य स्थापन करण्याची खटपट करून आपली आधींच मिळविलेली जहागीर धोक्यांत घालावी असें त्याला वाटेना म्हणून त्यानें स्वराज्यस्थापनेस विरोधही केला नाहीं व उघड उघड मदतही केली नाहीं. जिजाबाईची गोष्ट त्याहून निराळी होती. स्वराज्याशिवाय आपलें चालावयाचें नाहीं

असें तिच्या मनाला पुरतेपणीं वाटत होतें. तेंच स्वराज्याचें बाळकडू तिनें शिवाजीला पाजलें. आरंभापासून स्वराज्याची मसलत माता जिजाबाई व सत्पुत्र शिवाजी या दोघांचीच होती. स्वराज्याची प्रेरणा शिवाजीच्या मनांत जिजाबाईनेंच केली. स्वराज्याचे उपयोगी पडणारें शिक्षण बाळशिवाजीला जिजाबाईनेंच दिलें. स्वराज्याचा पाया जिजाबाईनेंच घातला. वेळोवेळीं योग्य सल्लामसलत व उत्तेजन देऊन स्वराज्याची स्थापना व विस्तार शिवाजीकडून जिजाबाईनें करविला. जिजाबाई म्हणजे स्वराज्याचा आधार ही गोष्ट शिवाजी पुरतेपणीं जाणत होता. व हीच गोष्ट सांगून व आर्जवानें आईच्या पायांवर लोळण घेऊन त्यानें तिला सती जाण्याचा बेत सोडावयास लाविलें आणि म्हणूनच बाळांनों, आपण जिजाबाईला स्वराज्यजननी म्हणतों. जशी स्वराज्य-संस्थापक शिवाजी महाराज यांची ती जननी होती तशीच शिवछत्रपतींच्या स्वराज्याचीही ती जननी होती. ती इतर साध्या आयांसारखी नव्हती, ही गोष्ट बाळांनों, चांगली लक्ष्यांत ठेवा.

---

## गोष्ट १८ वी.

## स्वराज्याचा संकल्प.

शिवाजी महाराजांचा जन्म पुण्यापासून सुमारें पन्नास मैलांवर शिवनेरी येथें सन १६२७ त झाला हें मागें आलेंच आहे. त्यानंतर जिजाबाई व दादाजी कोंडदेव हे बाळशिवाजीला घेऊन पुण्यास राहूं लागले. शहाजीच्या जहागिरींत पुणें हें शहर असल्यामुळें दादाजींनें कसबा पेठेंत शिवबाळासाठीं एक सुंदर वाडा बांधिला. व तेथें जिजाबाई

आपल्या शिवबाळाला घेऊन राहूं लागली. पुण्यासच शिवाजी लहानाचा मोठा झाला. तेथून त्याला जिजाबाईनें धर्मशिक्षण व युद्धशिक्षण दिलें. तेथेंच त्याला जवळ घेऊन दादाजीनें राज्यकारभाराचें व मराठी, उर्दू, संस्कृत व फारशी या भाषांचें शिक्षण दिलें. अशा सर्व तऱ्हेच्या शिक्षणानें स्वराज्य स्थापन करण्यास शिवाजीचे अंगीं योग्यता आली. योग्यतेबरोबरच स्वराज्यस्थापनेची प्रबल इच्छा आईचे शिकवणुकीनें त्याचे मनांत उत्पन्न झाली. योग्यता व इच्छा ह्या दोन गोष्टी असल्यावर कामाच्या सुरवातीला काय उशीर ? शिवाजीनें स्वराज्यस्थापनेची खटपट पहिल्यानें सन १६३८ सालीं पुण्यांत राहून सुरू केली. तेथें त्याचेकरितां त्याचा कारभारी दादाजी कोंडदेव यानें एक वाडा बांधून दिला होता. शिवाजीनें स्वराज्याची खटपट सुरू करण्याच्या एक वर्ष आधीं म्हणजे सन १६३७ त शहाजी कर्नाटकांत निघून गेला. तेव्हां या स्वराज्यस्थापनेचा संकल्प म्हणजे बेत मुख्यतः माता जिजाबाई, कारभारी दादाजी कोंडदेव व शिवाजी यांचे मध्यें प्रथम झाला. आतां या संकल्पाप्रमाणें शिवाजीनें कामास कशी सुरवात केली ती पहा. पहिल्यानें त्यानें पुण्याच्या जवळच्या प्रांतांत हिंडून त्या प्रांताची बारकाईनें पहाणी केली. तेव्हां मावळप्रांतांत निरनिराळ्या गांवीं रहात असलेल्या देशमुखांची व देशपांड्यांची त्यानें ओळख करून घेतली. देशमुखांना देशमूख हें नांव त्यांच्या हुद्यावरून पडलें होतें. यांचें काम देशमूखी वतनाचें असें. देशमूख हे मूळचे क्षत्रिय मराठे. अशा क्षत्रिय मराठ्यांचीं पुष्कळ घराणीं मावळ प्रांतांत पसरलीं होतीं. हे वतनदार देशमूख घरंदाज, सुशिक्षित, श्रीमंत व कर्तबगार असत. त्यांच्या मदतीस प्रभु

देशपांडे व ब्राह्मण कुळकर्णी असत. डोंगराळ प्रदेशांत रहात असल्यामुळें त्यांचेवर वरिष्ठ सरकारचा अंमल फारसा चालत नसे. ते जवळजवळ स्वतंत्रतेनेंच रहात असत. अशा या तेजस्वी देशमुखांचा व त्यांचे मदतीस असलेले देशपांडे व कुळकर्णी यांचा आपल्या स्वराज्यस्थापनेच्या कामीं फार उपयोग होईल ही गोष्ट शिवाजीच्या चटकन लक्ष्यांत आली. म्हणून त्यानें पहिल्यानें या देशमुखांत आपआपसांत जीं भांडणें सुरू होतीं तीं युक्तीयुक्तीनें बंद केलीं व त्यांची सर्वांची जूट बनविली. देशमुखांमागून देशपांडे व कुळकर्णी हेही शिवाजी महाराजांस अनुकूल झाले. कांहीं देशमुख शिरजोरपणानें वश होतना, त्यांस आपल्या पराक्रमानें शिवाजीनें मऊ केलें. अशा तऱ्हेनें शिवाजीचें अगदीं छोटें स्वराज्य मावळ प्रांतांत सुरू झालें व त्याचें मुख्य ठिकाण पुणें शहर बनलें.

---

## गोष्ट १९ वी.

# स्वराज्याची शपथ.

स्वराज्य स्थापन करण्यासाठीं शिवाजीनें पहिल्यानें अत्यंत शूर देशमुखांचीं भांडणें नाहींशीं करून त्यांची जूट बनविली ही हकीगत मागचे गोष्टींत दिलीच आहे. आतां या जुटीची आपल्या बेताला मदत व्हावी म्हणून शिवाजीनें आपली आई, कारभारी दादाजी व आपण स्वतः यांचा स्वराज्य स्थापण्याचा संकल्प झाला आहे ही गोष्ट तरुण देशमुखांना सांगितली. मुसलमानी राज्यांत हिंदुधर्माची कशी दुर्दशा झाली हें त्यानें त्यांना स्पष्ट करून दाखविलें. मुसलमानी अमलांत लुटालूट व स्त्रियांचा अपमान कसा होत होता

तेंही त्यास त्यानें समजावून दिलें व हे सर्व वाईट प्रकार दूर करण्यास व हिंदूंची स्थिति सुधारण्यास एकच उपाय आहे आणि तो हिंदवी स्वराज्याची स्थापना हा होय, हेंही त्यानें त्या तरुणांच्या मनांत बिंबविलें. देशमुखांबरोबर देशपांडे व कुळकर्णी हेही शिवाजीनें आपलेसे करून घेतले. नंतर आपण हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याकरितां रात्रंदिवस खटपट करूं व एकमेकांच्या साठीं जीवही देऊं अशी शपथ प्रत्येकानें घ्यावी असें ठरलें. त्याप्रमाणें रोहिडखोऱ्यांतील श्रीरोहिरेश्वराचे देवळांत कान्होजी देशमूख, सर्जेराव देशमूख, बाजी पासलकर, नरसो देशपांडे व दादाजी देशपांडे वगैरे मंडळींनीं स्वराज्याची शपथ सन १६४५ त घेतली. अशा तऱ्हेनें शपथेनें बांधून घेतलेली ही मंडळी नंतर अधिकच जोरानें धामधूम करूं लागली. यानंतर मावळ्यांचें पलटण बनवून लवकरच म्हणजे सन १६४६ त शिवाजीनें तोरणा किल्ला घेतला व त्याचें प्रचंडगड असें नांव ठेविलें. तोरणा किल्ल्याची दुरुस्ती करीत असतां शिवाजीला मोहरांचा हंडा सांपडला हें द्रव्य आपणांस स्वराज्यस्थापनेसाठीं देवीनें दिलें असें त्यानें जाहीर केलें. देवीचा या कामास आशीर्वाद आहे अशी सर्वांची खात्री झाली व ते मनोभावानें शिवाजीला मदत करूं लागले. त्याच वर्षीं त्या द्रव्याच्या मदतीनें त्यानें राजगड नांवाचा दुसरा किल्ला बांधला. या दोन किल्ल्यांच्या मदतीनें सर्व मावळ प्रांतावर त्याला अम्मल चालवितां येऊं लागला. अशा तऱ्हेनें सन १६३८ पासून सन १६४६ पर्यंत शिवाजीनें हल्लींच्या बहुतेक पुणें जिल्ह्यास वेढून जी शहाजीची जहागीर होती तेवढ्या भागांत एक लहानसें व्यवस्थित व नमुनेदार व वास्तविक स्वतंत्र असें राज्य तयार

केलें. तें इतकें व्यवस्थित व बंदोबस्ताचें होतें कीं, इतर मुसलमानी मुलुखापेक्षां या राज्यांत लोकांना जास्त सुख वाटूं लागलें. चोऱ्यामाऱ्या, दंगेधोपे व लुटालूट बंद झाली, सर्वत्र शांतता नांदूं लागली. अशा तऱ्हेनें मनांत ज्याचा संकल्प केला होता तें स्वराज्य प्रत्यक्ष निर्माण झालें. पुढील मोठ्या स्वराज्याचा पाया अशा तऱ्हेनें घातला गेला. सन १६३८ तच शिवाजीच्या नांवाची मोहोर तयार केली होती. त्यावर ' प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता । शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥ ' असा श्लोक कोरलेला होता. याचा अर्थ शहाजीचा मुलगा शिवाजी याची ही मोहोर आहे; व आज जरी ही प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणें लहान आहे तरी त्या चंद्रकोरेप्रमाणें उत्तरोत्तर वाढणारी व जगाला वंदन करण्यास योग्य अशी होणार आहे. आणि ही लोकांच्या कल्याणाकरितांच धारण केलेली असल्यामुळें शोभत आहे. शिवाजीच्या सर्व कागदपत्रावर अखेरपर्यंत हीच मोहोर केलेली आहे. सन १६४६ त तर शिवाजीला छत्रपति असें म्हणण्याचा प्रघात पडला. अशा तऱ्हेनें स्वराज्य संस्थापनेचें काम बळकट पायावर डौलदार उभें राहिलें.

सन १६४७ त शिवाजीचा गुरु व स्वामिभक्त कारभारी दादाजी कोंडदेव मरण पावला. मरतांना ' गोब्राह्मणसंरक्षणाचा हा क्रम असाच जोरांत चालव. ' असें त्यानें आपल्या प्रिय शिवाजीला सांगितलें. यामुळें शिवाजीला अधिकच उत्तेजन मिळालें. नंतर त्यानें चाकणचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळे याचें मन वळवून तो किल्ला घेतला. एकदम हल्ला करून व सुभेदार बाजी मोहिते यांस कैद करून सुपे प्रांत त्यानें आपल्या राज्यास जोडला. नंतर १६४८ त त्यानें पुरंदर,

व सिंहगड हे किल्ले व कोंकणांतला कल्याण प्रांत आपले ताब्यांत आणला. याशिवाय त्यानें जंजिऱ्याच्या सिद्दीपासून समुद्र-कांठचा बराच मुलूख जिंकून घेतला. त्यांत त्याला रायगड किल्ला व राजापूर बंदर मिळालें.

गोष्ट २० वी.

## शहाजीस अटक.

बाळांनो, शिवाजी महाराजांनीं अत्यंत श्रम करून स्वराज्य-संपादनाचें कार्य कसें यशस्वी केलें हें मागच्या गोष्टींत तुम्हीं वाचलेंच आहे. शिवाजी महाराजांच्या या धूमधडाक्याची हकीकत वारंवार विजापूरच्या सुलतानाच्या कानांवर जाऊं लागली. यामुळें सुलतान व त्याची दरबारी मंडळी अगदीं खवळून गेली. या बंडखोर शिवाजीवर ताबडतोब सैन्य पाठवा व याची खोड मोडा असें सरदार लोक सुलतानाला म्हणूं लागले. पण सुलतानाला सैन्य पाठवण्याची मसलत पसंत पडली नाहीं. त्याला वाटलें कीं, शिवाजी जी बंडाळी माजवीत आहे त्यांत त्याचा बाप शहाजी याची त्याला फूस आहे. यासाठीं शहाजीचा बंदोबस्त करावा म्हणजे शिवाजी आपोआप नरम येईल. शिवाय शहाजीला पकडून विजापुरास आणल्यास कर्नाटकांत जें त्याचें वजन वाढलें आहे तेंही अनायासें कमी करतां येईल. असा पूर्ण विचार करून सुलतानानें कर्नाटकांतला आपला दुसरा सरदार बाजी घोरपडे यास ' शहाजीला पकडून विजापुरास घेऊन ये ' असा गुप्त हुकूम पाठविला. हुकूम मिळाल्यावर बाजी घोरपड्यानें शहाजीस आपले घरीं जेवावयास बोलावलें. व विश्वासघात करून कैद केलें. नंतर त्याला घेऊन तो विजापुरास सन १६४७ त गेला. शहाजीला पाहातांच

सुलतानानें त्याला सांगितलें कीं, 'तुझा मुलगा दंगा करीत आहे त्यांत तुझें अंग आहे. तर त्याचा एकदम बंदोबस्त कर.' शहाजी म्हणाला 'माझा मुलगा माझें ऐकत नाहीं. तो सरकारचा गुन्हेगार आहे. त्याजवर फौज पाठवून सरकारनीं त्याचा बंदोबस्त करावा. हें शहाजीचें म्हणणें साफ खोटें आहे असें सुलतानास वाटलें. तेव्हां त्यानें शहाजीकडून शिवाजीस असें पत्र लिहविलें कीं, ' मला सुलतानानें अटकेंत ठेविलें आहे. यासाठीं घेतलेला सर्व मुलूख सुलतानास द्यावा व आपण एकदम विजापुरास यावें. न आल्यास सुलतान माझा जीव घेईल. ' हें पत्र वाचून शिवाजी मोठ्या संकटांत पडला. ' स्वराज्य सोडावें कां बापास मरूं द्यावें. ' असा कठिण प्रश्न त्याचे पुढें उभा राहिला. त्यानें सर्वांस विचारलें. त्याची बायको सईबाई, व आई जिजाबाई व इतर मंडळी यांचें म्हणणें पडलें कीं विजापुरास जाऊं नये. विचार करितां करितां त्याला उत्तम युक्ति सुचली ती लढवून त्यानें आपल्या बापाची सुटकाही केली व स्वराज्यही संभाळलें. ती युक्ति अशी:--

दिल्लीचा बादशहा शहाजहान याला त्यानें तोंपर्यंत बिलकुल त्रास दिला नव्हता. शिवाय दिल्लीचा बादशहा याचे मनांत विजापूर व इतर दक्षिणेंतील राज्यें बुडवावयाचीं आहेत ही गोष्टही त्याला माहीत होती. यामुळें त्यानें शहाजहानाकडे आपला वकील पाठविला. व माझे बापाची विजापुरच्या सुलतानाकडून सुटका करवा म्हणजे मी व माझा बाप तुमची चाकरी करूं असा निरोप पाठविला. शिवाजी व शहाजी फार पराक्रमी आहेत ही गोष्ट शहाजहान व त्याचा मुलगा अवरंगजेब यांना माहीत होती. हे दोन मराठे सरदार आपल्यास मिळाल्यास दक्षिणेंतील

मुसलमानी राज्यें आपण हां हां म्हणतां बुडवून टाकूं असें त्यांना वाटलें म्हणून शहाजहानानें लगेच विजापूरच्या सुलतानास लिहून कळविलें कीं शहाजीस तावडतोब सोडून द्यावें. शहाजहान बादशहाचा हुकूम अमान्य करण्याची विजापुरच्या सुलतानास छाती होईना. त्यानें लगेंच शहाजीस मोकळे केलें. मात्र आणखी चार वर्षें त्यानें त्याला विजापूर सोडून कर्नाटकांत जाऊं दिलें नाहीं.

शहाजी विजापुरास होता तोंपर्यंत शिवाजीनें विजापुरच्या मुलुखास मुळींच त्रास दिला नाहीं. या गोष्टीवरून बाळांनों, एक गोष्ट लक्षांत ठेवा कीं, शिवाजीला शक्ति व युक्ति या दोन्हीही साह्य करीत होत्या. वेळ पडेल त्याप्रमाणें तो फार शहाणपणानें शक्तीचा किंवा युक्तीचा उपयोग करून संकटाचें निवारण करीत असे.

---

## गोष्ट २१ वी.

## ' केलें परा तें आलें घरा. '

बाळांनों, पुढारी किंवा राज्यकर्ते यांच्या अंगीं एक गुण मुख्यतः असला पाहिजे. तो हा कीं, चांगली वस्तु व चांगलें गुणी मनुष्य नीट ओळखून त्यांचा संग्रह करणें. हा गुण शिवाजीच्या अंगीं चांगला वसत होता. चांगला मनुष्य शत्रूच्या नोकरींतही असला तरी वाटेल तो प्रयत्न करून त्याला आपलासा करून घेण्याची खुबी शिवाजीला फार साधली होती. शत्रूशीं युद्ध करीत असतां शत्रूच्या बाजूनें अतिशय पराक्रमानें कोण लढत आहे हें शिवाजी फार बारकाईनें पहात असे व शत्रूचा पराभव केल्यावर त्या निवडक-

मनुष्याला आपल्या नोकरीस ठेऊन त्याला लौकिकास चढवीत असे. त्याचप्रमाणें उत्तम वस्तूंचीहि पारख करून तो संग्रह करीत असे. अशा तऱ्हेनें संग्रह केलेल्या निवडक रत्नांचा त्याला स्वराज्यस्थापनेचे कामीं फार उपयोग झाला. अशा तऱ्हेचीं दोन रत्नें त्यानें आपल्या कोंकणच्या स्वारींत मिळविलीं. त्यांपैकीं पहिलें रत्न म्हणजे त्याची अजिंक्य भवानी तलवार. ही त्याला गोवळकर सांवताकडून मिळाली. तिच्याबद्दल शिवाजीनें सावंतांना तीनशें होन व मौल्यवान् पोषाख दिला दुसरें रत्न म्हणजे बाळाजी आवजी चिटणीस. बाळाजी आवजी हा जंजिऱ्याचे सिद्दीचा प्रभु दिवाण आवजी हरी चित्रे याचा मुलगा. सिद्दीनें आवजी हरीला मूर्खपणानें ठार मारलें. यामुळें आवजीचा मुलगा बाळाजी कृतघ्न सिद्दीस सोडून गुप्त शिवाजीचे नोकरीस राहिला. हें प्रभुरत्न शिवाजीच्या हिंदवी स्वराज्यास अतिशय उपयोगी पडलें. शिवाजीची चिटणिशी बाळाजी आवजी यांनीं फार कळकळीनें व प्रामाणिकपणानें केली. जावळीचे चंद्रराव मोरे हेही फार शूर व पराक्रमी आहेत हें शिवाजीला माहीत होतें म्हणून आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्यांस वश करून स्वराज्याच्या कामीं लावावें म्हणून शिवाजीनें पुष्कळ प्रयत्न केला. पण विजापूरची बाजू धरून स्वराज्याचा नाश करण्याचा त्यांचा निश्चय पाहून शेवटीं निरुपायानें शिवाजीनें आपल्या लोकांकडून त्यांना ठार केलें व जावळी आपले राज्यास जोडली. आपले दोस्त जावळीचे मोरे यांस शिवाजीनें ठार केल्याचें समजतांच विजापूरचा अदीलशहा संतापला व शिवाजीची खोड कशी मोडावी याचा तो विचार करूं लागला. शहाचा एक अफजुलखान नांवाचा धिप्पाड व शूर सरदार

होता. त्यानें प्रतिज्ञा केली कीं, आज्ञा होतांच डोंगरी उंदीर शिवाजी याला जिवंत किंवा मेलेला कसा तरी झटपट पकडून आणतों. प्रतिज्ञा पुरी करण्याकरतां लगेच शहाची आज्ञा घेऊन खानाची स्वारी बारा हजार फौज घेऊन सन १६५९ त निघाली. वाटेंत खानानें पंढरपूरचा विठोबा व तुळजापूरची भवानी यांच्या मूर्तींचे तुकडे तुकडे केले. यामुळें हिंदु लोकांस संताप आला व खानाचा शिवाजीकडून फडशा उडवावा असें त्यांना वाटूं लागलें. अफजुलखानास अडचणीच्या डोंगराळ प्रदेशांत गांठावें म्हणून शिवाजी प्रतापगडावर आला. खानही प्रतापगडाजवळ वांईस आला. या डोंगराळ प्रदेशांत लढाई करून आपली फौज खराब करणें खानास आवडलें नाहीं. शिवाजीला युक्तीनें फसवूनें पकडावा असें त्यानें ठरविलें. खानानें शिवाजीकडे आपला वकील कृष्णाजी भास्कर यास पाठविल. शिवाजी कृष्णाजी भास्करास म्हणाला 'तुम्ही ब्राह्मण आहां व मी आपला देह गोब्राह्मणांचे रक्षणासाठीं व हिंदवी स्वराज्याचे स्थापनेसाठीं झिजवीत आहें. यासाठीं आपण मुसलमानी राज्यास मदत करून माझा नाश करूं नये.' अशा तऱ्हेनें त्या ब्राह्मणास वळवून त्याचेकडून खान दगलबाजी करून आपणास पकडण्याच्या विचारांत आहे ही माहिती त्यानें मिळविली. नंतर शिवाजीचा वकील गोपिनाथपंत व खानाचा वकील कृष्णाजी भास्कर यांनीं असें ठरविलें कीं, एकमेकांस समेट करण्यासाठीं खान व शिवाजी यांनीं प्रतापगडच्या पायथ्याशीं भेटावें. दोघांनींही फक्त एक सशस्त्र संरक्षक बरोबर आणावा. ही मसलत खानास पसंत पडली. शिवाजी म्हणजे उंदीर आपण त्याला तेव्हांच पकडूं किंवा मगरमिठींत चिरडून टाकूं असें त्याला वाटलें. इकडे खानाचा दगलबाजीचा

उद्देश शिवाजीला आधींच कळला होता. शिवाय त्याचा वडील भाऊ संभाजी याला खानानें दगलबाजी करून पूर्वी ठार मारल्याचें त्याच्या आईनें त्याला सांगितलें होतें. म्हणून शिवाजीनें आपल्या संरक्षणाची जय्यत तयारी केली, अंगांत पोलादी चिलखत व त्यावर अंगरखा घातला. डोक्यास शिरस्त्राण म्हणजे लोखंडी टोपी घालून त्यावरून पागोटें घातलें. उजव्या हातांत भवानी तलवार, अंगरख्याच्या बाहींत बिचवा व डाव्या हातांत वाघनख घेतलें. अशा तऱ्हेनें पोषाख करून देवीस व आईस साष्टांग नमस्कार करून शिवाजी खानाचे भेटीस निघाला. खानही सय्यद बंडू नांवाचा सशस्त्र शूर संरक्षक बरोबर घेऊन निघाला. शिवाजीबरोबर संरक्षक म्हणून तानाजी मालुसरे होता. दोघांची भेट मुद्दाम उभारलेल्या तंबूंत झाली. शिवाजीनें न घाबरतां पुढें येऊन खानास सलाम केला. खान शिवाजीस म्हणाला ' तुम्हीं हें राज्य लुटून किल्ले काबीज करतां हें योग्य नाहीं. ' शिवाजी म्हणाला ' हे किल्ले मी मोंगलापासून जिंकून घेतले आहेत व त्यांतील बंडाळी मोडून शांतता स्थापन केली आहे. ' खान म्हणाला झालें तें झालें. सर्व किल्ले माझे स्वाधीन करा व विजापूरला चला. ' शिवाजी म्हणाला. ' आधीं मला माफी केली आहे असा शहाचा हुकूम आणा. ' नंतर तुमची माफी मागून तुम्हांस शरण येतों असें म्हणत शिवाजी पुढें सरला तेव्हां खानानें त्याला मिठी मारली. मिठी मारतांना खानानें शिवाजीस घट्ट आवळून धरलें व खंजिरानें त्यास वार केला. शिवाजीचे अंगांत चिलखत होतें यामुळें त्यास इजा झाली नाहीं. खानाची ही दगलबाजी पहातांच शिवाजीनें वाघनख व बिचवा खुपसून खानाची आंतडीं बाहेर काढलीं. इतक्यांत खानानें शिवाजीच्या डोक्या-

वरं घाव घातला. पण लोखंडी शिरस्त्राण शिवाजीच्या डोक्या-वर होतें यामुळें फारशी इजा झाली नाहीं. नंतर शिवाजीनें तरवारीचा वार करून खानास ठार केलें. खानाचा संरक्षक सय्यद्-बंडू पुढें सरसावला. पण लगेच तानाजीनें त्याला ठार केलें. अशा रीतीनें शिवाजीचा कांटा एकदम काढण्याचा खानानें प्रयत्न केला पण शिवाजीच्या सावधगिरीनें त्याचा बेत फसून त्यालाच प्राणास मुकावें लागले. '**केलें परा तें आलें घरा**' ही म्हण खरी ठरली. खान पडल्यावर शिवाजीच्या सैन्यानें हां हां म्हणतां खानाचे सैन्याचा समाचार घेतला व पुष्कळ लूट मिळविली व शरण आले त्यांस सोडून दिलें. मराठे-शाहीच्या खऱ्या स्थापनेस या पराक्रमाचा फार उपयोग झाला. मराठे सरदारांवर त्याचा दरारा बसला. हा अलौकिक पुरुष आहे, हा म्हणेल तें करील अशी लोकांची खात्री झाली. त्याच-प्रमाणें अफजुलखानाच्या वर्तनानें आपलीं देवळें व आपला धर्म मुसलमानांच्या राज्यांत सुरक्षित रहाणार नाहींत, अशीही सर्व लोकांची खात्री झाली, व धर्म रक्षणासाठीं रात्रंदिवस झटून स्वराज्य स्थापित असलेल्या शिवाजीला आपण मदत केली पाहिजे असें त्यांस वाटूं लागलें.

---

## गोष्ट २२ वी.

## स्वामिभक्त बाजीदेशपांडे.

बाळांनों, अफजुलखानाचें कारस्थान त्याच्याच गळ्यांत येऊन त्याचा नाश कसा झाला ही गोष्ट नुकतीच तुम्हीं वाचली. या विजयाचा फायदा घ्यावा व विजापूरच्या राज्यांतला कोल्हापूर प्रांत आपले अमलाखालीं आणावा, म्हणून विसावा न घेतां शिवाजीनें कोल्हापूर प्रांतावर स्वारी केली.

प्रथम पन्हाळा, पवनगड व वसंतगड हे किल्ले किल्लेदारांचें मन वळवून त्यानें घेतले. नंतर शौर्यानें लढून रांगणा व खेळणा हेही किल्ले त्यानें जिंकले. खेळणा किल्याचें नांव विशाळगड असें ठेवण्यांत आलें. ह्या धामधुमीमुळें आपल्यावर चालून आलेला विजापूरचा रुस्तुमुज्जमान याचा त्यानें सहज पराभव केला इतकेंच नव्हे तर त्यानें विजेप्रमाणें झपाझप विजापूरपर्यंत मुलूख लुटींत जाऊन लगेच परत फिरून राजगड गांठला. या त्याच्या अजब पराक्रमानें आदिलशहा अगदीं घाबरून गेला. शेवटीं अखेरचा उपाय म्हणून विजापूरचा कर्नाटकांतील बलाढ्य सरदार सीद्दी जोहार यास मोठें सैन्य देउन त्यानें शिवाजीवर पाठविलें. सिद्दी जोहार शिवाजीवर स्वारी करीत आहे ही गोष्ट समजतांच वाडीचे सांवत व जंजिऱ्याचा सिद्दी हेही शिवाजीवर उठले. तरी शिवाजी घाबरला नाहीं. त्यानें राघो बल्लाळ यास जंजिऱ्यावर पाठविलें. बाजी पासलकर यास सांवतांची खोड मोडण्याचें काम दिलें, मोरोपंताकडे पुरंदर प्रांत दिला, अबाजी सोनदेव कल्याणकडे होताच व स्वतः शिवाजी पन्हाळ्यावर जय्यत तयार राहिला. जोहारही इतर कोठें न वळतां एकदम पन्हाळ्यावर गेला व त्या किल्ल्याला कडक वेढा देऊन बसला. दाणा वैरण आंत मुळींच न पोंचल्यामुळें शिवाजीनें सिद्दीजोहारशीं तहाचें बोलणें लावलें. तह बहुतेक ठरला. हें पाहून वेढा घालणारें सैन्य निष्काळजीपणानें बेसावध राहिलें. त्याचा फायदा घेऊन शिवाजी झपाट्यानें पन्हाळ्यावरून निघून रातोरात काळोखांतून विशाळगडाकडे गेला. ही गोष्ट लक्षांत येतांच सिद्दीजोहारचें सैन्य त्याचा पाठलाग करूं लागलें. त्या वेळीं शिवाजी विशाळगडची चढण चढत होता. शत्रूचें सैन्य पाठलाग करीत आहे, हें लक्षांत येतांच विशाळगडच्या

खिंडींत प्रभु वीरबाजी देशपांडे याला कांहीं मावळे लोक हाताखालीं देऊन पहारा करण्यास व किल्ल्यावर पोंचतांच मी तोफ उडवीन तोंपर्यंत शत्रूस पुढें न येऊं देण्यास सांगितलें. धन्याचा बचाव करण्याकरितां तो शूर वीर बाजी प्रभु हातावर शीर घेऊन खिंडींत उभा राहिला. सिद्दीचें सैन्य एकदां दोनदां तीनदां निकरानें व त्वेषानें त्याच्यावर हल्ला करून गेलें. पण तितक्याही वेळां त्या जवान मर्द प्रभु वीरानें शेंकडों लोकांना लोळवून शत्रूला पिटाळून लाविलें. त्याचे पुष्कळ लोक पडले, त्यालाही पुष्कळ जखमा झाल्या तरी त्या वीराचें तिकडे लक्ष गेलें नाहीं. त्याचे डोळे किल्ल्यावर धन्याकडे लागले होते. त्याचे कान धन्याची सुरक्षितता जाहीर करणाऱ्या तोफेचा आवाज ऐकण्याकरितां उत्सुक झाले होते. शेवटीं गोळी लागून तो धाडकन् जमिनीवर पडला पण त्याचा प्राण जाईना. इतक्यांत शिवाजी महाराज किल्ल्यावर सुखरूप पोंचल्याच्या तोफा त्यास ऐकूं आल्या. तेव्हां त्याला आनंद झाला व समाधान वाटलें. ' मी आपली कामगिरी बजावली, ' असें म्हणत त्या स्वामिभक्त नरवीरानें प्राण सोडले. धन्य तो धन्यासाठीं जीव देणारा बाजी प्रभु व धन्य तो त्याचा धनी शिवाजी. बाजी प्रभुसारखे नरवीर कोणत्याही देशांत जन्माला आले तरी ते सर्व जगाला वंदनीय होतात. बाजी प्रभूच्या या अलौकिक उदाहरणानें देशासाठीं पराक्रम गाजवून ' मी आपलें कर्तव्य बजावलें ' असें म्हणत प्राण सोडणाऱ्या नेल्सन व वुल्फ या इंग्लिश वीरांची आठवण होते.

शिवाजी याप्रमाणें निसटून गेल्यामुळें आदिलशहाची हिम्मत खचून गेली. सिद्दी जोहारवरचा आदिलशहाचा वि-

श्वास उडाला. यामुळें तो विजापुरास न जातां परस्पर कर्नाटकांत चालता झाला. अशा तऱ्हेनें शिवाजीची खोड मोडण्याचा विजापूरचा सन १६६० तला दुसरा प्रयत्न फुकट गेला.

---

## गोष्ट २३ वी.

## त्रिवेणी संगम.

आतांपर्यंत बाळांनों, ही गोष्ट तुमच्या लक्ष्यांत आलीच असेल कीं शिवाजीच्या पराक्रमापुढें आदीलशाहीस हात टेकावे लागले. शिवाजी आपणास आटपत नाहीं अशी आदिल-शहाची खात्री झाली. सांवत, दळवी, घोरपडे, सिद्दी वगैरे शूर सरदार शिवाजीनें आपल्या ताब्यांत आणिले. अफजुल-खान व सिद्दी जोहार यांचा त्यानें पराभव केला व विजापूरच्या सैन्याची दाणादाण केली. ह्या गोष्टी शिवाजीच्या प्रखर पराक्रमाची शहास खात्री पटवून देत होत्या. इकडे महाराष्ट्रांत शिवाजी प्रबल तर तिकडे कर्नाटकांत त्याचा बाप शहाजी प्रबळ. अशा कात्रींत आपलें राज्य सांपडलें आहे असें विजापूर-च्या शहास वाटून कसाबसा शिवाजीशीं तह झाला म्हणजे आपणांस जरा तरी विसावा मिळेल या आशेनें त्यानें शहाजीला त्या कामासाठीं शिवाजीकडे पाठविलें. फार वर्षें वियोग झाल्या-मुळें शहाजीलाही आपल्या विजयी पुत्रास केव्हां भेटेन असें झालें होतें. शिवाजीच्या अलीकडच्या अचाट पराक्रमामुळें शिवाजीविषयीं त्याच्या मनांत अभिमान उत्पन्न झाला होता. तेव्हां 'यत्न करून पहातों, असें सांगून आपली दुसरी बायको तुकाबाई व मुलगा व्यंकोजी, यांना बरोबर घेऊन ते

शिवाजीकडे जाण्यास निघाले. वाटेंत तुळजापूरची कुळस्वामिनी देवी, शिंगणापूरचा शंभुमहादेव, व पंढरपूरचा विठोबा यांचें दर्शन घेऊन ते जेजूरीस गेले. फार वर्षांनीं भेट व्हावयाची असली म्हणजे प्रथम देवाचेसमोर भेटावें असें शास्त्र आहे. त्याप्रमाणें त्या पराक्रमी पितापुत्रांची भेट जेजूरीच्या खंडोबाचे देवळांत झाली. तेथें शिवाजी महाराजांनीं नम्रतेनें बापाच्या पायांवर डोकें ठेविलें. मग शहाजीनें प्रेमानें शिवाजीला आलिंगन दिलें नंतर शिवाजीमहाराजांनीं शहाजीला पालखींत बसाविलें व आपण स्वतः पालखीचा दांडा खांद्यावर घेऊन पायीं चालत आपल्या तंबूंत गेले. ही शिवाजीची पितृभक्ति पाहून सर्वांस अतिशय आश्चर्य व कौतुक वाटलें. बाळांनो, पाहिलेंतना हें पितृभक्तीचें उदाहरण. नाहींतर हल्लींचे मुलगे जरा थोडें शिकले कीं, लागतात लगेच बापाची अमर्यादा करायला एवढें शौर्य गाजवून व मोठमोठाल्या राजांचा पराभव करून सर्व जगांत नांव गाजविल्यावरही एखाद्या क्षुल्लक माणसाप्रमाणें नम्र होऊन बापास पालखींत बसवून स्वतः वाहून नेणें ही गोष्ट शिवाजी महाराजांच्या थोरपणाची व पितृभक्तीची उत्तम साक्ष देते. बाळांनो, तुम्हीही असेच पितृभक्त व्हा.

असो. नंतर शिवाजी महाराजांनीं सहा महिने शहाजीला ठेवून घेतले, त्यांना आपला सर्व मुलूख व किल्ले दाखविले. नंतर थोर साधु रामदास स्वामी यांचे भेटीस ही पराक्रमी पितापुत्रांची जोडी गेली. त्या भेटीचें वर्णन काय करावें. तो प्रत्यक्ष त्रिवेणी संगम होता. ज्याप्रमाणें गंगा, यमुना व सरस्वती यांचा पवित्र संगम सर्व जनांस आनंद देतो, त्याचप्रमाणें तीन प्रवाहांचा हा त्रिवेणी संगम फारच बहारीचा होता. एक स्वदेशप्रेमाचा प्रवाह कर्नाटकांतून वहात आला होता त्याचें

नांव शहाजी. दुसरा मुख्य स्वराज्यसंस्थापक प्रवाह वहात आला होता तो तिघांत अतीशय जोमदार होता. त्याचें नांव शिवाजी. या दोनही प्रवाहांना धर्माचें जोरदार पाठबळ देऊन उत्तेजित करणारा तिसरा प्रवाह होता त्याचें नांव रामदास

रामदास



अशा या तीन वेणींचा म्हणजे प्रवाहांचा १६६२ त संगम होऊन त्याच्यापासून एक जोरदार नदी जोरानें वाहूं लागली. तिचें नांव स्वराज्य नदी. या संगमानंतर स्वराज्याची वाढ जोरानें होऊं लागली. असो. नंतर शिवाजीमहाराजांचा प्रेमानें निरोप घेऊन व विजापुरकरांच्या मुलुखाला शहाजी जिवंत आहे तोंपर्यंत त्रास देणार नाहीं असें त्याचेपासून वचन घेऊन शहाजी परत गेला.

## गोष्ट २४ वी.

# मामाची तिरपीट.

बाळांनो, मागच्या गोष्टींत विजापूरकर व शिवाजी यांचा तह शहाजीमार्फत झाला हें तुम्हांला सांगितलें. एका वेळीं दोन शत्रु उत्पन्न करावयाचे नाहींत असा शिवाजीचा शहाणपणाचा नियम होता. म्हणून विजापूरकरांशीं तंटा सुरू होता तोंपर्यंत तो मोंगलांच्या वाटेस गेला नाहीं. आतां विजापूरकर मित्र झाले यामुळें मोंगलांवर हल्ला करण्यास त्यानें कंबर बांधिली. त्याचा पेशवा मोरोपंत यानें जुन्नरचे उत्तरेकडचे मोंगलाचे बरेच किल्ले सर केले. आणि नेताजी पालकर यानें तर थेट औरंगाबादपर्यंत स्वारी करून खंडणी वसूल केली. ही गोष्ट ऐकतांच औरंगजेब बादशहा अगदीं चिडून गेला. त्या वेळीं औरंगजेबाचा मामा शाएस्तेखान हा दक्षिणचा सुभेदार होता. लगेच भाचानें मामांना हुकूम सोडला कीं, शिवाजीला दाबून टाका. लगेच मामासाहेबांची स्वारी शिरवळच्या रस्त्यानें पुणें येथें १६६० त आली. नंतर यांनीं चाकणचा किल्ला घेतला. मराठ्यांसारख्या डोंगरी लोकांपासून डोंगरी किल्ले घेणें हें काम फार त्रासाचें आहे. यासाठीं आपण मराठ्यांशीं मैत्री करावी अशी शाएस्तेखान मामांनीं बादशहास सल्ला दिली पण बादशहास ती पटली नाहीं. उलट मामांना मदत करण्यासाठीं राजा जसवंतसिंग यास मोठें सैन्य देऊन त्यानें पाठविलें. मामा आपले जे आले ते पुण्यास शिवाजी बाळपणीं ज्या वाड्यांत रहात असे त्याच वाड्यांत राहिले. मग काय शिवाजीचें आयतेंच फावलें. तें सारें खरें; पण आधीं पुण्यांतच प्रवेश व्हावा कसा तीच पंचाईत शिवा-

जीला पडली. मामासाहेबांनीं पक्का बंदोबस्त केला होता; व सक्त पहारा ठेविला होता. कोणाही हत्यारबंद मराठ्यास परवान्याशिवाय शहरांत जाण्याची मनाई होती. पण शिवाजी पडला पहिल्या नंबरचा युक्तिबाज. त्यानें अशी कांहीं अजब युक्ति काढली कीं वारे वा. त्यानें दोन ब्राह्मणांना शहरांत पाठविलें व त्यांचेकडून खानाच्या रहाण्याचे सर्व जागेची टेहेळणी करविली. शिवाय त्या ब्राह्मणांच्या मार्फत मोंगल फौजेंतील एका मराठे शिलेदाराशीं संधान बांधून लग्नाच्या मिरवणुकीसाठीं म्हणून परवाना काढविला मग रात्रीं वाजत गाजत थाटाची वरात निघाली. मग रात्रीच्या अंधारांत येसाजी कंक, तानाजी मालुसरे, शिवाजी व आणखी त्याचे पंचवीस लोक त्या वरातींच्या घोळक्यांत झाले सामील. मग सहजच त्या वऱ्हाडी मंडळीबरोबर या शिवाजी, तानाजी, येसाजी वगैरे मंडळींचा मामांच्या छावणींत प्रवेश झाला. सर्व ठीक, खानाच्या वाड्याजवळ तर आपण आलों, पण पहारीनें भिंत खोदावी तर त्या आवाजानें आंतील मंडळी जागी होतील अशी शिवाजी व त्याचे मित्र यांना काळजी पडली. पण लवकरच नेहमीं प्रमाणें मध्य रात्रीचा वाजा वाजूं लागला. लगेच त्या आवाजांत शिवाजीच्या मित्रांनीं पहारी पिकावांचा आवाज दिला मिळवून व खानाच्या जनानखान्यास भगदाड पाडून ही मंडळी भरा-भर आंत शिरली. ह्या परक्या लोकांना पहातांच जनान-खान्यांतल्या बायकांनीं एकच गोंधळ उडवून दिला. तो गलगा ऐकतांच शाएस्तेखानाचे चिरंजीव अबदुल फत्तेखान तरवार घेऊन धावले, पण बिचाऱ्यांना शिवाजीच्या लोकांनीं लगेच ठार केलें. इतक्यांत एका बाईनें सर्व दिवे विझविले. मग काय अंधारनगरीच माजली. शाएस्तेखान मामांनीं तरवारीनें

शिवाजीकडच्या एका गड्याचें डोकें छाटलें. लगेच, शिवाजीच्या मित्रांनीं मामांवर घाव घातला. जिवावरच बेतली होती पण बोटावर गेलें. त्या घावानें पळतां पळतां निसटत जाऊन मामांचें बोटच छाटलें. इतक्यांत खान मेला म्हणून बायकांनीं ओरड केली. ती ऐकतांच आपलें काम झालें असें वाटून मित्रमंडळीसह शिवाजी तेथून निसटून गेला. अशा तऱ्हेनें मामांची तिरपीट उडवून व त्यांचें बोट छाटून ही मंडळी निसटली खरी पण पुढें वाट काय? मामांनीं आपली फौज त्यांचे मागोमाग पाठवली. पण शिवाजी कसला वस्ताद त्याला हें सर्व अगाऊच समजलें होतें व खानाचे लोकांस चकविण्यासाठीं त्यानें एक बेमालूम युक्ति करून ठेवली होती. त्यानें आपल्या दुसऱ्या साथीदारांना सांगून ठेविलें होतें कीं, आम्हीं सिंहगडच्या रस्त्यानें जाणार. यासाठीं कात्रजच्या रस्त्यावर झाडांना मशाली बांधून ठेवा व आम्हीं सिंहगडच्या रस्त्यानें जाऊं लागलों कीं शिंग फुंकूं. तो आवाज ऐकतांच या तुम्हीं पेटवून त्या कात्रजकडच्या झाडावरच्या मशाली. शिवाजी मामांच्या वाड्यांतून बाहेर पडल्यावर त्यानें मोठ्यानें शिंग फुकलें, लगेच कात्रजकडे मशाली पेटल्या, त्या मशाली वरून इकडूनच शिवाजीचे लोक गेले असें समजून मामांचे लोक कात्रजकडे धांवले व सिंहगडकडे जाणारे आमचे शिवाजी व त्याचे मित्र बचावले. ही चूक मोंगल सैन्यास सकाळीं समजली. लगेच ते सिंहगडावर चालून गेले पण गडावरून शिवाजीच्या तोफांच्या गोळ्यांनीं कांहीं मोंगल व शाएस्तेखानाचा हत्ती ठार झाल्यामुळें ही मंडळी परत फिरली कां आहे कीं नाहीं युक्ति. नेहमींच कांहीं शक्तीवर भागत नसते कधीं कधीं युक्तिही लढवावी लागते, समजलें ना बाळांनों.

असो. शाएस्तेखान मामांची अशी तिरपीट उडाल्यावर त्यांनीं पुण्यास रामराम ठोकला व नगरचा रस्ता धरला. मामांच्या मदतीस आलेल्या राजा जसवतसिंगांनींही विशेष हालचाल केली नाहीं. ही मामांची तिरपीट जेव्हां औरंगझेबाचे कानावर गेली तेव्हां त्यानें ठरविलें कीं **ऐसे मामा न येती कामा.** त्यानें लगेच मामांची बदली बंगाल्यांत केली व दक्षिणेंत आपला मुलगा मोअझम याला पाठविलें. ही गंमत १६६२ त झाली.

---

## गोष्ट २५ वी.

# प्रभुवीर मुरारबाजी.

उत्तम उत्तम माणसें व वस्तु जेथें जेथें मिळतील तेथे तेथें नीट तपासून त्यांचा संग्रह करावयाचा हा शिवाजीचा स्वभावच होता. शिवाजीनें चंद्रराव मोरे यांच्याशीं सामना केला तेव्हां नरवीर मुरारबाजी मोऱ्यांचे बाजूनें अतीशय शौर्यानें लढला. ही गोष्ट शिवाजीनें लक्षांत ठेवून जेव्हां मोरे यांचे कुटुंबांतील मंडळी कैद झाली तेव्हां मुरारबाजीला माझे नोकरीस याल तर तुम्हांस सोडतों असें तो म्हणाला. त्यावरून मोरे मंडळीच्या परवानगीनें मुरारबाजीनें शिवरायांची नोकरी पतकरली व ती अत्यंत इमानानें व स्वामिभक्तीनें मरेपर्यंत बजावली. मुरारबाजीची योग्यता ओळखुन शिवाजीनें त्याला पुरंदरचा किल्लेदार केलें. १६६५ त दिल्लीरखानानें पुरंदरास वेढा दिला तेव्हां त्यानें जें शौर्य दाखविलें त्याच्या योगानें मराठ्यांच्या इतिहासांत त्याचें नांव अजरामर झालें ती हकीकत अशी:—

शिवाजीचा मोड करण्याकरितां औरंगजेबानें आपले दोन शूर सरदार जयसिंग व दिल्लीरखान यांना मोठें सैन्य देऊन

दक्षिणेंत पाठविलें. ते पुण्यास येऊन नंतर ३१ मार्च १६६५ त सासवडला गेले व लगेच त्यांपैकीं दिलीरखान यानें पुरंदरावर चाल केली. मोंगल सैन्य जवळ येतांच मुरारबाजीनें त्यांस दाणा वैरण मिळूं नये अशी तजवीज केली व त्यांचा दारूगोळा जाळून टाकला. तरी पुनः सर्व जुळवाजुळव करून दिलीरखानानें पुरंदरच्या किल्ल्यास वेढा दिला. तेव्हां मुरारबाजीजवळ दोन हजार शूर शिपाई, भरपूर दाणा वैरण व दारूगोळा होता. पुरंदरला दोन कोट होते. एक बाहेरचा व एक आंतला. मोठी शिकस्त करून मोंगलांनीं बाहेरचा कोट सर केला. तेव्हां मुरारबाजीचे लोक आंतल्या कोटांत शिरले. या वेळीं वास्तविक मोंगलांनीं लगेच आंतल्या कोटावर हल्ला करावयास पाहिजे होता पण ते बाहेरच लुटालूट करीत अस्ताव्यस्त पसरले. हें पाहतांच मुरारच्या लोकांनीं त्यांचेवर गोळ्यांचा जोराचा वर्षाव केला. यामुळें मोंगल लोकांची दाणादाण उडाली. त्या वेळीं मोंगल व मावळे यांची भयंकर लढाई झाली. मुरारबाजी तर मोंगलांस किल्ल्यांतून हांकून लावून पाठलाग करीत थेट दिलीरखानाच्या डेऱ्यापर्यंत गेला. दिलीरखानानेंही त्वेषानें मोंगल फौज गोळा केली. व मराठ्यांवर हल्ला केला. लढाई जोरांत आली. दोनही पक्षाचे लोक अतिशय शौर्यानें लढले. मुरारची ढाल तुटली. तरी तो तसाच हातास शेला गुंडाळून त्यावर शत्रूचे वार झेलीत लढत होता. त्यानें खानावर वार केला, इतक्यांत खानाचा बाण त्याचे मानेस लागून त्याचें शीर एकदम आकाशांत उडालें. तरी त्याचे अंगांत वीरश्री इतकी चढली होती कीं, नुसत्या धडानें खालीं पडण्यापूर्वीं ३०० मुसलमान कापून काढले. धन्य तो मुरारबाजी कीं, ज्यानें धन्याकरतां स्वतःचा

प्राण खर्ची घातला व आपल्या राष्ट्राची कीर्ति जगभर पसरविली. मुरारबाजीचें प्रेत मराठ्यांनीं शत्रूचे हातीं लागूं दिलें नाहीं. त्यांनीं त्या प्रेताचें मोठ्या शौर्यानें रक्षण केलें व तें शिवाजी महाराजांकडे पाठवून दिलें. तेव्हां त्या आपल्या स्वामिभक्त सेवकाला पाहून शिवरायाचे डोळे पाण्यानें भरून आले.

मुरारबाजी पडला तरी वरचा कोट मोंगलांस सर करतां आला नाहीं. खालचे कोटांत त्यांचा प्रवेश झाला होता. पण वरून एकसारखा गोळ्यांचा मारा चालू असल्यामुळें तेथूनही त्यांना पळून जावें लागलें.

---

## गोष्ट २६ वी.

## शक्तीवर युक्तीचा विजय.

बाळांनों, शिवाजी महाराजांच्या अंगीं अनेक उत्तम गुण होते. पण त्या सर्वांत फार मोलवान असा एक गुण होता तो हा कीं प्रसंग पाहून वागणें. शत्रूची तयारी व शक्ति आपल्यापेक्षां अधिक असली तर त्याच्याशीं लढून आपल्या सर्वस्वाचा नाश ते कधींही करून घेत नसत. दगडी भिंत समोर आली तर मी ती आपल्या डोक्यानें फोडीन, असला नाशकारक हटवादीपणा शिवाजी महाराजांनीं कधींच केला नाहीं. शत्रू जोरावर असला तर त्याच्याशीं तेवढ्या वेळेपुरता नम्रपणा दाखवून ते आपला व आपले लोकांचा बचाव करून घेत असत. उलट आपली शक्ति व सैन्य शत्रूपेक्षां अधिक असलें तर मग एक मिनिट फुकट न जाऊं देतां ते शत्रूचा समूळ फडशा उडवीत असत. असे ते प्रसंग पाहून वागले म्हणूनच त्यांचे हातून स्वराज्याची स्थापना झाली ही गोष्ट सर्व हटवादी

लोकांनीं ध्यानांत ठेवावी. शाएस्तेखानमामांचें पाणी शिवाजी महाराजांनीं ओळखलें होतें म्हणून त्यांना एकदम गांठून भेबडावून त्यांनीं पिटाळून लावलें. पण जेव्हां राजा जयसिंग व दिल्लीरखान हे मोठें थोरलें मोंगल सैन्य घेऊन आले व पुरंदरच्या वेढ्यांत आपल्या सैन्याचा व नरवीर मुरारबाजीचा नाश झालेला त्यांनीं पाहिला तेव्हां ह्या वेळीं नमतें घ्यावें असें त्यांनीं ठरविलें. दुसऱ्यांशीं अत्यंत गोड बोलून नम्रता दाखवून त्याला आपलेसें करून घ्यावें असें त्यांनीं ठरविलें. व दुसऱ्याशीं अत्यंत गोड बोलून व नम्रता दाखवून त्याला आपलेसें कसें करून घ्यावें ही खुबी शिवाजीमहाराजांना फार चांगली साधली होती. त्यांनीं राजा जयसिंग व दिल्लीरखान यांशीं नम्रपणानें गोड बोलून त्यांना वश करून घेतलें व त्यांच्या मध्यस्तीनें औरंगजेब बादशहाशीं तह केला. त्यांत असें ठरलें कीं, सिंहगड, पुरंदर वगैरे चाळीस लाखांचा मुलूख शिवाजीनें बादशहास द्यावा व चार लाखांचा आपलेकडे ठेवून बादशहाचा सरदार म्हणून दक्षिणेंत राहून बादशहांचे दक्षिणेंतील सुभेदारांस मदत करावी. हा पुरंदरचा तह १६६५ त झाला. यानंतर विजापूरकरांचा पराभव करण्यासाठीं शिवाजीनें जयसिंगास चांगली मदत केली, यामुळें खूष होऊन औरंगजेब बादशहानें शिवाजीस दिल्लीस भेटीस बोलावलें. त्याप्रमाणें मोरोपंत पिंगळे पेशवे, अण्णाजी दत्तो सुरनीस व निळो सोनदेव मुजुमदार यांस जिजाबाईच्या सल्ल्यानें कारभार करावयास नेमून आपल्या जिवास जीव देणारे तानाजी मालुसरे वगैरे जिवलग व शूर मित्र व पुत्र संभाजी यांना बरोबर घेऊन शिवाजी दिल्लीस जाण्यास निघाला. बादशहा आग्र्यास असल्याचें समजल्यामुळें शिवाजी आग्र्यास सन १६६६ त

गेला. नंतर आपला मुलगा संभाजी याला बरोबर घेऊन तो बादशहाच्या दरबारास गेला. तेथें त्याला बादशहानें त्याच्या योग्यतेप्रमाणें पहिल्याप्रतीचे सरदारांसारखा मान दिला नाहीं यामुळें त्याला राग आला. हें त्याच्या चेहऱ्यावरून औरंगजेबाच्या लक्ष्यांत आलें. लगेच त्यानें शिवाजी उतरला होता त्या ठिकाणावर सक्त पहारा ठेऊन शिवाजीला नजर कैदी बनविलें. आपणावर भयंकर प्रसंग आला आहे हें शिवाजीच्या चटकन लक्ष्यांत आलें व त्यांतून सुटण्याची युक्तिही त्याला लगेच सुचली. ती त्यान कशी लढविली हें पाहिलें म्हणजे त्याच्या शहाणपणाचें कौतुक वाटतें.

त्यानें पहिल्यानें बादशहाची परवानगी घेऊन बरोबरचें सर्व सैन्य परत पाठविलें. कांहीं निवडक विश्वासू मंडळी मात्र त्यानें जवळ ठेवली. नंतर गोड भाषणानें व मनमिळाऊपणानें त्यानें बऱ्याच अमीरउमरावांना आपले मित्र बनविले व रोज मोठमोठे पेटारे भरून मेवा–मिठाई त्यांचेकडे पाठविण्याचा क्रम ठेविला. पहिल्या पहिल्यानें पहारेकरी हे पेटारे तपासून पहात असत. पण रोज रोज त्यांत मिठाई असते असें पाहिल्यावर त्यांनीं पेटारे तपासून पाहण्याचें सोडून दिलें. नंतर विश्वासू माणसांना कांहींना कांहीं सबबीवर त्यानें पाठवून दिले. ते वेष पालटून तेथेंच राहिले. सर्व तयारी झाल्यावर शिवाजीनें आजारीपणाचें सोंग घेतलें. शेवटीं तारीख १९ आगष्ट १६६६ रोजीं संध्याकाळीं हिरोजी फर्जंद यास आपले जागीं निजवून संभाजी व आपण निरनिराळया मिठाईच्या पेटाऱ्यांत बसून पहारेकऱ्यांचे हातून सुटून शहराबाहेर जाऊन पोंचले. मागें राहिलेल्या हिरोजी फर्जंदानें दुसरे दिवशीं सकाळीं महाराजांना औषध आणावयास जातों, कोणी आंत

जाऊन महाराजांची झोंप मोडूं नका, असें सांगून स्वस्थपणें दक्षिणची वाट धरिली. शिवाजी पसार झाला हें कळतांच बादशहानें त्याला पकडून आणण्यासाठीं पुष्कळ लोक पाठविले, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. थेट दक्षिणेस गेल्यास आपण खास पकडले जाऊं हें लक्षांत आणून ते प्रथम मथुरेस गेले. तेथें संभाजीस एका मित्राकडे ठेवून गोसाव्यांचा वेष घेऊन काशी, प्रयाग वगैरे तीर्थें हिंडत महाराज अठरा महिन्यांनीं परत रायगडावर आले. त्यांच्या नंतर चार वर्षांनीं संभाजी परत आला. मथुरेंत संभाजीस कृष्णाजीपंत म्हणून मोरोपंत पिंगळ्यांचे मेहुणे होते त्यांचेकडे ठेविलें होतें. त्या कृष्णाजीपंतांनीं जी उत्तम मदत केली ती स्मरून पुढें शिवाजी महाराजांनीं त्यांना ५० हजार रुपये दिले व त्यांच्या बंधूंना २५ हजार रुपये दिले. याच सफरींत प्रयाग येथें भोंसल्यांचे उपाध्ये कविकुलेश यांची व संभाजीची पहिली भेट झाली. हेच कविकुलेश नंतर संभाजीचे प्रधान बनले. त्यांनीं सर्व राज्याचें वाटोळें केलें.

दुर्दैवानें कधीं कधीं मनुष्य भयंकर संकटांत सांपडतो. जर का तो घाबरला तर जिवास मुकतो. पण शिवाजीसारखा असला तर शांतपणानें व शहाणपणानें युक्ती योजून संकटांतून पार पडतो, बाळांनों, हें या गोष्टीवरून तुमच्या ध्यानांत आलेंच असेल. असो. बादशहाचे भेटीस जाण्याची चूक शिवाजीनें केली. पण त्या चुकीपासूनही त्यानें फायदा करून घेतला. या प्रसंगानें बादशहाच्या राजधानींत राहून सर्व स्थिति त्याला बारकाईनें पहातां आली. तेव्हां मोंगलशाहीचा हा नुसता पोकळ डोला आहे ही गोष्ट त्याला नवीनच कळली. यामुळें यापुढें तो निर्धास्तपणें उघड्या मैदानावर मोंगलांशीं

लढूं लागला. असो. निसटून आल्यावरही गोड गोड बोलून त्यानें औरंगजेबाकडून १६६८ त पूर्वी झालेला पुरंदरचा तह कायम करवून आणखी वर राजा हा किताब व विजापूर व गोवळकोंडा या राज्यांतून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचे हक्क बादशहाकडून मिळविले. पुढें शिवाजीचा वाढता पराक्रम लक्षांत येतांच विजापूर व गोवळकोंडें यांनीं त्याला वर्षाचे ५ लाख व ३ लाख अशी खंडणी देण्याचें कबूल करून त्याच्याशीं तह केला. अशा रीतीनें शिवाजीचें राज्य सबळ व जगजाहीर झालें.

---

## गोष्ट २७ वी.

## गड आला पण सिंह गेला.

अग्र्याहून आल्यावर एक दोन वर्षें होतात न होतात तोंच सन १६७० मध्यें औरंगजेबबादशहानें कसेंही करून शिवाजी-सारख्या मानी मराठ्याला चिरडून टाकल्या शिवाय आपल्याला स्वस्थता मिळणार नाहीं असें ठरविलें व त्याप्रमाणें आपला मुलगा मोअझम दक्षिणेंत औरंगाबादेंत होता त्याला हुकूम दिला. शत्रू युद्ध करणार हें निश्चित होतांच आपण प्रथम त्याच्यावर हल्ला केल्यास सपाटून फायदा होतो हें शिवाजीला ठाऊक होतें. शिवाजीची आई जिजाबाई ही प्रत्यक्ष स्वराज्याची जननी. तिनें पाहिलें कीं औरंगजेबावर एकदम छाप बसवा-यची तर पहिल्या धडाक्यास दक्षिणचें नाक सिंहगड घेतला पाहिजे. लगेच तिनें रणशूर तानाजीला 'पत्र पहातांचनिघून ये' असें पत्र पाठविलें. त्या इमानी नोकराचा प्रिय मुलगा रायाजी त्याच्या लग्नाची अगदीं जय्यत तयारी झाली होती. वऱ्हाडी मंड-

ळीनें घर गजबजून गेलें होतें. माघ वद्य षष्ठी हा लग्नाचा मुहूर्त ठरला होता. इतक्यांत धन्याकडून पत्र आलें. वऱ्हाडी मंडळी म्हणाली ' लग्न उरकून मग जा. ' ही गोष्ट त्या स्वामिभक्त तानाजीला कोठून रुचणार ! तो म्हणाला '**आधी स्वामिकार्य आणि मग लग्नकार्य !** ' पत्र पहातांच तडक तो रायबाला घेऊन निघाला. बरोबर त्याचा प्रिय बंधू सूर्याजी होताच. रायगडावर येतांचं जिजाबाई म्हणाली ' तानाजी, हा समोर दिसतो तो गड मला पाहिजे ' ! तानाजी म्हणाला ' ठीक आहे.. आपल्या आशीर्वादानें गड जिंकून देतों. ' असें म्हणून व आपल्या रायबाबाळास जिजाबाईच्या स्वाधीन करून तो स्वामिभक्त आपला भाऊ सूर्याजी व एक हजार शूर मावळे यांना घेऊन थेट सिंहगडावर चालून गेला. सिंहगडावर मोंगलांनीं अगदीं कडेकोट बंदोबस्त केला होता. तेथें अत्यंत शूर असा उदेभान नांवाचा राठोड रजपूत सेनापती होता. युद्धाची सामुग्री तेथें जय्यत होती. यामुळें तानाजीशिवाय दुसरा कोणीही वीर तें काम करण्यास कबूल झाला नाहीं. ती माघ महिन्यांतली वद्य पक्षांतली रात्र होती, अंधार म्हणजे मी म्हणत होता, अशा त्या भयंकर अंधाऱ्या रात्रींहि मावळे-मंडळी गडाच्या पायथ्याशीं तर येऊन पोंचली. पहातात तों कडा तुटलेला सारखा उभा. वर चढून जाण्याचें नांवच नको. तेव्हां पुढल्या बाजूनें पाहिलें तो जरा बरी वाट होती. मग तानाजीनें आपल्या लोकांच्या पांचपांचेंशच्या दोन टोळ्या केल्या. एक सूर्याजीबरोबर दिली व त्याला पुढच्या वाटेनें वर जाण्यास सांगितलें व दुसरीचा पुढारी तो स्वतः झाला. त्या तुटलेल्या कड्यावर चढणें अशक्य आहे असें पहातांच तानाजीच्या एका मावळ्यानें घोरपडीच्या कंबरेस साखळदंड

बांधून तिला वर फेंकली. ती वर जाऊन कड्याच्या शेंड्याला बिलगून राहिली. लगेच त्या साखळदंडाला धरून वानरासारखा भराभर तो मावळा गडावर गेला व त्यानें दहा वीस लोखंडी मेखा ठोकून त्याला दोर बांधून ते खालीं सोडले. लगेच हां हां म्हणतां तानाजी व तीनशें मावळे गपचूप दोराला धरून गडावर गेले. ही बातमी उदेभानाला कळतांच तो त्यांच्यावर आपले सैन्यासह तुटून पडला. मग काय विचारावें ? एकदम भयंकर युद्ध झुंपलें. शेंकडो रजपूत व मावळे धडाधड मरून पडूं लागले. उदेभान व तानाजी हे शूर रणबहाद्दर अगदीं समोरासमोर आले व त्यांचें रामरावणाप्रमाणें निकराचें युद्ध झालें. दोघेही सारखेच शूर. तानाजीच्या वारानें उदेभान पडणार इतक्यांत त्यानें एक वार करून तानाजीलाही पाडलें. इतक्यांत दुसऱ्या बाजूनें तानाजीचा पाठीराखा भाऊ सूर्याजी आपल्या टोळीला घेऊन आला व त्यानें शौर्याची शिकस्त करून मोंगलाकडील सर्व सैन्याची धूळधाण केली. झालें, गड हातीं आला पण स्वामिभक्त तानाजी सिंह गेला. स्वामिकार्य झालें याची खूण म्हणून गडावर गवताची गंजी सूर्याजीनें पेटविली. तो प्रकाश रायगडावर शिवाजी व जिजाबाई यांना दिसला व गड काबीज केल्याचें वर्तमान समजुन त्यांना प्रथम आनंद झाला. दुसऱ्या दिवशीं सर्व हकीकत समजली तेव्हां शिवाजीचें प्रेमळ हृदय स्वामिभक्त तानाजीच्या मरणाची बातमी ऐकून अतीशय कळवळलें व तो शोकाकुल होऊन म्हणाला, ' गड आला पण माझा तानाजी सिंह कीं हो गेला ! ' असो; नंतर तानाजीचा भाऊ सूर्याजी याला शिवाजीनें सिंहगडचा किल्लेदार केलें, व तानाजीचा मुलगा बाळराय हा आपलाच मुलगा आहे असें समजून त्याचे राजपुत्राच्याप्रमाणें थाटानें लग्न शिवाजीनें

केलें. तानाजीच्या स्मरणार्थ गडाचे कोंडाणा हें नांव बदलून सिंहगड असें नांव ठेविलें. सिंहगड घेतल्यावर एक महिन्याचे आंतच सूर्याजीनें पुरंदर घेतला. घे घे करीत धूमधडाक्यानें शिवाजीनें मोंगलाकडे गेलेले किल्ले एकामागून एक सर केले.

गोष्ट २८ वी.

## साल्हेरचें नवीन युग.

बाळांनों, शिवाजी महाराज दिल्लीहून आल्यापासून मराठ्यांची युद्धपद्धती बदलली. मोंगलांच्या सामर्थ्याच्या भ्रमाचा भोपळा फुटला. उघड उघड समरांगणावर उभें राहून मोंगलांस आपण धुडकावून लावूं, असा आत्मविश्वास आतां मराठ्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न झाला. याचें पहिलें उदाहरण म्हणजे साल्हेरची लढाई. साल्हेर म्हणजे गुजराथचें नाक. या ठिकाणीं उघड समरांगणावर मोंगलांशी दोन हात करण्यास मराठे पहिल्यानेंच उभे राहिले. या लढाईचा विशेष हा होता कीं, मोंगलांकडे एखलासखान व दिलीरखान यांच्यासारखे नांवाजलेले सेनापती होते. या लढाईंत पराक्रमाप्रमाणेंच मराठा सेनापती प्रतापराव यानें युक्ति पण नामी लढवली. प्रथम आपल्या लोकांस पळावयास लावून त्यानें मोंगल सैन्यास असें भासविलें कीं, मराठे घाबरले. त्याबरोबर मोंगल सैन्य अव्यवस्थितपणें मराठ्यांच्या पाठीस लागलें. या मोंगल सैन्यांत उडालेल्या गोंधळाचा एकदम फायदा घेऊन प्रतापरावानें एकदम शिस्तवार उलटून मोंगल सैन्यावर असा जोराचा हल्ला केला कीं, मोंगलांस दे माय धरणी ठाय असें होऊन गेलें. त्यांचे

२२ नामांकित सरदार मरून पडले. शिवाय त्यांचें दहा हजार सैन्य ठार झालें. अशा तऱ्हेनें उघड्या मैदानावर मोंगलांचा पूर्ण पराभव मराठ्यांनीं पहिल्यानेंच केला. त्यांचा नामांकित सेनापती एखलासखान याला मराठ्यांनीं कैद केलें व दिल्लीर-खानाला धूम पळावयास लाविलें. असा पराक्रम गाजवून नवयुगास सुरवात झाली असें मोंगलांस त्यांनीं जाहीर केलें. मराठ्यांचा प्रचंड पराक्रम–सूर्य प्रखरतेनें प्रकाशूं लागला तो या लढाईपासूनच. म्हणून साल्हेरच्या लढाईचें महाराष्ट्राच्या इतिहासांत अतिशय महत्व आहे. ही लढाई १६७२ त झाली. साल्हेरला उत्तम जय मिळाल्यामुळें स्वराज्यसंगोपनास लागणारें द्रव्य पुरविण्यासाठीं धनाढ्य गुजराथचीं दारें खुलीं झालीं. शिवाजीनें श्रीमंत सुरत शहर १६६४ पासून १६७२ पर्यंत तीनदां लुटलें व लाखों रुपये आपल्या राज्यास बळकटी आणण्याकरितां तो सुरतेहून घेऊन गेला. या लढाईनंतर मोंगलांस अशी धडकी भरली कीं, इकडचा सर्व मुलूख सोडून ते औरंगाबादेस चालते झाले. अत्यंत श्रीमंत व्यापाऱ्यांपासून व मोठमोठ्या सरदारांपासून खंडणीदाखल वसूल करीत असतां गरीबगुरीबांस व बायकामुलांस मराठ्यांनीं कधींही त्रास दिला नाहीं. शत्रूकडील जखमी झालेल्या लोकांस बरें करून शिवाजी सन्मानानें परत पाठवीत असे. व कोणाची इच्छा असल्यास त्याला आपल्या नोकरींतही घेत असे. मुसलमानांच्या मशिदींस हिंदूंच्या देवळांप्रमाणेंच पवित्र मानून त्यांना तो हात लावीत नसे. इतकेंच नव्हे तर त्या मशीदींस असलेलीं वतनें व उत्पन्नें तशींच चालवीत असे. शत्रूकडच्या कैद झालेल्या लोकांनाही तो सन्मानानें वागवून परत पाठवीत असे.

साल्हेरच्या लढाईच्या आधीं व मागाहून मराठ्यांनीं मोठ्या पराक्रमानें पुष्कळ मुलूख जिंकून मराठी राज्याचा सपाटून

विस्तार केला. आतां एकच कामगिरी उरली ती म्हणजे शिवछत्रपतींना त्यांच्या पराक्रमास व वैभवास साजेल असा राज्याभिषेक करावयाचा. त्याबद्दलची आनंददायक हकीकत पुढील गोष्टींत तुम्हांला वाचावयास सांपडेल.

---

गोष्ट २९ वा.

## शिवराज्याभिषेक.

साल्हेरच्या लढाईनें नवीन युगास आरंभ केला. आतां मराठी राज्य व्यवस्थित, चिरस्थायी व संघटित झालें. शिवाजीच्या राज्याचा विस्तार खानदेश, वऱ्हाड, औरंगाबादपर्यंत झाला. दक्षिणेस हुबळी व पूर्वेस विजापूर, गोवळकोंडा येथपर्यंत त्याचें राज्य पसरलें. प्रत्यक्ष मोगलांच्या गुजराथेंतून त्याला चौथाई व सरदेशमुखी मिळूं लागली. अशा तऱ्हेनें जिजाबाईनें संकल्पिलेलें स्वराज्य तीस वर्षें सतत देह झिजवून पराक्रमानें व शहाणपणानें शिवाजीनें संपादन केलें. या विस्तीर्ण व वैभवशाली राज्याला शोभेल असा राज्याभिषेक सन १६७४ त करण्यांत आला. या राज्याभिषेकाचा दुसरा उद्देश असा होता कीं शिवाजी म्हणजे लुटारू, फार झालें तर लहानसा पाटील, त्यास आपण काय म्हणून मान द्यावा, तो आपल्यापेक्षां कमी दर्जाचा, अशी फलटण, वाडी, मुधोळ वगैरे ठिकाणच्या मराठे सरदारांची जी चुकीची कल्पना झाली होती ती दूर करावी व स्वराज्याचा विस्तार व वैभव त्यांना दाखवून स्वराज्यांत सामील होण्यास त्यांना तयार करावें हा दुसरा उद्देश. या शिवाय तिसरा उद्देश हिंदुस्तानांतील सर्व इतर सत्ताधारी राजांना मराठ्यांचें राज्य केवढें बलाढ्य आहे हें दाखवून

त्यांच्यावर छाप बसवावी. अशा अनेक कारणांसाठीं शिवाजीनें राज्याभिषेकाचें अतीशय खर्चाचें काम करण्याचें ठरविलें.

समारंभाचें वर्णन.–या समारंभासाठीं अतीशय विद्वान् अशा गागाभट्टांना काशीक्षेत्रांतून सन्मानानें आणण्यांत आलें होतें. व राज्याभिषेकांतील सर्व धार्मिक कृत्यें त्यांच्या सांगण्याप्रमाणें करण्यांत आलीं. हा समारंभ म्हणजे एका माणसाचा बडेजाव नव्हता. हा राष्ट्रीय महोत्सव असून त्याच्या महत्वास योग्य अशाच रीतीनें तो पार पाडण्यांत आला. सर्व महाराष्ट्राच्या भाग्योदयाच्या या पवित्र समारंभास ज्येष्ट शुद्ध चतुर्थी म्हणजे २८ मे १६७४ या दिवशीं सुरवात झाली. पहिल्या दिवशीं शिवाजी महाराज हे उदेपूरच्या क्षत्रिय कुळांतले तेजस्वी क्षत्रिय असल्यामुळें त्यांची मुंज करण्यांत आली. हा मुंजीचा समारंभ दोन दिवस थाटाचा झाला. पुढें रोज निरनिराळे संस्कार होतां होतां ज्येष्ट शुद्ध १३ म्हणजे ६ जून १६७४ हा मराठ्यांच्या इतिहासांत सोन्याच्या अक्षरांनीं लिहून ठेवलेला दिवस उगवला. एकंदर सर्व महाराष्ट्राचीं अंतःकरणें त्या दिवशीं रायगडावर होत असलेल्या या समारंभाकडे लागलीं होतीं. समारंभासाठीं त्या दिवशीं अगदीं सकाळीं सर्व लोक स्नान करून व सुंदर पोषाख [illegible]न मंडपांत हजर झाले. शिवाजी महाराजही स्त्रीपुत्रांसह अलंकार घालून भवानी देवी, माता जिजाबाई व कुलगुरु बाळंभट यांस आदरानें नमस्कार करून शुभ मुहूर्तावर आसनावर जाऊन बसले. जवळ पट्टराणी सोयराबाई व मुलगा संभाजी हे बसले. सिंहासनाचे आठ दिशांना अष्ट प्रधान हातांत सोन्याच्या कळशा घेऊन उभे राहिले. समोर अनेक मांडलिक राजे, रजवाडे, संस्थानिक

मित्रराजे, व मित्रराजांचे प्रतिनिधी उभे राहिले. ठिकठिकाणच्या पवित्र क्षेत्रांतून तीर्थोदक आणविलें होतें. मुहूर्ताची वेळ येतां व ब्राह्मणांच्या वेदमंत्रांच्या घोषाबरोबर छत्रपतींवर मंगलाक्षतांचा वर्षाव व तीर्थोदकाचें सिंचन झालें. असा हा पवित्र अभिषेकाचा समारंभ रामराज्याभिषेकासारख्या थाटानें पार पडला. अभिषेक झाल्यावर शिवाजी महाराज उत्तम तऱ्हेनें सुशोभित केलेल्या सिंहासनावर विराजमान झाले. तेव्हां लोकांना आनंदाचें भरतें आलें व त्यांनीं प्रेमभरानें शिवभूपतींवर सोन्यारुप्याचीं फुलें उधळलीं. ब्राह्मणांनीं वेदमंत्र म्हणून आशिर्वाद दिले. सर्व राज्यांत हा राज्याभिषेक जाहीर करण्यासाठीं १०८ तोफांची सरबत्ती झाली. पुत्राच्या भाग्योदयाचा व आपण संकल्पिलेल्या स्वराज्याच्या वैभवपूर्तीचा हा अप्रतिम शुभ प्रसंग पाहून त्या स्वराज्यजननीस, त्या राजमातेस, त्या राष्ट्रस्वामिनी जिजाबाईस किती धन्यता, किती कृतार्थता व किती आनंद झाला असेल याची बरोबर कल्पना करणें अशक्य आहे. शिवाजीच्या कोमल बालहृदयांत स्वराज्यवृक्षाचें बीजारोपण करून त्यानें आपण अतीशय कष्ट करून संगोपन केलें व त्याचसाठीं पतिमरणानंतरही जीव धारण केला त्याचें आज सार्थक झालें. आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता झाली असेंच त्या वीरमातेस वाटलें. असो. नंतर शिवाजीची सुवर्णतुला केली. तेव्हां शिवरायाचें वजन पक्के ७० शेर भरलें. नंतर ब्राह्मण मंडळीस योग्यतेप्रमाणें १ लक्ष रुपयांपासून पंचवीस रुपयांपर्यंत दक्षणा दिल्या. मेजवान्यांचा तर सारखा तडाखाच चालला होता. आपण त्यावेळीं हजर असतों तर मजा झाली असती असें बाळांनो, तुमच्या मनांत आलेंसें दिसतें. बाळांनो तुम्ही देखील कदा-

चित् मागच्या एखाद्या जन्मांत तेथें गेले असाल, नाहीं कशा-वरून? गरीबगुरीब, बैरागी, गोसावी सर्वांना दान-धर्म व भोजन देऊन जिकडे तिकडे आनंदी आनंद केला. देवस्थानांस वतनें व इनामें करून दिलीं. नंतर अष्टप्रधान व इतर अधिकारी यांना अधिकाराचीं पदकें व पोषाख देण्यांत आले व लोकांकडून आलेले नजराणे स्वीकारण्यांत आले. यानंतर हत्तीवर सोन्याचे अंबारींत बसून महाराजांची स्वारी मोठ्या थाटानें निरनिराळ्या मंगल व मंजुळ वाद्यांच्या जयघोषांत अष्टप्रधान, अधिकारी व फौज यांसह मिरवत मिरवत देवदर्शन करून परत मिरवत येत असतां वाटेंत ठिकठिकाणीं सुवासिनींनीं महाराजांस ओंवाळिलें व हजारों लोकांनीं महाराजांवर पुष्पवृष्टि केली. अशा थाटानें हा अपूर्व समारंभ पुरा झाला. या समारंभास एकंदर एक कोट बेचाळीस लक्ष रुपये खर्च झाले. धन्य तो रायगड कीं, ज्यानें हा महाराष्ट्राच्या भाग्योदयाचा समारंभ पाहिला. या समारंभाचें कायमचें स्मरण रहावें म्हणून महाराजांनीं रामदास स्वामींच्या स्मरणार्थ भगवा झेंडा हें आपलें राष्ट्रीय निशाण ठरविलें व राज्याभिषेकाच्या दिवसापासून राज्याभिषेक नांवाचा नवा शक सुरू केला. रायगड हें राजधानीचें ठिकाण कायम केलें व निरनिराळ्या अधिकाऱ्यांचीं संस्कृत नांवें ठेविलीं. या अद्वितीय समारंभास गोवळकोंडा, इंग्रज, पोर्तुगीज वगैरेंचे वकील नजराणा घेऊन आले होते. बाळांनो, ही हकीकत वाचून केव्हां तो धन्य रायगड पाहीन असें तुम्हांला झालें असेल. ज्याप्रमाणें देहू, आळंदीं हीं संतक्षेत्रें पाहिलीं पाहिजेत त्याचप्रमाणें हें **रायगड** राजक्षेत्रही पाहिलें पाहिजे.

## गोष्ट ३० वी.

# शिवाजीचें आरमार.

बाळांनों, शिवाजीमहाराज म्हणजे एक असामान्य थोर पुरुष होते. सर्व हिंदुस्थानांत हिंदवी स्वराज्य स्थापन करावें, अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती. आपलें राज्य बलाढ्य व सुसंरक्षित व्हावें यासाठीं नुसते प्रचंड किल्ले बांधून व शूर सैन्य तयार करूनच ते थांबले नाहींत. आपलें राज्य कल्याणपासून राजापुरापर्यंत समुद्रकिनाऱ्यावर पसरतांच समुद्राच्या बाजूनें आपले राज्याची बळकटी कशी करावी याच्या विचारांत ते गढून गेले. पूर्ण विचार करून त्यांनीं असें ठरविलें कीं, समुद्राच्या बाजूनें राज्याचें रक्षण करण्यासाठीं अतीशय बलाढ्य अशा आरमाराची जरूर आहे. एकदां अमूक एक करावयाचें असें ठरविल्यावर शिवाजीमहाराज लगेच खटपटीस सुरवात करीत. जंजिऱ्याचे सिद्दीस जिंकण्याकरितां व इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच, सांवत, व जव्हारकर यांचे पासून आपल्या समुद्रकांठच्या प्रदेशाचें संरक्षण करतां यावें म्हणून आरमार तयार करण्याची खटपट शिवरायानें सन १६६१ पासून सुरू केली. त्यानें सुरत तीनदां लुटली ती तरी बलाढ्य आरमार तयार करण्याकरितां. या लुटीपासून मिळालेलें द्रव्य त्यानें आरमार तयार करण्याकडेच लाविलें. त्या कालच्या कोणत्याही हिंदी राजाच्या लक्ष्यांत न आलेली गोष्ट त्याच्या लक्ष्यांत आली. ती ही कीं, परदेशाशीं व्यापार केला असतां देश श्रीमंत होतो. बहुतेक देशी राजे परकी व्यापाऱ्यांचे विरुद्ध असत. कारण परकी व्यापारी आपला देश भिकार करतील असें त्यांस वाटे. तसें शिवाजीचें नव्हतें. तो परदेशी व्यापाऱ्यांस चांगल्या तऱ्हेनें वागवी व त्यांना उत्तेजन

देत असे. परदेशाशीं होणाऱ्या व्यापाराचें संरक्षण करण्याकरितां आपलें उत्तम व बलाढ्य आरमार असलें पाहिजे हेंही त्याच्या लक्ष्यांत आलें. तेव्हां या दोन उद्देशांसाठीं आरमार तयार व्हावें म्हणून त्यानें गलबतें बांधण्याचे मोठमोठे कारखाने विजयदुर्ग, कुलाबा, मालवण, रत्नागिरी, अंजनवेल या ठिकाणीं सुरू केले. अशा महा खटपटीनें चारपांच वर्षांत चारपांचशें गलबतांचें आरमार त्यानें तयार केलें. हुशार कोळी व भंडारी यांना त्यानें गलबतांवर अधिकारी नेमिले. गलबतांवर तोफा ठेवण्याची व्यवस्था केली. आरमाराचें मुख्य ठाणें मालवण येथें ठेविलें. समुद्रकिनाऱ्यावर आरमाराच्या संरक्षणासाठीं किल्ले बांधले. खुद्द शिवाजीमहाराजांनीं १६६५ त जहाजावरून पश्चिमकिनाऱ्यावर स्वारी केली व नंतर पुनः बार्सिलोरवर १६७० त स्वारी करून शिवाजीनें पुष्कळ लूट आणली. आरमारखात्यांत एकंदर पांच हजार लोक काम करीत होते. शिवाजीच्या आरमारावरील अधिकाऱ्यांत, दर्यासारंग, इब्राहीमखान, मायनाक भंडारी व दौलतखान भिवजी गुजर व कान्होजी आंग्रे हे सरदार फार प्रसिद्धीस आले.

---

## गोष्ट ३१ वी.

## शिवाजीची राज्यव्यवस्था व अंत.

शिवाजीची अलौकिक चतुरता जशी राज्य संपादन करतांना दिसून आली तशीच राज्याचा कारभार सुयंत्रित चालावा म्हणून त्यानें जी पद्धतशीर व्यवस्था केली त्यांतही दिसून आली. सर्व जगांत अत्यंत उत्तम ठरलेली, जी इंग्रजी राज्यपद्धती आज विलायतेंत चालू आहे तशीच राज्यपद्धती

शिवाजीनें अडीचशें वर्षांपूर्वी आपल्या महाराष्ट्रांत अमलांत आणिली. त्यानें राज्यकारभाराचीं सात खातीं करून त्यांवर सात प्रधान नेमिले व सर्वांवर देखरेख ठेवण्यासाठीं एक मुख्य प्रधान नेमिला. यांना पहिल्यानें त्यानें फारशी भाषेंतील नांवें दिलीं होतीं. नंतर त्याला राज्याभिषेक होऊन **हिंदवी स्वराज्याची** जगजाहीर स्थापना झाल्यावर **हिंदवी स्वराज्यास** योग्य, अशीं संस्कृत नांवें तयार करून तीं त्यानें आपल्या अष्टप्रधानांस दिलीं.

## अष्टप्रधान, त्यांचीं नांवें व पगार:—

| फारशी नांव | संस्कृत नांव | काम | वर्षाचा पगार |
|---|---|---|---|
| १ पेशवा | पंतप्रधान | मुख्यदिवाणागिरी | १५००० होन. |
| २ मुज्मुदार | पंतअमात्य | मुलकी वसूल व हिशोब | १२००० होन. |
| ३ सुरनीस | पंतसचिव | दप्तराची व्यवस्था | १०००० होन |
| ४ वाकनीस | मंत्री | खासगी कारभार | ” |
| ५ डबीर | सुमंत | परराज्यव्यवहार | ” |
| ६ सरनौबत | सेनापती | फौजेची व्यवस्था | ” |
| ७ ० | न्यायाधीश | न्यायकरणें | ” |
| ८ ० | पंडितराव | शास्त्रार्थ व दानधर्म | ” |

हल्लींच्यापेक्षां तेव्हां निदान चौपट स्वस्ताई होती. तेव्हां शिवाजी आपल्या नोकरांना भरपूर पगार देऊन त्यांना संतुष्ट ठेवीत असे हें सिद्ध होतें. अष्टप्रधानांपैकीं कोणी दुसरीकडे गुंतला असल्यास त्याचें काम त्यावेळेपुरतें पहाण्यास ज्याला नेमीत त्याला मुतालीक असें म्हणत. या शिवाय प्रत्येक खात्यांत कारभारी, मुज्मुदार, फडणीस, सबनीस, कारखाननीस, चिटणीस, जामदार आणि पोतनीस असे आठ दुय्यम कामदार असत. या सर्व मंडळींत पेशवा अथवा पंतप्रधान

हा मुख्य होता. त्याचा हुकूम सर्व प्रधानांवर चालत असे. राज्याची व्यवस्था ठेवण्यांत व कारभार पहाण्यांत शिवाजी मुख्यतः खालील योग्य व हितकर नियमांना धरून चाले:—

( १ ) डोंगरी किल्ल्याच्या मदतीनें देशांत शांतता ठेवणें.

( २ ) सरकारी नोकरी वंशपरंपरेनें न देतां लायक माणसास देणें.

( ३ ) नोकरीबद्दल रोख पगार देणें, जहागिरी न देणें.

( ४ ) परस्पर रयतेकडून वसूल घेणें, जमिनदारांमार्फत न घेणें.

( ५ ) प्रत्येक खात्याचे कामासाठीं स्वतंत्र मनुष्य नेमणें.

( ६ ) राज्यकारभारांत लष्कराचें माहात्म्य न वाढविणें.

( ७ ) ब्राह्मण, प्रभु व मराठे यांस नोकरीस ठेवून एक-मेकांना एकमेकांच्या दाबांत ठेवणें.

( ८ ) सर्व खर्च करून ठराविक शिल्लक टाकणें.

हे नियम शिवाजीच्या मृत्यूनंतर न पाळल्यामुळेंच मराठी राज्य लयाला गेलें.

अशा तऱ्हेनें जिंकलेल्या मुलुखाचा पद्धतशीर व चोख कारभार करण्यास सुरवात करून शिवाजीनें आपले राज्यास कायमपणा व बळकटी आणली.

परंतु दुर्दैवानें त्याला लवकरच मरण आल्यामुळें मराठी राज्याचें फार नुकसान झालें. नेहमीं योग्य सल्ला व धीर देणारी त्याची प्रेमळ व हुषार आई त्याच्या राज्याभिषेकाच्या समारंभानंतर पंधराच दिवसांनीं मरण पावली. यामुळें त्याचें मन अगदीं उदास झालें. वडील मुलगा संभाजी वाईट वर्त-नाचा निघाला या गोष्टीनें तर त्याला फार दुःख होत असे. तरी मन शांत ठेवून शेवटपर्यंत सर्व वेळ त्यानें आपल्या

राज्यास बळकटी आणण्यांत खर्च केला. शेवटीं रायगडावर गुढगी नांवाचा रोग होऊन तो सन १६८० त आपल्या वयाच्या ५३ वें वर्षी मरण पावला. तेव्हां सर्व महाराष्ट्रास अतिशय दुःख झालें.

शिवाजी मोठा स्वदेशाभिमानी, महत्त्वाकांक्षी, उद्योगी, धाडशी व धूर्त होता. स्वधर्मावर त्याचें फार प्रेम होतें. त्याला कोणतेंही वाईट व्यसन नव्हतें. देव, संत व आईबाप यांची भक्ति तो कळकळीनें करीत असे. जन्मभर स्वसुखावर पाणी सोडून देश व धर्म यांच्या बचावासाठीं त्यानें देह झिजाविला. तो सडपातळ, निमगोरा, सुंदर व तरतरीत होता. त्याला संभाजी व राजाराम असे दोन मुलगे होते.

---

### गोष्ट ३२ वी.

## कुसंगतीनें केलेला कहर.

शिवाजी महाराजांच्या मरणाच्या वेळीं त्यांचा वडील मुलगा संभाजी पन्हाळा किल्ल्यावर नजर कैदेंत होता. त्यावेळीं रायगडावर शिवाजी महाराजांची बायको सोयराबाई व तिचा मुलगा राजाराम हे होते. पहिल्यानें सोयराबाईनें बऱ्याच अधिकाऱ्यांस वश करून शिवाजीच्या मरणानंतर एक महिन्यानें राजारामास गादीवर बसविलें. पण ही गोष्ट संभाजीस पन्हाळयास समजतांच त्यानें धडाडीनें पन्हाळा आपल्या ताब्यांत घेतला, जनार्दनपंत सुमंत यांस कैद केलें, हंबीरराव सेनापति यांस व मोरोपंत पेशवे यांस वश केले, व त्यांचे मदतीनें रायगडावर हल्ला करून किल्ला सर केला. नंतर बहुतेक सर्व जुने सरदार व अधिकारी हे आपल्या विरुद्ध आहेत असा संशय येऊन त्यानें जुन्या

अनुभवी कारभाऱ्यांस दूर केलें, राजारामास कैद केले व राजारामाची आई सोयराबाई हिला कोनाड्यांत चिणून ठार मारलें. शिवाजी महाराजांस तूं मारलेंस असा त्या बिचारीवर संभाजीनें आरोप केला होता. तो जुन्या अनुभवी कामदारांना मुळींच विचारीनासा झाला. कविकुलेश हा त्याचा मुख्य प्रधान बनला. कविकुलेशलाच कलुशा असें म्हणूं लागले. हा मूळचा उत्तर हिंदुस्तानांतला प्रयाग उर्फ अलाहाबाद या शहरीं राहणारा एक कनोजी ब्राह्मण होता. औरंगजेबास चकवून जेव्हां शिवाजी महाराज प्रयागला गेले तेव्हां भोंसल्यांचा हा उपाध्या होता म्हणून महाराजांनीं त्याचे जवळ संभाजीला ठेविलें; तेव्हांपासून या व्यसनी कुलेशाचें वजन संभाजीवर जें एकदां बसलें तें शेवटपर्यंत कायम होतें. संभाजीला यानेंच दक्षिणेंत आणले. या कुलेशाची वाईट संगत लागल्यामुळेंच संभाजीवर व मराठी राज्यावर कहर कोसळला. शिवाय संभाजीवर दाब ठेवतील असे दोन पुरुष सन १६८२ त मरण पावले, एक कर्नाटकांतील हुषार सरदार हणमंते व दुसरे समर्थ रामदासस्वामी. शिवाजी मेला तेव्हां आतां एकदम स्वारी करून मराठी राज्य बुडवावें असा बेत करून मोठें सैन्य व तोफखाना घेऊन स्वतः औरंगजेब बादशहा १६८३ त दक्षिणेंत आला, पण लवकरच झालेल्या झटापटींत संभाजी ‘ बापसे बेटा सवाई ’ आहे हें त्याला कळून आलें. म्हणून मराठी राज्य बुडविण्याचा बेत तहकूब करून त्यानें विजापूर व गोवळकोंड्यावर स्वारी केली व बरेच दिवस लढाई करून विजापूरचें राज्य १६८५ त व गोवळकोंड्याचें १६८७ काबीज करून आपल्या राज्यास जोडलें. नंतर त्यानें पुनः संभाजीकडे मोर्चा फिरविला. या वेळीं

संभाजीला गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याचा सिद्दी व औरंगजेब

औरंगजेब.



या तिघांशीं लढावें लागलें. शिवाय संताप व संशय यांचे भरांत पूर्वीच्या अनुभवी सल्लामसलतगारांना व सरदारांना ठार मारल्यामुळें सर्व बाबतींत त्याला स्वतःच्याच विचारानें वागावे लागे. तशाही स्थितींत त्यानें गोवें येथें पोर्तुगीज लोकांचा पूर्ण पराभव करून व सिद्दीसही जेरीस आणून आपला पराक्रम गाजविला. पण शिवाजीप्रमाणें त्याचे अंगीं धूर्तता नव्हती; यामुळें या विजयांचा त्याला मुळींच फायदा झाला नाहीं. औरंगजेबाला देखील उघडच्या मैदानावर संभाजीचा पराभव करता आला नाहीं. जें शत्रूला करतां आलें नाहीं तें, व्यसन व कुसंगती यांनीं केलें. संभाजीचा व्यसनी प्रधान कुलेश उर्फ कलुशा याच्या सांगण्या-

वरून दोन दिवस विश्रांति घ्यावी म्हणून संभाजी आपले थोडे मित्र व कलुशा यांचेसह संगमेश्वरास जाऊन राहिला. ही बातमी तकरीबखान नांवाच्या औरंगजेबाच्या सरदाराला समजली. लगेच त्यानें एक टोळी पाठवून संभाजी व कलुशा दारू पिऊन बेसावध झाले असतां त्यांना कैद करून तुळापूर,येथें बादशहा समोर नेले. बादशहानें प्रथम आपल्या धन्याचा नाश करणाऱ्या कलुशास ठार केलें. नंतर तूं मुसलमान हो म्हणजे मी तुला जीवदान देईन असें त्यानें संभाजीस सांगितलें.कसाही झाला तरी शिवाजीसारख्या तेजस्वी क्षत्रियाचा संभाजी हा तेजस्वी व बाणेदार मुलगा होता. त्याला तें सहन न होऊन त्यानें पैगंबराची निंदा केली व तुझी मुलगी मला दे म्हणजे मी मुसलमान होतों असा बादशहास उलट निरोप त्यानें पाठविला. यामुळें बादशहानें त्याची जीभ छाटून डोळे फोडून त्याला हालहाल करून ठार मारलें. अशा तऱ्हेनें संभाजी-सारखा शूर, धाडसी, स्वधर्माभिमानी व पाणीदार वीर कुसंगतीनें हालहाल होऊन मरण पावला. अशा तऱ्हेनें १६८९ त संभाजीला मारल्यानंतर बादशहाच्या हुकुमानें संभाजीची सुशील बायको येसूबाई व मुलगा शिवाजी उर्फ शाहू यांना औरंगजेबानें कैद करून आणविलें. बाळांनो, पहा हा कुसंगतीचा परिणाम. यासाठीं कधींही दुर्व्यसनी मनुष्याची संगति धरूं नका.

---

## गोष्ट ३३ वी.

## स्वराज्याचा अस्तोदय.

पिसाळ नांवाच्या मराठ्याच्या दगलबाजीमुळें मराठ्यांची राजधानी रायगड व संभाजीची बायको येसूबाई

व पुत्र शिवाजी हीं औरंगजेबाच्या तावडींत सांपडलीं हें मागच्या गोष्टींत आलेंच आहे. गोवळकोंडें व विजापूर हीं शहरें जिंकतांच व तेथील सुलतान मरतांच तीं राज्यें बुडालीं. पण संभाजीमहाराज मरण पावले व राजधानी रायगड मोंगलांचे हातीं पडून रायगडावर जरी स्वराज्याचा सूर्यास्त झाला, तरी लगेच अधिक प्रखर तेजानें तोच मराठी स्वराज्याचा प्रखर सूर्य जिंजीला उदय पावला. मराठी राज्य बुडविण्याची औरंगजेबाची आशा व्यर्थ झाली.याचें कारण शिवाजीमहाराजांनीं स्थापिलेलें राज्य एका इसमाच्या पराक्रमावर अवलंबून नव्हतें. तें मराठ्यांच्या स्वदेशप्रेमावर व स्वाभिमानावर अवलंबून होतें. यामुळें रायगड पडला व संभाजी मरण पावला तरी अतोनात खटपटी करून मराठ्यांनीं मराठी राज्य मरूं दिलें नाहीं. रायगड पडतांच मराठेमंडळ राजारामाचे पुढारीपणाखालीं एकत्र झालें. त्यांत महाप्रतापी धनाजी जाधव, संताजी घोरपडे, प्रल्हाद निराजी, परशुराम त्रिंबक, खंडो बल्लाळ, खंडेराव दाभाडे, परसोजी भोंसले वगैरे रणशूर सरदार गोळा झाले. पूर्वींच येसूबाई व राजाराम यांच्या एकमतानें ठरलें होतें त्याप्रमाणें राजाराम महाराज यांनीं महाराष्ट्रांत मोंगलांचा धुमाकूळ असल्यामुळें मराठी राज्याची राजधानी कर्नाटकांत जिंजीस नेण्याचें ठरविलें व सर्व सरदारांसह तिकडे मोर्चा फिरविला. नंतर जिंजी येथें राजाराममहाराजांना राज्याभिषेक झाला. राजाराममहाराजांची दहा वर्षांची कारकीर्द अतीशय धामधुमीची गेली. शांतता अशी एक दिवस देखील लाभली नाहीं. औरंगजेबानें घे घे करीत मराठ्यांचे सर्व किल्ले जिंकावे, इतक्यांत धनाजी जाधव, शंकराजी नारायण वगैरे मराठे बहाद्दरांनीं ते परत घ्यावे असा धूमधडाका चालून

औरंगजेब बादशहा अगदीं जेरीस आला. ता आतां अतीशंयं म्हातारा झाला होता व मराठ्यांना नाहींसें करण्याची त्याची सर्व आशा आतां नष्ट होत चालली होती. राजाराम जिंजीस आहे हें समजतांच औरंगजेबानें झुलपिकारखानास तिकडे पाठविलें. झुलपिकारखानानें जिंजीस वेढा दिला. तो वेढा सारखा १६९७ पर्यंत पडला होता. शेवटीं जिंजी मोंगलांच्या हातांत पडून आंत पहातात तों राजाराम आधींच आपल्या सरदारांसह निघून गेला असें त्यांस कळून आलें व त्यांची निराशा झाली. जिंजीहून परत महाराष्ट्रांत आल्यावर राजारामानें १६९८ त सातारा हें राजधानीचें शहर केलें. पुढें १६९८ पासून १७०० पर्यंत राजारामानें अतीशय पराक्रम गाजवून जिकडे तिकडे चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा सपाटा लावला. प्रत्यक्ष बादशहासही पकडण्याचा योग आला होता. पण बादशहा त्या वेळीं जनानखान्यांत असल्यामुळें बचावला. अशा तऱ्हेनें केलेल्या धूमधडाक्यानें राजारामास अतीशय कष्ट झाले व त्यामुळें नवज्वर येऊन त्यांतच त्याचा सन १७०० च्या मार्च महिन्यांत सिंहगडावर अंत झाला. मरतांना त्याचें सर्व लक्ष्य बादशहाचे कैदेंत असलेला आपला पुतण्या शिवाजी उर्फ शाहू याचेकडे होतें व त्याची मराठे सरदारांना शेवटची आज्ञा अशी होती कीं मी मेलों तरी शाहूला सोडवीपर्यंत स्वस्थ बसूं नका.

राजारामानंतर त्याची बायको ताराबाई हिनें आपला मुलगा शिवाजी याचे नांवानें राज्य चालविलें.

## गोष्ट ३४ वी.

## भाऊबंदकी.

बाळांनों, शिवाजीमहाराज व त्यांचा सत्पुत्र राजाराम यांचें सर्व आयुष्य स्वराज्याचे सेवेंत खर्च झालें. राजाराम महाराज हा मराठी राज्याचा दुसरा सिंहही सिंहगडावरच मरण पावला. शिवाजी महाराजांपासून तो राजाराम महाराजांच्या मृत्यूपर्यंत जो **निर्लोभीपणा** व **राष्ट्रभक्ति** महाराष्ट्रांत दिसत होती ती आतां कमी झाली. राजारामाची बायको ताराबाई व त्या वेळचे सरदार यांच्या मनांत स्वार्थबुद्धीनें शिरकाव केला. लोभानें त्यांचे हृदयांत ठाणें बसवलें. त्यांचे हातून यापुढें अत्यंत शौर्याचीं कामें झालीं खरीं, पण त्यांत देशभक्तीचें तेज झळकलें नाहीं. स्वार्थ व लोभ बळावला म्हणजेच भाऊबंदकीस सुरवात होते, व भाऊबंदकीनें शेवटीं नाश होतो. राजारामानें जरी आपला देह स्वराज्याच्या सेवेंत झिजविला तरी त्याच्या मनांत अप्पलपोटेपणा कधींच शिरला नाहीं. संभाजीचा मुलगा शाहू, बादशहाच्या कैदेंत होता म्हणूनच नाइलाजानें त्यानें राज्याचा अंगिकार केला. शाहूच्या सुटकेसाठीं त्यानें प्रयत्नही पुष्कळ केला, पण त्याला यश आलें नाहीं. शेवटीं मरतांनाही माझ्या मरणानंतर शाहूला सोडवा व त्याला गादीवर बसवा असेंच त्यानें सर्वांस बजावून सांगितलें. पण तेंच ताराबाईकडे पहा. तिला आपलपोटेपणा फार. सरदार मंडळी म्हणत होती कीं शाहू सुटून येण्याची वाट पाहूं. पण नाहीं. तिनें घाईघाईनें आपल्या दहा वर्षांच्या शिवाजी नांवाच्या मुलास गादीवर बसविलें. व त्याच्या नांवानें कारभार चालू केला. बरें पुढें औरंगजेबाचें मरणानंतर कैदेंतून सुटून १७०८ मध्यें

शाहू महाराष्ट्रांत आल्यावर तरी सरदारांच्या विनंतीला मान देऊन राज्य शाहूला द्यावें, पण तेंही तिनें केलें नाहीं. उलट बऱ्याच सरदारांस वश करून तिनें शाहूशीं युद्ध सुरू केलें. कांहीं सरदार तिच्या बाजूस गेले पण बरेच जुने सरदार शाहूला मिळाले. झालें, ताराबाई व शाहू यांच्या भाऊबंदकी आत्मघातकी युद्धास सुरवात झाली व मोंगल राज्य अगदीं दुर्बळ झाल्यामुळें सर्व हिंदुस्तानावर मराठ्यांचे स्वराज्य स्थापण्याची आलेली सोन्यासारखी संधी फुकट गेली. मराठी इतिहासांत ह्या भाउबंदकीनें पदोपदीं भयंकर नुकसान झालें आहे. ह्या आपसांतील युद्धांत धनाजी जाधव, हैबतराव निंबाळकर, खंडेराव दाभाडे, परसोजी भोंसले, बहिरोपंत पिंगळे खंडो बल्लाळ ही जुनी व देशभक्त मंडळी शाहूचे बाजूस मिळाली. ताराबाईच्या पक्षास शंकराजी नारायण सचीव, परशुरामपंत प्रतिनिधी, दमाजी थोरात, कान्होजी आंग्रे ही मंडळी होती. ह्या आपसांतल्या युद्धास पूर्ण जय मिळविण्यास बाळाजी विश्वनाथ भट ह्याची शाहू महाराजांना फार मदत झाली. हें आपसांतलें भांडण सन १७०७ पासून सन १७१७ पर्यंत चाललें होतें. मध्यंतरीं सन १७१२ त ताराबाईचा मुलगा शिवाजी मरण पावला, तेव्हां ताराबाईचा पक्ष कमजोर झाला, तरी राजारामाचा दुसरा मुलगा संभाजी याचे वतीनें ताराबाईची मंडळी शाहूबरोबर झगडत होतीच. शाहूनें राजधानीचें शहर सातारा जिंकून घेतलें व १७०८ त तेथें त्यानें आपणास राज्याभिषेक करविला. तेव्हां ताराबाईनें दुसरें राज्य कोल्हापुरास स्थापून, लढाई चालू ठेवली. शेवटीं १७१७ त शाहूनें ताराबाइच्या पक्षाचा पराभव केला, तरी देखील उदारपणानें त्यानें कोल्हापूरचे जवळचा मुलूख राजारामाचा मुलगा संभाजी

यास दिला. यामुळें कोल्हापूरचें राज्य तेव्हांपासून आजपर्यंत चालू आहे. शाहूनें बाळाजी विश्वनाथाची योग्यता व त्यानें केलेली मदत लक्षांत घेऊन १७१३ सनांत त्याला आपला पेशवा केलें, व त्याच्या विचारानें इतर अष्टप्रधान नेमिले. शाहू हा लहानपणासून औरंगजेबाच्या जनानखान्यांत वाढल्यामुळें त्याला शांतपणा व स्वस्थता हीं फार आवडत. यामुळें त्यानें कारभाराची दगदग बाळाजी विश्वनाथ पेशवा या हुशार, शूर व चलाख पुरुषावर व त्याचा मुलगा बाजीराव व नातू नानासाहेब यांच्यावर सोंपविली. त्यांनींही मराठ्यांचें वैभव, सत्ता व दरारा सर्व हिंदुस्तानभर पसरविला. वैभवशाली शाहूछत्रपती सन १७४८त मरण पावले. त्यांना मुलगा नव्हता यामुळें मरतांना नानासाहेब पेशवे यांस जवळ बोलावून कोल्हापूरच्या वंशांतील रामराजा नांवाचा लहान मुलगा दत्तक घेऊन त्याचे नांवानें पेशव्यांनीं कारभार पहावा असें सांगितलें. त्याप्रमाणें व्यवस्था चालू झाली. व पुढें सर्व सत्ता पेशव्यांच्या हातांत आली. पेशव्यांनीं कारभाराचें मुख्य ठिकाण पुणें हें केलें.

---

### गोष्ट ३५ वी.

## देशमुखाचा पेशवा.

बाळांनो, अतीशय संकटें आलीं, दुर्दैव हात धुवून पाठीस लागलें, आशेला मुळींच जागा उरली नाहीं, जन्मभूमीस रामराम ठोकावा लागला तरी देखील आपण खचून जाऊं नये. अतिशय वाईट स्थिति आली कीं भरभराटीस आरंभ झालाच असें समजावें. अतीशय मोठालीं संकटें आणुन दैव

आपली परीक्षा घेत असतें. आपण मुळींच धीर सोडला नाहीं व दैवावर जय मिळविण्याचा पक्का निश्चय करून जोरानें प्रयत्न चालू ठेवला कीं दैव हात जोडून आपल्याला अनुकूल होतें, ही गोष्ट पेशव्यांचा मूळ पुरुष बाळाजी विश्वनाथ याचे चरित्रावरून चांगली दिसून येते. हा बाळाजी विश्वनाथ आरंभीं कोंकणांत सिद्दीच्या राज्यांत श्रीवर्धन गांवचा देशमुख होता. सिद्दीच्या राज्यांत हिंदूंना फार वाईट रीतीनें वागवीत. तसल्या त्या जुलमी राज्यांत आपणाला कामगिरी बजावतां येणार नाहीं व आपला व्हावा तसा उदय होणार नाहीं ही गोष्ट तरुण बाळाजीच्या लक्ष्यांत आली. तो कांहीं भित्रा नव्हता. त्यानें लगेच देशावर जाऊन मराठी राज्याची सेवा करून आपलें भाग्य उदयास आणण्याचा बेत केला. सिद्दीच्या जुलुमाची शिकस्त झाली होती. प्रत्यक्ष बाळाजीचा भाऊ जानोजी याला पोत्यांत घालून समुद्रांत बुडवून त्यानें ठार मारलें होतें. यामुळें बाळाजीनें आपल्या बेताप्रमाणें श्रीवर्धन सोडलें व तो वेळास नांवाच्या जवळच्या गांवीं गेला. तेथें त्याचे मित्र भानु हेही त्याच्याबरोबर निघाले. नंतर बाळाजी विश्वनाथ भट व भानू असे घाट चढून देशावर आले. प्रथम ते कांहीं दिवस भोरास सचिवाकडे नोकरीस राहिले. नंतर भोराहून बाळाजी, व भोरचे अंबाजीपंत पुरंधरे हे सातान्यास गेले व त्यांनीं १७०६ च्या सुमारास प्रसिद्ध सेनापती धनाजी जाधव यांचे पदरीं वसुलाचे कामावर नोकरी धरली. त्यावेळीं धनाजी जाधवाकडे सैन्याचें व वसुलाचें अशीं दोन खातीं होतीं. बाळाजीची हुशारी पाहून धनाजी जाधवाचें त्याच्यावर इतकें प्रेम व विश्वास बसला होता कीं आपल्या गैरहजेरींत आपलें

सर्व काम तो बाळाजीवर सोंपवीत असे. धनाजी जाधव हा शाहूचा मोठा आधार होता. तो सन १७१० त मरण पावला. तेव्हां शाहूची बाजू फार कमजोर झाली. कारण धनाजी मेला हें पाहून शाहूचे बरेच शूर सरदार ताराबाईस कोल्हापुराला जाऊन मिळाले. प्रत्यक्ष धनाजीचा मुलगा चंद्रराव जाधव हाही शाहूचा अपमान करून ताराबाईकडे चालता झाला. अशा कठिण प्रसंगीं बाळाजीचा शाहूला फार उपयोग झाला. शाहूकडे सैन्य कमी हें लक्ष्यांत ठेऊन बाळाजीनें मोठ्या हुशारीनें व मुत्सद्देगिरीनें, फितलेल्या बऱ्याच सरदारांना दोन उपदेशाच्या गोष्टी सांगून व त्यांचा देशाभिमान जागृत करून शाहूच्या पक्षास मिळविलें. शिवाय शत्रूकडचे बरेच शिपाई गोळा करून व नवीन निवडक लोक शिकवून त्यानें दोन हजार शूर सैन्य तयार केलें. ही त्याची हुशारी पाहून शाहू खूष झाला व त्यानें बाळाजीला सेनाकर्ते हा किताब दिला. पुढें खटावकर म्हणून एक सरदार बंडखोर झाला होता. त्याचें बंड मोडण्याकरितां त्यानें बाळाजीस पाठविलें. बाळाजीनें खटावकरांचा पराभव केला व तो साताऱ्यास परत आला. इतक्यांत कोंकणांत आंग्र्यानें बंड केल्यावरून त्यावर बहिरोपंत पिंगळे या पेशव्यास शाहूकडे पाठविलें. आंग्र्यानें बहिरोपंत पेशव्याचा पराभव करून त्याला कैदेंत टाकलें. ही बातमी शाहूस समजतांच त्यानें बाळाजीला आंग्र्यावर पाठविलें. बाळाजीनें फार हुशारीनें आंग्र्यास शाहूशीं तह करावयास लाविलें व बहिरोपंत पेशव्यासही सोडवून आणलें. यामुळें बहिरोपंत पेशवाईचें काम करण्यास नालायक आहे असें पाहून व बाळाजीच्या हुशारीनें खूष होऊन शाहूनें १७१३ च्या नवंबर महिन्यांत बाळाजीला

पेशवा केलें. अशा तऱ्हेनें सिद्दीच्या जुलमानें घरादाराला मुकलेला बाळाजी स्वतःच्या हुशारीनें व उद्योगानें शाहूमहाराजांचा पेशवा झाला, यावरून हुशारीनें उद्योग करून प्रतिकूल दैवाला अनुकूल करतां येतें ही गोष्ट सिद्ध होते.

---

## गोष्ट ३६ वी.

## मित्रप्रेमाचा कळस.

बाळांनों, आपल्या महाराष्ट्राच्या इतिहासांत अनेक पुरुषरत्नें चमकलीं त्यांत नानाफडणीस हे विशेष प्रसिद्ध आहेत. नानाफडणीस यांचा आजा बाळाजी महादेव हाही मोठा स्वदेशभक्त होता. बाळाजी विश्वनाथाचा तो जिवलग मित्र होता. बाळाजी विश्वनाथाबरोबर तो कोंकणांतून देशावर आपलें नशीब काढण्यास आला. स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी या हक्काच्या सनदा आणण्यासाठीं व दिल्लींत कैदेंत असलेल्या शाहूच्या आईस व बायकोस सोडवून आणण्यासाठीं सन १७१७ त बाळाजी विश्वनाथ बरेच सरदार व मोठें सैन्य घेऊन दिल्लीस गेला. त्यावेळीं बाळाजी महादेव भानु हाही त्याचे बरोबर गेला होता. दिल्लीस बादशहाचा प्रधान हुसेन अल्ली यास चांगली मदत करून व बादशहास खूष करून बाळाजी विश्वनाथ यानें स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी या हक्काच्या सनदा मिळविल्या व शाहूच्या मंडळीसही बादशहाचे कैदेतून सोडवून आपल्या ताब्यांत घेतलें. आणि आतां स्वदेशास जाण्यास निघणार इतक्यांत त्याला अशी बातमी समजली कीं दिल्लींतील मुसलमान लोकांस मराठ्यांस सनदा मिळाल्या ही गोष्ट आवडली नाहीं.

यामुळें बाळाजी विश्वनाथास परत जातांना गांठून व ठार मारून त्याचे जवळच्या सनदा हिसकावून घ्याव्या असा कट त्यांनीं केला आहे. हें समजतांच तो अतिशय काळजींत पडला. एवढ्या प्रयत्नानें मिळविलेल्या सनदा जाणार हें मनांत येऊन त्याला फार वाईट वाटलें. त्यावेळेस त्याचा जिवलग मित्र बाळाजीपंत भानु जवळच होता. तो म्हणाला, मित्रा, यांत एवढी काळजी कशाला करतोस ? तूं सनदा घेऊन साधा पोषाख करून आडवाटेनें दक्षिणेंत जा व मी तुझा पोषाख करून पालखींत बसून बरोबर सर्व मंडळी घेऊन जातों. म्हणजे सर्व कांहीं ठीक होईल. तेव्हां बाळाजी विश्वनाथ म्हणाला, ' अरे हो, पण तुला ते ठार मारतीलना ? माझ्यासाठीं माझ्या मित्रानें ठार मरावें ही गोष्ट मला पसंत नाहीं. ' तेव्हां बाळाजीपंत भानु म्हणाला ' मित्रा माझ्या-पेक्षां आज स्वराज्याला तुझी जास्त जरूरी आहे. मी जगल्यानें स्वराज्याची मोठीशी कामगिरी करीन असें मुळींच नाहीं. मनुष्याला केव्हांतरी मरावयाचेंच आहे, तर मग स्वराज्याची सनद, चौथाई सनद, सरदेशमुखीची सनद, तुझ्यासारख्या स्वराज्याच्या आधारस्तंभाचा व माझ्या जिवलग मित्राचा जीव या सर्वांचा बचाव करण्यासाठीं जर मला प्राण खर्ची घालावयास सांपडत आहे, तर यापेक्षां मला आणखी अधिक प्रिय तें काय असणार ? मित्रा एवढें माझें म्हणणें ऐक.' अशा तऱ्हेनें बाळाजीपंत भानूनें अतीशय हट्ट धरला यामळें व स्वदेशाची सेवा करावयास आणखी दिवस सांपडतात यामुळें बाळाजी विश्वनाथानें त्याचें म्हणणें मान्य केलें. मग आडवाटेनें साध्या पोषाखानें तो सनदा घेऊन दक्षिणेंत आला व त्याचा मित्र भानू हा त्याचे जागीं पालखींत

बसून मारेकऱ्यांकडून मारला गेला. बाळांनो, पाहिलेंत हें अलौकिक देशभक्तीचें व मित्रप्रेमाचें उदाहरण! अशीं नररत्नें होतीं म्हणनच मराठ्यांचा उदय झाला.

बाळाजी विश्वनाथानें या मिळविलेल्या सनदा म्हणजे सर्व हिंदुस्तानभर मराठी राज्याचा विस्तार करण्याचें उत्तम साधनच होय. ह्या साधनानेंच मराठ्यांचे राज्याचा पुढील काळांत अतीशय झपाट्यानें विस्तार झाला. बाळाजी विश्वनाथ दक्षिणेंत आल्यावर संभाजीच्या वेळेपासुन राज्यकारभारांत जो अतीशय गोंधळ माजला होता तो त्यानें मोडला, नवीन अष्ट प्रधान नेमिले व नीट चौकशी करून राजारामाच्या वेळीं दिलेल्या सनदा कायम केल्या. पण त्या सनदांमुळें ज्यांना जहागीरी मिळाल्या होत्या त्यांनीं आपले मुलुखाचे हिशेब मुख्य सरकारच्या अधिकाऱ्यांस दरवर्षीं तपासूं द्यावे, दरवर्षीं ठराविक खंडणी द्यावी, सरकारच्या मदतीकरितां बोलावणें येतांच स्वत: सैन्य घेऊन स्वराज्यसेनेस मदत करावी व परराज्यांशीं स्वतंत्रपणें परभारें व्यवहार करूं नये असें त्यांच्याकडून कबूल करवून त्या सर्वांचा स्वराज्याचा जोरदार संघ बनाविला. अशा तऱ्हेनें स्वदेशाची अतशिय मोलवान सेवा करून हा थोर पुरूष सन १७२० त मरण पावला.

---

गोष्ट ३७ वी.

## बाजीरावाच्या भराऱ्या.

बाळाजी विश्वनाथ सन १७२० त मरण पावला. तेव्हां त्याची स्वामिभक्ति व स्वराज्यसेवा लक्षांत आणून व त्याचा

मराठी ... (१०१) क्र. 2130

मुलगा 'बापसे बेटा सवाई' आहे असें पाहून शाहूमहाराजांनीं बाळाजीचा वडील मुलगा बाजीराव याला पेशवा केलें.

बाजीराव.



प्रत्येक मनुष्याच्या स्वभावांत कांहीं तरी विशेष प्रकार असतो. बाळाजीच्या अंगीं मुत्सद्दीपणा व मनमिळाऊपणा विशेष होता तर बाजीरावांत धूमधडाका व आत्मविश्वास मुख्यत: चमकत होता. मनांत आलें कीं धडाडीनें तें त्यानें बजावलेंच म्हणून समजावें. कसें करूं काय करूं हा अष्टाक्षरी मंत्र त्यानें कधींही जपला नाहीं. आज इथें तर उद्यां दूरच्या शत्रूच्या मुलखांत असा तो विजेप्रमाणें फिरत असे. यामुळें त्याच्या पुढें मी मी म्हणणाऱ्या शत्रूचा बिलकुल टिकाव लागत नसे. मनुष्याचा उदय होण्यास पुष्कळ गुण

लागतात. पण त्या सर्वांत जर कोणता अत्यंत महत्त्वाचा असेल तर तो तडफ अथवा धडाडी. जग जिंकणारा ज्यलीयस सीझर, अलेकझांडर किंवा नेपोलिअन यांना विलक्षण जय मिळवून देण्याला हीच धडाडी उपयोगी पडली. धडाडी अंगांत संचरायला विलक्षण आत्मविश्वास लागत असतो. मी म्हणेन तें करीन अशी हिंमत लागत असते. अशी हिंमत असा आत्मविश्वास व अशी धडाडी कोणत्याही काळीं व कोणत्याही देशांत मनुष्याला वैभवाच्या शिखरावर नेऊन बसविल्याशिवाय रहात नाहीं. असो, सांगायचें तात्पर्य हें कीं, अशी धडाडी अंगांत होती म्हणूनच चोहों बाजूंला उत्पन्न झालेल्या बलाढ्य व कावेबाज शत्रूंना बाजीरावानें मऊ करून सोडलें. शिवाजीचे मृत्यूनंतर बाजीराव, पेशवा होईपर्यंत मराठ्यांचें युद्धधोरण बचावाचें होतें. तें बाजीरावानें एकदम बदलून चढावाचें बनविलें. आहे तें संभाळून रहावें ही मिळमिळीत पद्धत भरारी बाजीरावानें झुगारून दिली व चढावाची झणझणीत पद्धत धडाडीनें सुरू केली. त्या हिंमतबहाद्दराचा उत्कर्ष सहन न होऊन श्रीपतराव प्रतिनिधि त्याचा द्वेष करूं लागला. हें असें चालायचेंच. दुसरा आपल्यापुढें जातो, महत्त्वास चढतो हें साधारण माणसांस खपत नाहीं. श्रीपतरावाला तें खपलें नाहीं व तो बाजीरावाचा नाश करण्याची जारीनें खटपट करूं लागला. त्यास आंग्रे, दाभाडे, गायकवाड व रघूजी भोंसले हे मिळाले. पण आपल्या अंगच्या विलक्षण शौर्यानें व धडाडीनें बाजीरावानें त्यांस बाजूस सारलें. बाजीरावाच्या भराऱ्यांचा प्रताप विशेषतः निजाम व मोंगल यांचेवर गाजला. बाजीरावाची नजर नेहमीं उत्तरेकडे असे. शिवाजीच्या मनांत सर्व हिंदुस्तानावर हिंदवी स्वराज्य स्थापावें असें होतें. ती

शिवाजीची इच्छा पूर्ण करण्यास ही संधि उत्तम आहे, या वेळीं दिल्लीची मोंगली बादशाही अतीशय दुबळी झाली आहे, या वेळीं एकदम दिल्लीवर हल्ला करून हिंदवी स्वराज्याचा मराठ्यांचा भगवा झेंडा दिल्लीस फडकवावा अशी बाजीरावाची फार इच्छा होती. पण शाहू लहानपणापासून मोंगलबादशाहींत वाढल्यामुळें मोंगलबादशाहीवर हात उगारावा ही गोष्ट त्याला आवडली नाहीं. यामुळें व वर सांगितलेल्या आपल्याच सरदारांच्या विरोधामुळें बाजीरावास आपली व शिवाजीची इच्छा पार पाडतां आली नाहीं. तरी देखील आपल्या धडाडीनें त्यानें उत्तर हिंदुस्तानांत मराठ्यांचा दरारा व अम्मल पुष्कळच बसवला. मराठ्यांतील बेकीचा फायदा घेऊन निजामानें कोल्हापूरच्या संभाजीस हातीं धरलें, श्रीपतराव प्रतिनिधीस वऱ्हाडांत जहागिरी देऊन वश केलें व मराठ्यांचा चौथाई व सरदेशमुखीचा हक्क देण्याचें नाकारलें. लगेच शाहूची आज्ञा घेऊन बाजीरावानें निजामास चंद्रसेनजाधव वगैरे मराठे सरदार मिळण्यापूर्वींच निजामच्या जालना प्रांतांत लुटालूट करीत औरंगाबादेवर चाल केली व बऱ्हाणपुराकडे जातों असें निजामास दाखवून एकदम गुजराथेंत भरारी मारली व खूप खंडणी मिळविली. बाजीराव बऱ्हाणपुराकडे आहे या समजुतीनें निजाम तिकडे गेला, पण बाजीराव तेथें नाहीं हें पाहून आपणास बाजीरावानें चांगलेंच फसविलें असें त्याच्या लक्षांत आलें. तेव्हां चिडून बाजीरावाचें प्रिय पुणेंच जाळून त्याला शिक्षा करूं असें ठरवून निजामसाहेब जों निघणार तों बाजीरावानें एक भरारी मारली व निजामाच्याच राज्यांत लुटीचा धूमधडाका चालविला. हें पहातांच नको तें पुणें असें होऊन निजाम परत फिरला. निजामास हुलकावीत हुलकावीत

बाजीरावानें पालखेड येथें त्यास पेंचांत आणलें. ना दाणा ना पाणी अशी बिचाऱ्या निजामाची अवस्था झाली. तेव्हां निरुपाय होऊन त्यानें मराठ्यांशीं तह केला. त्या तहाप्रमाणें त्यानें सन १७२८ त संभाजीचा पक्ष सोडून दिला व मराठ्यांचे चौथाई व सरदेशमुखीचे हक्क देण्याचें कबूल केलें.

---

## गोष्ट ३८ वी.

## स्वराज्याचें साम्राज्य.

हिंदवी स्वराज्य सर्व हिंदुस्तानावर पसरावें या इच्छेनें प्रथम शिवाजीमहाराजांनीं राजा जयसिंग वगैरे उत्तर हिंदुस्तानांतल्या रजपूत राजांशीं मैत्री जोडली. उत्तरेकडील रजपूत राजांचा छळ अवरंगजेबानें केला तसाच दक्षिणेंत मराठ्यांचा केला. यामुळें उत्तरेकडील रजपूत व दक्षिणेकडील त्यांचेच वंशज मराठे यांनीं एक होऊन हिंदवी स्वराज्य हिंदुस्थानभर स्थापावें हा शिवरायांचा बेत त्यांच्या अकाली मरणानें जागचेजागीं राहिला. तो आपण पूर्ण करावा या इच्छेनें बाजीराव मरेपर्यंत झटून उद्योग करीत होता. माळव्यांत आपलें वर्चस्व कायम रहावें म्हणून रणशूर राणोजी शिंदे व जवानमर्द मल्हाराव होळकर, उदाजी पवार, गोविंदपंत बुंदेले, या पराक्रमी पुरुषांस माळवा व बुंदेलखंडांत त्यानें ठेविलें. अशा तऱ्हेनें माळव्यांत कायमचें ठाणें देऊन दिल्लीची बादशाही आपल्या अमलाखालीं आणावी असा बाजीरावाचा बेत होता. त्याप्रमाणें दिल्लीच्या कारभारांत त्यानें हात शिरकविला व पुढें महादजी शिंदे यानें दिल्लीचा बादशहा याला आपल्या हातांतलें बाहुलें बनवून थोडा काळ कां होईना पण सर्व

हिंदुस्थानाचें साम्राज्य मराठ्यांच्या हुकुमांत आणलें. तेव्हां बाजीरावानें हे जे नवीन सरदार पढें आणले त्यांची थोडीशी हकीकत सांगतों:—

**राणोजी शिंदे**—राणोजीचें मूळ गांव कण्हेरखेड. हें गांव साताऱ्यापासून सहा कोसांवर आहे. तो मूळचा फार गरीब होता यामुळें त्यानें बाळाजी विश्वनाथाकडे बारगिरीची नोकरी धरली. राणोजीचें शौर्य व हुशारी निजामाच्या बरोबर झालेल्या लढायांत बाजीरावाचे दृष्टीस पडली. यामुळें बाजीरावानें त्याला माळव्यांत पाठविलें. तेथें त्यानें फार उत्तम कामगिरी बजावली, व तो सरदार बनला. या घराण्यानें पुढें स्वराज्यसेवा उत्तम तऱ्हेनें केली. महादजी शिंदे यांनीं तर दिल्लीचा बादशहा याला मराठ्यांचा अंकित बनविलें.

**मल्हारराव होळकर**—मल्हाररावाचें मूळनांव होळ. हें फलटण संस्थानांत आहे. या होळगांवावरूनच त्याच्या घराण्यास होळकर म्हणूं लागले. त्यान्चें मूळचें नांव वीरकर. मल्हाररावाच्या बापाचें नांव खंडूजी. मल्हाररावाचा जन्म सन १६९३ त झाला. त्याचा बाप त्याचे वयाचे चवथे वर्षी वारला. तेव्हां भाऊबंदांनीं अतीशय त्रास दिल्यामुळें त्याची आई त्याला घेऊन खानदेशांत तळोद्यास आपला भाऊ भोजराज बारगळ याचेकडे गेली. मल्हाररावानें प्रथम कंठाजी कदम बांडे याचे हाताखालीं शिपाईगिरी पतकरली; व १७२० त निजामाबरोबर लढतांना चांगला पराक्रम केला. बाजीरावानें बांडे यांजकडून मल्हाररावास मागून घेतलें व त्याला पांचशें स्वारांचा मुख्य नेमिलें. पुढें शिंद्याप्रमाणें त्यानें माळव्यांत अतीशय पराक्रम केला व इंदूर हें आपलें मुख्य ठिकाण केलें. हा सन १७६५ पर्यंत मराठी राज्याची फार कळकळीनें कामगिरी

करून आपले वयाचे ७२ वे वर्षीं मरण पावला. सुप्रसिद्ध देवी अहल्याबाई ही याचीच सून.

**उदाजी पवार**—ह्यानें धार येथें मुख्य ठाणें करून उत्तर हिंदुस्तानांत मराठ्यांचा सन १७२५ पासून खूप दरारा बसविला. याचा भाऊ आनंदराव याचे प्रमाणेंच शूर व कर्तबगार होता.

**गोविंदपंत बुंदेले**—मागें सांगितलेंच आहे, कीं रजपूत व मराठे यांची एकी बनवून हिंदवी स्वराज्याचें साम्राज्य बनवावें हा बाजीरावाचा बेत होता. त्या बेताप्रमाणें जेव्हां जेव्हां रजपूत राजांवर मुसलमान, स्वाऱ्या करीत तेव्हां त्यांचे मदतीस धांवून जावयाचें असें बाजीरावानें ठरविलें होतें. मराठ्यांची माळव्यांत कायमची वसाहत शिंदेहोळकरांनीं केली. यामुळें रजपुतांस विशेषच्च हिंमत व जोर आला. तेव्हां रजपुतांची खोड मोडावी म्हणून त्यांचा पुढारी बुंदेलखंडचा राजा छत्रसाल याचे वर अलाहाबादचा सुभेदार महमदखान बंगष यास बादशहानें मोठें सैन्य देऊन पाठविलें. हें संकट दूर करण्यास मदत करा अशी विनंति छत्रसालानें बाजीरावास केली. हिंदवी स्वराज्यसेवक या नात्यानें हिंदूराजास मदत करणें आपलें पवित्र कर्तव्य आहे हें लक्षांत आणून बाजीरावानें माळव्यांतून तावडतोब छत्रसालाकडे धांव घेतली व जैतपूर येथें १७२९ त महंमद बंगषचा पराभव करून छत्रसालास संकटांतून सोडविलें. नंतर तो उपकार स्मरून छत्रसालानें १७३३ त मरतांना बाजीरावास आपला मुलगा समजून आपले राज्याचा तिसरा भाग दिला. तेथेंच बाजीरावानें गोविंदपंत बुंदेले यांची नेमणूक केली. हा गोविंदपंत कोंकणांतून येऊन बाजीरावाकडे घरगुती नोकर म्हणून राहिला होता. गोविंदपंत आपल्या

हुशारीनें मोठा सरदार झाला व बुंदेलखंडांत सागर नांवाचें नवीन शहर बांधून त्यानें तें आपलें मुख्य ठाणें बनविलें.

याप्रमाणें बाजीरावानें साम्राज्याची शिवाजीची कल्पना उत्तरेस मराठी वसाहती स्थापून नांवारूपास आणली.

---

## गोष्ट ३९ वी.

## बेकीची एकी.

बाळांनो, ताराबाईनें कोल्हापुरास नवीन राज्य स्थापून तेथें आपला मुलगा शिवाजी यास राजा केलें. तेव्हांपासून साताराचा शाहू व त्याचा चुलत भाऊ कोल्हापूरचा शिवाजी यांच्यामध्यें भाऊबंदकी सुरू झाली व त्यामुळें सर्व हिंदुस्तान मराठ्यांचे ताब्यांत येऊन सबंध हिंदुस्तानावर हिंदवी स्वराज्य स्थापन होण्याची आलेली सोन्यासारखी संधि फुकट गेली हें मागें सांगितलेंच आहे. शाहू व शिवाजी यांचे मधील युद्धांत बाळाजी विश्वनाथ व त्याचा शूर मुलगा बाजीराव यांच्या हुशारीनें व पराक्रमानें शाहूची फत्ते झाली. पुढें शिवाजी मरण पावला व राजारामाची दुसरी बायको राजसबाई हिचा मुलगा कोल्हापूरच्या गादीवर बसला. यामुळें ताराबाईचें वजन कमी झालें. ती आतां सन १७३० पासून शाहूजवळ साताऱ्यास सुखानें येऊन राहिली. संभाजीचा पाठीराखा त्रिंबकजी दाभाडे याचा बाजीरावानें गुजराथेंत पराभव केला. त्रिंबकजी गोळी लागून मेला व संभाजीचा दुसरा मदतगार निजाम याचाही पराभव करून मराठ्यांच्या भानगडींत मी पुनः पडणार नाहीं असें त्याच्याकडून बाजीरावानें कबूल करून घेतलें; यामुळें संभाजीचा सर्व आधार सुटला.

साह्यकर्त्यांचा पराभव झाला यामुळें आपला भाऊ शाहू याचेशीं तह करून भांडण मिटवावें असें संभाजीस वाटलें. शाहू हा फार उदार व प्रेमळ स्वभावाचा होता. ताराबाईनें दोनही भावांनीं प्रेमानें एकी करावी असें शाहूला सांगितलें. मग शाहूनें संभाजीला आपले भेटीस मोठ्या सन्मानानें व थाटमाटानें आणण्याकरितां बरेच सरदार, हत्ती, पालख्या व लष्कर पाठविलें. नंतर संभाजी वाठारवरून साताऱ्यास आला. तेव्हां शाहू त्याला पायीं सामोरा गेला व कडकडून आलिंगन देऊन भेटला. नंतर दोघेही हत्तीवर एका अंबारींत बसून मिरवत मिरवत सातारकरांचे प्रेमभरीत जयघोषांत साताऱ्यास राजवाड्यांत आले. मग दोघांचा २१ एप्रील १७३१ त तह झाला. त्या तहानें शाहूनें ठराविक मुलूख संभाजीस दिला. परस्परांनीं परस्परांचे नोकरांस नोकरीस ठेऊं नये व एक-मतानें स्वराज्य वाढवावें असें ठरलें. अशा तऱ्हेनें बेकीची एकी शाहूच्या प्रेमळपणानें घडून आली.

---

## गोष्ट ४० वी.

## चिमाजी आप्पाची चिकाटी.

हिंदुस्तानांत यूरोपांतून सर्वांच्या आधीं पोर्तुगीज आले. त्यांचा हिंदुस्तानांत येण्यांत ख्रिस्ति धर्म वाढवावा हा एक उद्देश होता. पश्चिम किनाऱ्यावर ते बरेच प्रबळ होते. साष्टीबेट, तारापूर, माहीम, डहाणू, नारगोळ, अगाशी व वसई हीं त्यांचीं महत्त्वाचीं शहरें होतीं. त्यांतल्या त्यांत, वसईचा किल्ला त्यांनीं अतीशय बळकट बांधला होता. ठाण्याचाही किल्ला १७३० त त्यांनीं बांधण्यास सुरवात केली होती. हिंदु-

लोक हाडाचे गरीब, यामुळें त्यांनीं पोर्तुगीज लोकांचा अंमल निमूटपणें सहन केला. पण मऊ सांपडलें कीं कोंपरानें खणावें, या न्यायानें पोर्तुगीज यांनीं धर्माच्या बाबतींतही जुलूम करण्यास सुरवात केली. त्यांनीं असा ठराव केला कीं, हिंदू लोकांनीं प्रसिद्धपणें आपलीं धर्मकृत्यें करूं नयेत. हा धर्मसंबंधीं जुलूम अंताजी रघुनाथ सरदेसाई वगैरे धार्मिक हिंदूंना असह्य झाला. शिवाजी महाराज व त्यांचे वंशज हिंदू धर्माचे कैवारी अशी सर्व हिंदुस्तानांत प्रसिद्धी होती. यामुळें अंताजीनें शाहूमहाराज व त्यांचे पेशवे बाजीराव यांजकडे फिर्याद केली. त्याप्रमाणें माळव्यांतून बाजीरावाचा धाकटा भाऊ चिमाजी आप्पा यांचे हाताखालीं सैन्यें देऊन रवानगी करण्यांत आली. सन १७३७ त चिमाजी आप्पाचे सरदारांनीं ठाण्याचा किल्ला हल्ला करून पोर्तुगीजापासून जिंकून घेतला, व ठाण्याच्या बुरुजास फत्ते बुरूज असें नांव ठेविलें. नंतर पारसिक, धारावी, बेलापूर, अर्नाळा, मांडवी, वेसावें, काळदुर्ग व टकमक हीं ठिकाणें त्याच वर्षीं मराठ्यांनीं मोठ्या धडाडीनें पोर्तुगीजांचा पराभव करून घेतलीं. लगेच वसई घ्यावयाची पण पावसाळा आला म्हणून चिमाजी आप्पा लढाई थांबवून पुण्यास आले. नंतर पुनः चिमाजी आप्पानें सन १७३८ च्या अखेरपासून दमणपासून दीवपर्यंत सहा महिने सारखा फिरत राहून पोर्तुगीजांवर जोराचा मारा सुरू केला. अशा तऱ्हेनें पोर्तुगीजांस टोले देत देत १७३९ च्या मे महिन्यांत चिमाजीनें वसईच्या किल्ल्यास वेढा दिला. आंत पोर्तुगीजांची कडेकोट तयारी होती. यामुळें एकसारखा तीन महिने त्यांनीं टिकाव धरला. किल्ला, खाडी व समुद्र यांच्या कांठीं असल्यामुळें तटास सुरुंग लावणें अतीशय कठीण झालें. तरीही मरा-

त्यांनीं पांच सुरुंग लाविले. चिमाजी आप्पानें एकसारखा तीन महिने वेढा दिला तरी किल्ला हस्तगत होईना, तेव्हां त्याचे लोक कंटाळले. तेव्हां चिमाजीनें सर्व लोकांस एकत्र करून भाषण केलें. तो म्हणाला, ' शूर मराठे बंधूंनों, आजपर्यंत हातीं घेतलेलें काम शेवटास नेल्याशिवाय मी कधींही राहिलों नाहीं. घांटावरून कोंकणांत येतांना वसईच्या किल्ल्यांत प्रवेश करण्याची प्रतिज्ञा मीं केली आहे. आज तीन महिने झाले अजून किल्ल्यांत प्रवेश होण्याचें चिन्ह दिसत नाहीं; तेव्हां मला तोफेच्या तोंडीं बांधा व तोफ उडवा, म्हणजे माझें डोकें वसईच्या किल्ल्यांत जाऊन पडेल व माझी प्रतिज्ञा पुरी होऊन मला मरणानंतर आनंद होईल. हें त्याचें भाषण ऐकून मराठे गड्यांस स्फुरण चढलें. सुरुंग उडत असतांच ते भराभर किल्ल्यांच्या खिंडारांतून आंत शिरूं लागले व तट पडून कांहीं दडपून गेले. पोर्तुगीजांचा आंतून दारूगोळयाचा भडिमार चाललाच होता. त्यांत बरेच माजून गेले, तरी जिवंत राहिलेल्यांनीं एकही पाऊल मागें घेतलें नाहीं. हरहर महादेव म्हणत, जिवावर उदार होऊन मराठे आंत शिरले. यामुळें पोर्तुगीजांचा पुरा मोड झाला. त्यांनीं तहाचें बोलणें लाविलें. नंतर तह होऊन वसईचा किल्ला मराठ्यांनीं काबीज करून जगाच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर केलें, व हिंदु धर्माचे प्रतिपालक ही पदवी संपादन केली.

---

गोष्ट ४१ वी.

## भरभराटीचा कळस.

बाळाजी विश्वनाथानें साम्राज्याचा संकल्प केला व साधनांची जुळवाजुळव केली. त्याचा मुलगा बाजीराव यानें माळवा

व बुंदेलखंड येथें शिंदे, होळकर, पवार यांच्या वसाहती स्थापून साम्राज्याचा पाया घातला. त्या सुंदर व सबळ पायावर बाजीरावाचा मुलगा नानासाहेब म्हणजे तिसरा पेशवा यानें शिंदे,

नानासाहेब पेशवे.



होळकर व राघोबादादा यांच्याकडून उत्तरेकडे व चिमाजी आप्पाचा मुलगा सदाशिवराव, व पटवर्धन सरदार यांचेकडून दक्षिणेकडे अशी सर्व हिंदुस्तानभर हिंदवी साम्राज्याची उत्तम उभारणी केली. राघोबानें तर भगवा झेंडा अगदीं उत्तरेस अटकेवर फडकावला. मध्यंतरीं ज्यांच्या प्रेमळ व उदार स्वभावानें व नशीबाच्या जोरानें मराठ्यांचें वैभव शिखरास जाऊन पोहोंचलें ते शाहू महाराज १७४९ त मरण पावले. व त्यांचे दत्तकपुत्र रामराजे साताऱ्यास गादीवर बसले. शाहूमहाराजांनीं रामराजे लहान म्हणून पेशव्यांस सव मुखत्यारी दिली. शाहू महाराजांची इच्छा पेशव्यांनींही सर्व

हिंदुस्तानभर मराठेशाहीचा दरारा बसवून पूर्ण केली. प्रत्यक्ष दिल्ली मराठे सरदारांनीं मोठ्या पराक्रमानें हस्तगत केली. शिंद्यांनीं बहुतेक राजपुताना जिंकला, जाटांचा पराभव होळकरानें केला, रोहिलखंड व पंजाब हे प्रांत देखील मराठ्यांनीं काबीज केले आणि भरारी बाजीरावाचा भरारी मुलगा रघुनाथराव यानें प्रत्यक्ष अटकेवर भगवा झेंडा रोविला. मराठ्यांच्या सत्तेची लाट उत्तरेस हिमालयावर जाऊन आदळली, व दक्षिणेस कर्नाटकही मराठ्यांनीं व्यापिलें व १७६० त उद्गीर येथें सदाशिवराव भाऊनें अतीशय पराक्रम करून निजामाचा पूर्ण पराभव केला. अशा तऱ्हेनें मराठ्यांच्या वैभवाचा कळस झाला.

---

## गोष्ट ४२ वी.

## कळसावरून कडेलोट. दोन मोत्यें गळून पडलीं.

अतीशय भरभराट झाली कीं समजावें कीं लवकरच ओहोटीस सुरवात होणार. तसेंच झालें. १७६० त मराठी सत्तेचा कळस झाला. मराठी सत्ता इतकी अपरंपार वाढली ही गोष्ट मुसलमानांना आवडली नाहीं. रोहिल्यांचा पुढारी नजीबखान यानें अफगाणिस्तानचा अहमदशहा अबदल्ली याला हिंदुस्तानावर स्वारी करण्यास आमंत्रण दिलें व सर्व मुसलमान तुम्हांला मदत करतील अशी त्याची खात्री केली. त्यामुळें अहमदशहा मोठें सैन्य घेऊन पंजाबांतून आला. त्यास पूर्वीच्या बेताप्रमाणें उत्तरेकडील सर्व मुसलमान मिळाले. अबदल्लीनें मराठ्यांचा कुंजपुरा येथें पराभव करून दत्ताजी शिंद्याला

ठार मारिलें, व बहुतेक मराठी फौज कापून काढली. नानासाहेबांना ही बातमी पुण्यास समजतांच त्यांनीं दोन लक्ष सैन्य तयार केलें व ताज्या दमाचा उद्गीरचा मोहरा सदाशिवराव याला सेनापती नेमिलें. मुसलमानांपेक्षां मराठ्यांची तयारी अधिक चांगली होती. पण सदाशिवराव तरुण असल्यामुळें त्यानें आपल्या चढेल भाषणानें आपल्या अनुभवी सरदारांचीं मनें दुखविलीं व त्यांच्या अनुभवाचा फायदा न घेतां आपलाच हेका चालविला. प्रथम त्यानें एक मोठी चूक केली ती ही कीं अबदल्लीला यमुनेच्या अलीकडे येऊं दिलें. मग तरी बाजीरावाप्रमाणें धडाडीनें अबदल्लीवर एकदम हल्ला करावा तेंही नाहीं. खंदक खणून व बंदोबस्त करून तो अबदल्ली आपणांवर चालून येईल अशी वाट पहात बसला. प्रथम अबदल्लीशीं दोन झटापटी झाल्या, त्यांत मराठ्यांचा जय झाला. पण त्याचाही फायदा सदाशिवरावानें पदरांत पाडून घेतला नाहीं, शेवटीं ती दोन लाख फौज अन्न संपल्यामुळें हैराणझाली.नंतर उपासानें मरावें त्यापेक्षां शत्रूवर तुटून पडावें व मरावें असा विचार करून त्या सैन्यानें अबदल्लीवर हल्ला केला. सकाळपासून तिसऱ्या प्रहरापर्यंत मराठ्यांची सरशी होती. इतक्यांत नानासाहेबांचा मुलगा विश्वासराव पडला त्यामुळें हत्तीवरून सदाशिवराव घोड्यावर आला, व लढाईच्या गर्दींत शिरला व दिसेनासा झाला. तेव्हां आपला सेनापती पडला असें वाटून मराठे घाबरले व पळत सुटले. त्यांना पळण्यासही वाट मिळेना, हजारों मराठे अबदल्लीच्या लोकांनीं ठार केले व धरून नेले. अशा तऱ्हेनें या पानपतावर मराठ्यांस मोठाच धक्का बसला. जवळ जवळ लाख दीड लाख मराठे मरण पावले. एका उत्तरेकडील गृहस्थानें दक्षिणेंत पाठविलेल्या पत्रांत

म्हटलें आहे कीं, ' दोन मोत्यें गळून पडलीं, २७ मोहोरा सांपडल्या, व रुपये व खुर्दा किती हरवला त्याची गणतीच नाहीं.' हीं दोन मोत्यें म्हणजे मराठी साम्राज्याचे आधारस्तंभ विश्वासराव व सदाशिवराव, सत्तावीस मोहरा म्हणजे जवाँनमर्द सत्तावीस रणशूर मराठे सरदार. अशा अतीशय भयंकर रीतीनें भरतीची एकदम ओहोटी झाली. महाराष्ट्रांत घरोघर रडारड झाली. या भयंकर बातमीनें जबरदस्त धक्का बसून नानासाहेब पेशवे लवकरच मरण पावले.

---

## गोष्ट ४३ वी.

## स्वराज्याची स्थीरस्थावर

पानपतच्या धक्यानें मराठी स्वराज्य पार बुडालें असें वाटूं लागलें होतें. इतक्यांत नानासाहेबांचा मुलगा माधवराव यानें आपल्या शौर्यानें, मनमिळाऊपणानें व मुत्सद्देगिरीनें स्वराज्याची पुनः स्थीरस्थावर केली. गादीवर बसला तेव्हां तो केवळ सोळा वर्षांचा होता. यामुळें प्रथम त्याचा चुलता राघोबादादा हा कारभार पाहूं लागला. तो दूरदर्शी व हुषार नव्हता यामुळें कारभारांत घोटाळा माजला त्यांत आणखी भर पेशवाईतील साडेतीन शहाण्यांनीं घातली. निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर, नागपूरच्या भोंसल्यांचा दिवाण देवाजीपंत व राघोबादादांचे मित्र सखाराम बापू असे हे तीन शहाणे व नाना फडणीस अर्धा शहाणा, मिळून एकंदर साडे तीन शहाणे. नानाफडणीस ह्याला अर्धा शहाणा म्हणण्याचें कारण त्याचें शहाणपण कारभारांत व लेखणींत. युद्धाचे कामीं तो अगदीं निरुपयोगी होता. यामुळें

त्याला अर्धा शहाणा म्हणत. असो, या शहाण्यांस व चुलता राघोबा यांस बाजूला सारून तरुण माधवरावानें सर्व कारभार आपल्या ताब्यांत घेतला.

माधवरावानें फार हुशारीनें सर्व मराठे सरदारांची एकी केली. त्यानें त्यांस समजावून सांगितलें कीं, हें मराठी राज्य आपल्या सर्वांचें आहे. त्याचा बचाव सर्वांनीं अभिमानानें केला पाहिजे. एकी घडवून आणल्यावर त्यानें पानपतावर मराठ्यांचा मोड झाल्यानें हैदर, निजाम, वगैरे मराठ्यांचे शत्रू उठले होते यांचा पराभव केला व पानपतच्या पराभवानें झालेलें नुकसान थोडेंसें भरून काढलें. नंतर त्यानें नानासाहेबांनीं सुरू केलेली राज्यव्यवस्था चांगल्या तऱ्हेनें प्रस्थापित केली. त्यानें आपल्या सरदारांच्या जहागिरीवर डोळा ठेविला नाहीं. शिंद्याच्या जहागिरीवर त्यानें हुषार व शूर महादजीची नेमणूक केली. मल्हारराव होळकराची सून सुप्रसिद्ध अहल्याबाई हिला होळकराच्या जहागिरीची मुखत्यारी दिली. नागपूरकर भोंसल्याचें जुनें शत्रुत्व आपल्या मनमिळाऊपणानें त्यानें नाहींसें केलें, व दक्षिण महाराष्ट्रांत पटवर्धन सरदार यांची योजना करून तिकडे शांतता स्थापिली. या तरुण पेशव्यानें वर सांगितल्याप्रमाणें मुत्सद्देगिरीनें वरील सर्व गोष्टी केल्या. त्याचे अंगीं शौर्यही विलक्षण होतें. तें राक्षसभुवन येथें चांगलें प्रगट झालें. मराठ्यांचा जुना शत्रु निजाम पुनः शिरजोर झाला व पेशव्यांत आपसांत भांडण आहे असें पाहून त्यानें युद्धास कंबर बांधली. पण माधवरावानें विलक्षण शौर्य गाजवून १७६३ त राक्षसभुवन येथें निजामाचा पुरा पराभव केला. नंतर त्यानें कर्नाटकांत जाऊन म्हैसूरच्या हैदराचा पराभव केला. त्याचा चुलता रघुनाथराव यानें-ही उत्तरेस जाऊन पानपतचा सूड उगविण्यासाठीं १७६५ त

जाठांवर हल्ला करून त्यांच्यापासून खंडणी वसूल केली. शिवाय शिंदे होळकरांनीं १७६९ त बुंदेलखंड जिंकलें व आपल्या पराक्रमाच्या जोरावर दिल्लीच्या सिंहासनावर नवाच शहाअलम नांवाचा बादशहा बसविला. अशा तऱ्हेनें मराठ्यांनीं स्वराज्याचें तेज सर्वत्र पसरविलें. परंतु महाराष्ट्राचें दुर्दैव त्यांना वर डोकें काढूं देईना. जरा कोठें सर्वत्र दरारा बसतो इतक्यांत मराठी राज्याचा जीव कीं प्राण असा माधवराव पेशवा १७७२ त मरण पावला. तेव्हां त्याचें वय फक्त २८ वर्षांचें होतें.

---

## गोष्ट ४४ वी.

## 'ध' चा 'मा' करणारी आनंदीबाई.

माधवरावाला मुलगा नव्हता म्हणून त्याचे मागून त्याचा भाऊ नारायणराव पेशवा झाला. माधवरावाचें शहाणपण, धोरण, मुत्सद्देगिरी व शौर्य नारायणरावांत नव्हतें. तो हेकट व हलक्या कानाचा होता. त्यानें सर्वांचीं मनें दुखविलीं. प्रभु मंडळीस वाईट रीतीनें वागविलें, व चुलत्याला कैदेंत टाकलें. यामुळें राघोबाचें मन बिथरलें, त्यांत त्याची भयंकर घातकी बायको आनंदीबाई हिनें भर घातली व नारायणरावाला धरावा असें पत्र त्याच्या जवळून लिहून घेतलें. नंतर पगार थकल्यामुळें आधींच चिडलेल्या गारद्यांना तिनें वश केलें. राघोबाच्या पत्रांत धरावे असा शब्द होता, त्यांतील धचा तिनें मा केला, व 'नारायणरावास मारावें असा रघुनाथरावांचा हा पहा हुकूम' असें म्हणून तिनें तें पत्र सुमेरसिंग गारदी यास दिलें. नंतर १७७३ च्या आगष्टांत बालवयी नारायणरावाचा खून सुमेरसिंग व त्याचे गारदी यांनीं शनवारवाड्यांत केला.

झालें, मराठी राज्याचीं पुनः बारा वर्षें भरलीं. राज्यांत दुफळी झाली. कांहीं सरदार राघोबाला मिळाले. कांहीं नारायणरावाची गरोदर बायको गंगाबाई हिला मिळाले. निजाम, हैदर, वगैरे शत्रू पुनः उठले, त्यांच्यावर राघोबा गेला तों त्याचेवर त्याचें सैन्य उलटलें. शिंदे, होळकरही त्याला मदत करीनात, तेव्हां तो 'मला पेशवा करा' अशी भीक मागत इंग्रजांकडे गेला. इतक्यांत गंगाबाई प्रसूत झाली व तिला मुलगा झाला. तेव्हां नाना-फडणीस वगैरे मंडळींस आनंद झाला. राघोबाच्या विरुद्ध

नाना फडणीस.



नानाफडणीस, सखारामबापू, हरिपंत फडके वगैरे राजकारणी पुरुषांनीं ' बाराभाईचें कारस्थान ' या नांवाचा एक कट केला होताच. या सुमारास म्हणजे १७७७ त सातारचा रामराजा मरण पावला. व दुसरा शाहू राजा झाला.

गोष्ट ४५ वी.

## मराठी राज्याचा शेवटचा विजय.

नाना फडणीस व इतर मुत्सद्दी यांनीं सवाई माधवराव यांना पेशवाईचीं वस्त्रें मिळवून आणलीं, व या बाळ पेशव्याच्या नांवानें कारभार चालू केला. या कारकीर्दीत राघोबा, त्यांचे मदतगार इंग्रज व मराठे यांचपामध्यें व सवाईमाधवरावांचे कैवारी नाना फडणीस यांचेमध्यें बऱ्याच झटापटी झाल्या. शेवटीं साल्ब्याच्या तहानें इंग्रजांनीं सवाई माधवराव याला पेशवा कबूल केलें. नंतर १७८४ त नाना फडणिसानें सैन्य पाठवून म्हैसूरच्या टिपूचा पराभव केला. महादजी

महादजी शिंदे.



शिंद्यानें मर्दुमकी गाजवून दिल्लीची बादशाही पुनः आपल्या ताब्यांत आणली व तो १७९० त पुण्यास आला. नाना व

महादजी यांचें मन एकमेकांविषयीं शुद्ध नव्हतें तें शुद्ध होऊन आतां मराठी राज्याला जोर येणार तों दुर्दैवानें कहर केला व महादजी १७९४ त पुण्याजवळ वानवडीस नवज्वरानें मरण पावला.

खड्र्यांची लढाई—मराठ्यांचें ऐक्य व सामर्थ्य यांचें शेवटचें प्रदर्शन खड्र्यांच्या लढाईत झालें. ही लढाई १७९५ त झाली. या लढाईचें कारण निजामाचा चढेलपणा. तो चौथाईची रक्कम देईना व उलट त्याच्या दिवाणानें पेशव्यांची टवाळी केली, तेव्हां सर्व मराठे सरदार गोळा झाले. अशा तऱ्हेनें सुमारें एक लक्ष सैन्य घेऊन परशुरामभाऊ पटवर्धन निजामावर चाल करून गेले. तरुण पेशवा सवाईमाधवराव व नाना फडणीस हेही लढाईवर गेले होते. मराठ्यांनीं निजामाचा पुरा पराभव केला, त्याचेपासून लढाईचा खर्च, व ३७ लक्षांचा मुलूख घेतला व पेशव्यांचा अपमान करणारा निजामाचा दिवाण याला आपल्या राजधानींत राजकीय कैदी म्हणून नेलें. हाच मराठ्यांचा शेवटचा विजय.

---

### गोष्ट ४६ वी.

## दुर्दैवाचा कहर.

झालें, मराठी स्वराज्याचें दैव फिरलें. सन १७९५ त सवाई माधवराव याला नानाच्या तंत्रानें रहाण्याचा कंटाळा आला. व क्षणिक संतापाच्या भरांत शनवारवाड्याच्या माडीवरून कारंजावर उडी टाकून त्यानें जीव दिला. सर्व शहाणीं माणसें पटापट मरण पावलीं. सर्वांच्या शेवटीं नाना फडणीस १८००त मरण पावला. त्याचे बरोबर मराठी राज्याचें सर्व शहाणपण

ळयास गेले. सवाईमाधवराव नंतर खुनी आनंदीबाईचे पळपुटे पुत्र बाजीराव हे पेशवे झाले. या दुसऱ्या बाजीरावांचें सर्वच पहिल्या बाजीरावांच्या उलट होतें. यांच्या अंगीं शौर्यही नव्हतें व मुत्सद्देगिरीही नव्हती. यांनीं आपल्या बापाप्रमाणेंच इंग्रजांशीं १८०२ त तह केला व या तहानें स्वातंत्र्य गमावून पेशवाई मिळविली.नंतर मराठ्यांचीं व इंग्रजांचीं तीन युद्धें झालीं. त्यांत मराठ्यांचा पूर्ण पराभव झाला व बाजीराव पेशवे पुण्याहून पळून गेले. नंतर पळतां पळतां शेवटीं त्यांनीं आपलें राज्य इंग्रजांचे हवालीं केलें व हरी हरी म्हणत इंग्रजांनीं दिलेलें पेनशन खात गंगेच्या काठीं ब्रह्मावर्त येथें राहिले. मध्यंतरीं साताऱ्याचा दुसरा शाहू १८०८ त मरण पावला व प्रतापसिंग गादीवर बसला. जरी पेशवाई नष्ट झाली तरी इंग्रज सरकारनें साताऱ्याचें राज्य प्रतापसिंह याचेकडे कायम ठेविलें. परंतु प्रतापसिंह इंग्रजांशीं नीट वागला नाहीं म्हणून १८३९ त त्याला पदच्युत करून त्याचे जागीं त्याचा भाऊ शहाजी यास राजा केला. तो शहाजी १८४८ त मरण पावला तेव्हां त्याला पुत्र नव्हता म्हणून इंग्रज सरकारनें त्याचें राज्य खालसा केलें.

---

### गोष्ट ४७ वी.

## मराठी राज्य कां बरें बुडालें ?

होऊं नये, वाईट गोष्ट झाली. आतां रडत बसण्यापेक्षां हें असें कां झालें, आपलें राज्य कां बुडालें, हें पाहिलें पाहिजे. बाळांनो, अगदीं पहिल्याच गोष्टींत मीं तुम्हांला सांगितलें आहे, कीं इतिहास वाचायचा तो दोन कारणांसाठीं. पूर्वजांचीं थोर

कृत्यें वाचून तशींच थार कृत्यें करण्याची इच्छा आपणांला व्हावी म्हणून व पूर्वजांनीं केलेल्या चुका समजाव्या व तशा चुका आपण करूं नये म्हणून इतका वेळ शेचाळीस गोष्टींत आपल्या थोर पूर्वजांची उत्तम कामगिरी मीं तुम्हांला सांगितली. आतां या गोष्टींत मराठी राज्य कां बुडालें, हें मी तुम्हांला सांगतों. तें बुडालें तें आपल्याच पूर्वजांच्या चुकांमुळें. पहिली चूक ही कीं शिवाजी महाराजांनीं देशभक्ति व देशप्रेम यांचें जें व्रत लावून दिलें तें शिवाजी महाराजांच्या मरणानंतर थोडींच वर्षं मराठ्यांनीं पाळलें. शिवाजी महाराजांच्या वेळीं मराठ्यांचे मनांत अप्पलपोटेपणा नव्हता, देशभक्ति होती. पराक्रम करावयाचे ते माझ्या देशाचा फायदा व्हावा म्हणून, मीं स्वतः गबर व्हावें म्हणून नाहीं, असेंच मराठे वीराला शिवरायांच्या सोन्याच्या काळीं वाटत असे. शिवरायांच्या वेळीं देशभक्ति, देशप्रेम व धर्मप्रेम हें मराठ्यांच्या मनांत ठसविण्यास रामदासस्वामी रात्रंदिवस झटत होते. पण नंतर रामदासांसारखे देशभक्त साधुही झाले नाहींत व शिवाजी महाराजांसारखे स्वदेशप्रेमी वीरही फारसे झाले नाहींत. जोंपर्यंत अप्पलपोटेपणा बोकाळत नाहीं तोंपर्यंत सर्व कांहीं ठीक चालतें. पण एकदां कां अप्पलपोटेपणा बोकाळला, स्वदेशप्रेम नाहींसें झालें म्हणजे लगेच नाश होण्यास सुरुवात होते. मराठीमंडळ शिवाजीमहाराजानंतर पुष्कळ वाढलें. बहुतेक हिंदुस्तान देश मराठीमंडळांतलि सरदारांच्या ताब्यांत आला. पण मराठीमंडळांत पूर्वीं एकी होती त्या ठिकाणीं आतां बेकी आली. मराठी मंडळांत पूर्वीं देशभक्ति होती, तेथें आतां अप्पलपोटेपणा आला. यामुळें मराठीमंडळांतील सरदार शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले व पेशवे, हे जुटीनें वागेनासे झाले. प्रत्येकजण स्वतःचा मुलूख कसा वाढेल व कसा

बऱ्यांवेळ एवढेंच पाहूं लागला, यामुळें मराठीमंडळाचा इंग्रजांनीं पराभव केला. मराठीमंडळांत एकी असती तर त्यांच्यांत आपसांत भांडणें झालीं नसतीं, त्यांचा पराभव झाला नसता व त्यांचें वैभवशाली राज्यही बुडालें नसतें.

मराठी राज्य बुडालें याचें दुसरें कारण मराठ्यांनीं इंग्रज लोकांच्या सैन्यांत काय नवीन गोष्टी आहेत, त्यांच्या बंदुका व तोफा कशा सुधारलेल्या आहेत, त्यांच्या सैन्यांत कशी शिस्त आहे हें पाहून त्या नवीन गोष्टी आपल्या सैन्यांत आणल्या नाहींत. आपसांत भांडणें नसतीं तर ही चूक मराठ्यांच्या हातून झाली नसती.

तिसरें कारण हुशार व शूर पुरुषांचा दुष्काळ. हुषार व शूर पुरुष हे राज्याचे जीव कीं प्राण असतात. ते असतात तोंपर्यंत राज्य भरभराटीस येतें. हुषार व शूर पुरुष यांची तूट पडूं लागली कीं राज्य खालावूं लागतें. तसेंच मराठी राज्यांत झालें. मराठी राज्यांत पानपतच्या युद्धानंतर नांव घेण्यासारखे फक्त तीनच थोर पुरुष निपजले. त्यांचीं नांवें. माधवराव पेशवे, महादजी शिंदे व नानाफडणीस. असा कर्तबगार माणसांचा दुष्काळ पडला व आपलपोट्या स्वार्थसाधूंचा सुळसुळाट झाला यामुळें मराठी राज्य बुडालें. झालें तें झालें, पण झालें त्यापासून आपण काय बोध घ्यावयाचा? हा कीं आपला देश वर यावयाला हवा असेल, तर अप्पलपोटेपणा टाकून स्वदेशभक्ति व स्वदेशप्रीति अंगांत आणली पाहिजे, बेकी नाहींशी करून एकी केली पाहिजे व सुस्ती टाकून नवीन फायदेशीर सुधारणांचा अंगिकार केला पाहिजे व परक्यांच्या चांगल्या गोष्टींचा स्वीकार केला पाहिजे.

गोष्ट ४८ वी.

## इंग्रजी राजसत्ता.

पेशव्यांचें राज्य इंग्रजांचे हातीं आलें त्या वेळीं अतीशय हुशार, मनमिळाऊ व शांत असे एल्फिन्स्टन हे पुण्यास रेसिडेंट होते. त्यांनाच इंग्रजसरकानें पेशव्यापासून मिळालेल्या मुलुखाची नीट व्यवस्था लावण्यास कमिशनर नेमिले. त्या थोर व मनमिळाऊ साहेबांनीं राज्यकारभाराची पद्धत मराठी राज्यांत जशी होती तशीच बहुतेक चालू ठेविली. यामुळें एक राज्य गेलें व दुसरें आलें ही गोष्ट लोकांना फारशी

एल्फिन्स्टन.



जाणवली नाहीं. एल्फिन्स्टन साहेबानें पूर्वींचीं वतनें, नेमणुका व जहागिरी तशाच चालू ठेवल्या; मराठी राज्यांत

जे नोकर होते त्यांना इंग्रजी राज्यांत नोकऱ्या दिल्या, मराठा सैन्यांतील शिपायांस इंग्रजी सैन्यांत नोकरीस ठेवलें. यामुळें कोणाचेंही फारसें नुकसान झालें नाहीं. पूर्वी आपल्या या देशांत निरनिराळीं राज्यें होतीं, यामुळें नेहमीं देशांत लढाया चालू असत. यामुळें शांतता नांदत नसे. आतां सर्व हिंदुस्तान इंग्रजी अमलाखालीं आलें. यामुळें सर्व हिंदुस्तानांत शांतता नांदूं लागली. शांतता असली म्हणजे शेतकी वगैरे धंदे सुरळीत चालू होतात. धंदे सुरळीत चालू झाले म्हणजे लोकांची स्थिति सुधारते व ते सुखी होतात. या नियमाप्रमाणें या देशांत शांतता झाल्यामुळें, धंदे चांगले चालू झाले, लोकांची स्थिति सुधारली व लोक सुखी झाले. एल्फिन्स्टन साहेबांनीं नवीन मुलुखाची व्यवस्था चांगली लावली यामुळें लवकरच त्यांना मुंबई इलाख्याचे गव्हर्नर नेमिलें. तेंही काम त्यांनीं फारच चांगल्या रीतीनें व मनमिळाऊपणानें केलें. यामुळें अजूनही पुष्कळ लोक प्रेमानें त्यांचें नांव घेतात.

बाळांनों, ईश्वराच्या इच्छेनें ब्रिटिश साम्राज्याचा हा आपला देश एक भाग झाला आहे, हें ब्रिटिश साम्राज्य अतिशय सुधारलेलें आहे. यामुळें सर्व नवीन चांगल्या सुधारणांचा प्रवेश या आपल्या देशांत झाला आहे. सर्व देशांत आगगाड्या, तारायंत्र, विजेनें चालणाऱ्या ट्रामगाड्या, उत्तम सडका व धर्मशाळा झाल्या आहेत. यामुळें देशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सुखानें, सुरक्षितपणानें थोडक्या खर्चांत व थोडक्या वेळांत प्रवास करतां येऊं लागला आहे, व देशांतील व्यापार व उद्योगधंदे यांची वाढ झाली आहे. सरकारानें पुष्कळ कालवे व तलाव बांधल्यामुळें शेती सुधारली आहे व शेतकरी सुखी झाले आहेत आगगाड्यांचे योगानें सर्व

देशभर लोक जाऊं येऊं लागल्यामुळें सर्व देशांतील लोकांत एकी होऊं लागली आहे.

ब्रिटिश साम्राज्य अतीशय मोठें आहे, तें सर्व जगावर पसरलेलें आहे. तें अतिशय बलाढ्य आहे. अशा मोठ्या बलाढ्य, संपन्न व सुधारलेल्या साम्राज्याचा हा आपला देश एक भाग झाला आहे. यामुळें या साम्राज्याच्या बळाचा, वैभवाचा, सुधारणेचा व विस्ताराचा साहजिकच आपणांस फायदा मिळं लागला आहे, व यामुळें आपला व्यापार व दळणवळण सर्व जगावर होऊं लागलें आहे. या बलाढ्य साम्राज्यावर हल्लीं पंचम जॉर्ज बादशहा राज्य करित आहेत. ते

पंचम जॉर्ज बादशहा.



महाराणी विक्टोरिया यांचे नातू व सातवे एडवर्ड यांचे पुत्र आहेत. पंचम जॉर्ज बादशहांचें या देशावर फार प्रेम आहे, व या देशाची स्थिति सुधारण्यासाठीं ते फार झटतात. ते स्वतः दोनदां हिंदुस्तानांत आले होते, यामुळें या देशाची

त्यांना चांगली माहिती झाली आहे. यांनीं आपल्या देशाला नुकताच स्वराज्याचा पहिला हप्ता दिला आहे. आतां आपल्या देशाचा कारभार करण्याची आपल्याला संधी मिळाली आहे. त्याचप्रमाणें पंचमजॉर्ज यांनीं लोक सुशिक्षित व्हावे म्हणून शिक्षणाचे कामीं पुष्कळ खर्च व्हावा अशी तजवीज केली आहे. गांवोगांव दवाखाने सुरू झाले आहेत त्यांत गरीबांना फुकट औषध मिळतें.

पंचमजॉर्ज बादशहा यांनीं आपले वडील पुत्र एडवर्ड प्रिन्स ऑफ् वेल्स यांना हल्लीं हिंदुस्तानांत पाठविलें आहे. हे हुशार राजपुत्र ता. १७नोव्हेंबर१९२१रोजीं मुंबईस आले. आज सुमारें चार महिने ते सर्व हिंदुस्तानभर प्रवास करीत आहेत, लोकांची स्थिति प्रत्यक्ष पहात आहेत, व लोकांचीं मनें आपलींशीं करून घेत आहेत ही फार चांगली गोष्ट आहे. ह्या प्रवासाचा पुढें हिंदुस्तानचा कारभार पहातांना त्यांना फार उपयोग होईल.

पंचमजॉर्ज बादशहा यांच्या प्रमाणेंच त्यांच्या प्रिय पत्नी

महाराणी मेरी.



महाराणी मेरी ह्यांना हिंदुस्तानविषयीं फार कळकळ वाटते. त्या पंचमजॉर्ज यांचे बरोबर दोनदां हिंदुस्तानांत आल्या होत्या त्या वेळीं त्यांनीं हिंदी स्त्रियांची मैत्री संपादन केली आहे. हिंदी स्त्रियांच्या शिक्षणसंस्था, हिंदी स्त्रियांसाठीं काढलेले दवाखाने व अशाच दुसऱ्या हिंदी स्त्रियांची उन्नति करणाऱ्या संस्था यांना महाराणी मेरी मनोभावानें मदत करतात.


या आपल्या अफाट ब्रिटिश साम्राज्यांत जगांतील प्रत्येक जातीचे व प्रत्येक वंशाचे लोक आहेत. यामुळें हें साम्राज्य म्हणजे एक जगच आहे असें वाटतें. जरी या साम्राज्यांतील निरनिराळे भाग एकमेकापासून फार दूर आहेत तरी त्यांना समुद्रांतील तारायंत्रानें एकमेकांच्या सुखदुःखाची हजारों मैलांवरची बातमी एक दोन तासांत समजते. त्यांना एकमेकांना भेट द्यावयाची असल्यास झपाट्यानें चालणाऱ्या वाफेच्या आगबोटी तयार असतात. हें ब्रिटिश साम्राज्य न्याय, प्रेम व समता यांच्या पायावर रचलेलें आहे. या साम्राज्यांत हिंदी लोकांना आपल्या धर्माप्रमाणें चालतां येते. या साम्राज्यांतील लोकांत बंधुप्रेम वाढत चाललें आहे. देव करो आणि हें ब्रिटिश साम्राज्य, साम्राज्यांतील सर्व निरनिराळया धर्माच्या, निरनिराळया जातीच्या व निरनिराळया रंगाच्या लोकांचें प्रेमळ एकत्र कुटुंब बनो. या ब्रिटिश साम्राज्याचें उदाहरण पुढें ठेऊन सर्व जग प्रेमाच्या रेशमी दोरीनें एकत्र बांधलें जावो, म्हणजे सहजच कोट्यावधी माणसांना ठार मारणाऱ्या लढाया बंद होतील व मग सर्व जगाचा पालनकर्ता राजांचाही राजा ईश्वर त्याच्या अमला-खालीं हें जग म्हणजे एक अत्यंत सुखदायक स्वर्ग बनेल

व कलीयुगं जाऊन सत्ययुगास सुरवात होईल. देव, प्रभु पंचम-जॉर्ज व महाराणी मेरी यांना उदंड आयुरारोग्य देवो, व त्यांच्या अमलाखालीं सत्यप्रेम युगाला उदयास आणो. बाळांनों, हें सत्य लवकर यावें व सर्व जग अत्यंत सुखी व समाधानी व्हावें म्हणुन रोज तुम्ही देवाची प्रार्थना करा.

समाप्त

REFBK-0002130

क्र. 2930


महाराष्ट्राचा नकाशा.
शहाजीची जहागीर
शिवाजीचे राज्य. (स्वराज्य)
महाराष्ट्र
इंग्लिश मैल
५० १०० १५०
तापी नदी
पूर्णा नदी
गोदावरी नदी
वर्धा नदी
कृष्णा नदी
भीमा नदी
नागपूर
भंडारा
चांदा
नाशिक
सालेर
चांदवड
दौलताबाद
औरंगाबाद
पैठण
जालना
अहमदनगर
संगमनेर
जुन्नर
कल्याण
मुंबई
वसई
जंजिरा
पुरंदर
सिंहगड
रायगड
सुवर्णदुर्ग
दाभोळ
संगमेश्वर
रत्नागिरी
राजापूर
विजयदुर्ग
सिंधुदुर्ग
वेंगुर्ले
सावंतवाडी
कोल्हापूर
पन्हाळा
मिरज
विजापूर
सोलापूर
परिंडा
तुळजापूर
नळदुर्ग
कल्याणी
बेदर
गुलबर्गा
हैदराबाद
रायचूर
कर्नूल
पानगल
अदोनी
गजेंद्रगड
बदामी
नरगुंद
धारवाड
कोपाळ
बेलारी
कारवार
सावनूर
हरीहर
बेदनूर
मंगळूर
मद्रास
बेलोर
अर्काट
जिंजी
पांडीचेरी
बंगळूर
कोलार
म्हैसूर
कोइमतूर
तंजावर
दिंडीगल
मदूरा
सिलोन